CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, २४ जानेवारी २०२६ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४२ वे अंक ५९ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# सोलापूरच्या नव्या महापौरांची निवड ३१ जानेवारीला

## महापालिकेकडून विभागीय आयुक्तांना प्रस्ताव

### महापौर निवड बिनविरोध करण्यासाठी हालचाली?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

सोलापूर महापालिका निवडणूक निकालानंतर महापौर पदाचे आरक्षण जाहीर झाले. शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी नव्या महापौराची निवडणूक होईल, तसा प्रस्ताव महापालिकेने विभागीय आयुक्तांना पाठवला असल्याची माहिती विश्वसनीय सुत्रांनी दिली. दरम्यान, आज भाजपाच्या गटनेत्याची निवड होणार आहे. महापौर निवड बिनविरोध करण्याच्या दृष्टीने हालचाली आणि रणनीती आखली जात आहे.

निवडणूक निकालानंतर लवकरात लवकर महापौर पदाची निवडणूक घ्यावी, अशी नियमात तरतूद आहे. त्यानुसार नगरविकास खात्याने आरक्षणाची प्रक्रिया पूर्ण केली. महापालिकेच्या पहिल्या सभेत महपौर आणि उपमहापौर या दोन पदांसाठी निवडणूक घेतली जाईल. यासंदर्भात विभागीय आयुक्त, महापालिका आयुक्त, महापालिकेचे नगरसचिव यांच्यात चर्चा झाली आहे. विभागीय आयुक्तांनी दोन तारखा कळवल्या असून त्यापैकी एक तारीख निश्चित करुन कळवण्याबाबतचे लेखी पत्र महापालिकेला पाठवले आहे. त्यानुसार आज आयुक्तांनी नगरसचिव यांच्याशी चर्चा केली आणि ३१ जानेवारी ही तारीख निश्चित केली असल्याचे समजते. तसा प्रस्ताव नगरसचिव विभागीय आयुक्तांना पाठवतील. विभागीय आयुक्त निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करतील. त्यानंतर महापौर व उपमहापौर या दोन्ही पदांच्या निवडणुकीची कार्यक्रम जाहीर करतील. कायदेशीर तरतूदींचा वापर करुनच सर्व प्रक्रिया पुर्ण केली जाईल.




महापौर निवडीनंतर त्याच सभेत स्थायी आणि परिवहन समिती सदस्यांचीदेखील निवड होणार आहे. स्थायीसाठी सोळा आणि परिवहनसाठी बारा सदस्य निवडण्यात येणार आहेत. सभागृहात राजकीय पक्षांचे असलेले संख्याबळ विचारात घेऊनच या दोन्ही समिती सदस्यांची निवड केली जाणार आहे. २८ जानेवारी रोजी भारतीय जनता पक्षाची सदस्य नोंदणी पुण्यातील विभागीय कार्यालयात होईल. महापौर निवडीच्या पार्श्वभूमीवर ही खबरदारी घेण्यात आली आहे. कारण प्रथमच अशा पध्दतीने विभागीय कार्यालयात जाऊन सदस्य नोंदणी होणार आहे. यापूर्वी पक्षाचे अध्यक्ष सदस्यांची स्वाक्षरी घेऊन ते पत्र विभागीय आयुक्त यांचेकडे देत असे. इतर विरोधी पक्षांनाही याबाबत अवगत करण्यात आले आहे. ते आपला गटनेता निवडून तसे पत्र नगरसचिव यांना देणार आहेत. विरोधी पक्षनेता या पदाबाबत अद्याप संभ्रम आहे. कारण एमआयएम या पक्षाचे आठ नगरसेवक निवडून आले आहेत. हा सर्वात मोठा विरोधी पक्ष आहे. नियमानुसार या पक्षाला विरोधी पक्षनेता हे पद दिले पाहिजे. परंतु तो अधिकार पहिल्या सभेत महापौरांना आहे. भारतीय जनता पक्ष एमआयएमला हे पद सहजासहजी मिळू देणार नाही, असे बोलले जात आहे. मात्र याबाबतीत एमआयएम कायदेतज्ज्ञांचा सल्ला घेत असल्याचे समजते.

#### ✔ गटनेता निवडीसाठी भाजपची आज नवनिर्वाचितांची बैठक

भारतीय जनता पक्षाने ८७ जागा जिंकल्या आहेत. नवनिर्वाचित सदस्यांची बैठक उद्या शनिवारी पालकमंत्री, स्थानिक आमदार तसेच शहर अध्यक्ष यांच्या उपस्थितीत होईल. त्यामध्ये गटनेता निवडला जाणार आहे. यावेळी ज्याची निवड होईल त्याचीच पुढे सभागृह नेता पदावर नियुक्ती केली जाईल. सध्या या पदासाठी नरेंद्र काळे यांच्या नावाचीच चर्चा आहे. परंतु ते हे पद स्विकारण्यास राजी नसल्याचे कळते.

#### ✔ तर मग एमआयएम न्यायालयात जाणार

महापालिका निवडणुकीत मतदारांनी एमआयएम पक्षाला आठ नगरसेवक निवडून दिले आहेत. विरोधी बाकावरचा हा सर्वात मोठा पक्ष आहे. महापालिका कायद्यातील तरतूदीनुसार या पक्षाला विरोधी पक्षनेतेपद मिळाले पाहिजे. कारण दहा टक्केचा नियम इथे लागू होत नाही असे कायद्याच्या अभ्यासकांचे मत आहे. सभागृहात महापौरांनी जर मान्यता दिली नाही तर न्यायालयात जाण्याची भुमिका पक्षाने घेतली आहे.

#### ✔ बिनविरोध महापौरसाठी रणनीती

महापालिका निवडणुकीत राज्यात सगळीकडे बिनविरोधाचे वारे वहात आहेत. सोलापुरात भाजपाने ८७ जागा जिंकल्या आहेत. विरोधी पक्षांना मिळून फक्त १५ जागा मिळाल्या आहेत. यापैकी काही नगरसेवकांना महापौर निवडीच्यावेळी आपल्याकडे खेचण्याचा भाजपाचा प्रयत्न आहे. महापौर बिनविरोध करुन मुख्यमंत्र्यांकडे आपले राजकीय वजन वाढवण्याचा प्रयत्न भाजपातील काही जणांचा आहे. त्या अनुषंगाने हालचाली आणि खेळी सुरु आहे. एमआयएमला विरोधी पक्षनेतेपद हवे असेल तर त्यांनी महापौर निवडणूक बिनविरोध करावी लागेल. या दृष्टीनेही रणनीती आखली जात आहे. या दिशेने हालचाली होत असल्याची चर्चा आहे.

---

### विचारपुष्प




नि संघाचा स्वयंसेवक म्हणून समाजसेवेची विविध कामे करण्याच्या, तसेच त्यासाठी स्वतःच्या गुणवत्तेत आवश्यक असलेले परिवर्तन करण्याच्या आपल्या निश्चयाबरोबरच या कार्याची आपल्याला नेमकी जाणीव असली पाहिजे.

**- एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

### महत्त्वाचे

#### घसरणीने संपला वेदनादायी आठवडा

**मुंबई** : भारतीय शेअर बाजारासाठी गेलेला आठवडा अतिशय तणावाचा राहिला.



आठवड्याच्या शेवटच्या दिवशी बाजारात विक्रीचा प्रचंड दबाव पाहायला मिळाला. यामुळे निर्देशांक ८०० अंकांपर्यंत खाली आला. निफ्टीनेही २५,०५० ची महत्त्वाची पातळी तोडल्याने गुंतवणूकदारांमध्ये भीतीचे वातावरण आहे. केवळ एका आठवड्यात निर्देशांकाने सुमारे २००० अंकांची घट नोंदवली आहे. जानेवारी महिन्यात गुंतवणूकदारांनी आतापर्यंत सुमारे ३६ हजार कोटी रुपये बाजारातून काढून घेतले आहेत. ■

#### डॉलरच्या तुलनेत रुपया ९२ च्या जवळ

**नवी दिल्ली** : भारतीय रुपया १ डॉलरच्या तुलनेत ९२ रुपयांच्या जवळ पोहोचला आहे. शुक्रवारी दिवसाच्या व्यवहारात डॉलरच्या तुलनेत रुपया ९१.९९ च्या विक्रमी नीचांकी पातळीवर आला. विदेशी गुंतवणूकदारांच्या सततच्या विक्रीमुळे आणि जागतिक स्तरावर वाढलेल्या व्यापारी तणावामुळे रुपयात ही घसरण दिसून येत आहे. २०२६ च्या सुरुवातीपासूनच रुपया दबावाखाली आहे. गेल्या वर्षी डिसेंबर २०२५ मध्ये रुपया प्रथमच ९० च्या पातळीच्या पुढे गेला होता. आता अवघ्या २० दिवसांत त्याने ९१ ची पातळीही ओलांडली आहे.

#### उज्जैनच्या तराणामध्ये उफाळला हिंसाचार

**उज्जैन** : मध्य प्रदेशातील उज्जैन जिल्ह्यातील तराणा तालुक्यांत दोन गटांत झालेल्या वादाचे शुक्रवारी हिंसाचारात रूपांतर झाले. दंगलखोरांनी अनेक घरांवर दगडफेक केली आणि शासकीय बसेस, तसेच वाहनांची जाळपोळ केली. या प्रकरणी पोलिसांनी पाच जणांना अटक केली आणि परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी तालुक्यात संचारबंदी लागू करण्यात आली. ■

---

# आरक्षण मर्यादेवर मंगळवारी 'सुप्रीम' सुनावणी

## महापालिका, नगरपंचायतीत विजयी उमेदवारांत धाकधूक | २० जि. प., पं. स. निवडणुकीवर निर्णयाची शक्यता

◆ **नवी दिल्ली, २३ जानेवारी**

राज्यातील महापालिका, नगरपंचायतीशिवाय २० जिल्हा परिषद आणि २०० हून अधिक पंचायत समित्यांच्या निवडणुकांमध्ये एकूण आरक्षणाच्या ५० टक्के मर्यादेचे उल्लंघन झाल्याचा आरोप करीत दाखल करण्यात आलेल्या याचिकांवर आता मंगळवार, २७ जानेवारी रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. यापूर्वी २३ जानेवारी रोजी या प्रकरणाची सुनावणी निश्चित करण्यात आली होती. मात्र व्यस्त वेळापत्रकामुळे न्यायासनाने सुनावणी पुढे ढकलली होती. अशातच मंगळवारी होणाऱ्या सुनावणीकडे राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे.

न्यायासनाच्या निर्देशानंतर महापालिका, नगरपरिषद, नगरपंचायतीच्या निवडणुका पार पडल्या. अशातच ज्या प्रभागात ५० टक्के आरक्षणाच्या मर्यादेचे उल्लंघन झाल्याचे स्पष्ट झाल्यास त्यावर न्यायालय काय निर्णय देणार यावरून विजयी उमेदवारांत धाकधूक आहे. याशिवाय विदर्भासह राज्यातील उर्वरित ठिकाणी जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका घ्यायच्या की नाही, यावरही न्यायासन मंगळवारच्या सुनावणीत निर्णय देण्याची शक्यता आहे. सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. जयमाल्या बागची आणि न्या. विपुल पांचोली यांच्या न्यायासनासमोर स्थानिक निवडणुकीतील आरक्षणावर सुनावणी होणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागास प्रवर्गांच्या आरक्षणाला ५० टक्क्यांची मर्यादा आखून देत सर्वोच्च न्यायालयाने २०२१ मध्ये ऐतिहासिक निकाल दिला होता. त्या आरक्षण मर्यादेचे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये उल्लंघन केले आणि काही ठिकाणी आरक्षण ७० टक्क्यांवर नेले, असा दावा करीत विकास गवळी यांनी अवमान याचिका दाखल केली. राज्य निवडणूक आयागाने याचिकेवर यापूर्वी भूमिका स्पष्ट केली आहे. (वृत्तसंस्था)

#### झालेल्या निवडणुका अंतिम निकालाच्या अधीन

» ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ५० टक्के आरक्षण मर्यादेचे उल्लंघन झाले, तेथील निवडणुका याचिकांवरील अंतिम निकालाच्या अधीन असतील, असे न्यायासनाने यापूर्वीच स्पष्ट केले आहे. त्याअनुषंगाने मंगळवारच्या सुनावणीत कोणते निर्देश देणार, यावर आरक्षण मर्यादेचे उल्लंघन झालेल्या २० जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांचे भवितव्य अवलंबून असेल, अशी माहिती याचिकाकर्त्यांचे वकील ॲड. देवदत्त पालोदकर यांनी दिली. ■

#### काय होता याचिकाकर्त्याचा दावा?

» स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागास प्रवर्गांच्या आरक्षणाला ५० टक्क्यांची मर्यादा आखून देत सर्वोच्च न्यायालयाने २०२१मध्ये निकाल दिला होता. राज्य सरकारने ओबीसी प्रवर्गाला दिलेल्या २७ टक्के आरक्षणामुळे राज्यातील अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ५० टक्के आरक्षण मर्यादेचे उल्लंघन झाले आहे. हा न्यायालयाचा अवमान असल्याचा दावा करणारी याचिका दाखल करण्यात आली होती. ■

---

# मंदिराचे सोने चोरणारे जाणार तुरुंगात

## केरळात पंतप्रधान मोदींची सत्ताधाऱ्यांवर टीका

◆ **तिरुवनंतपुरम, २३ जानेवारी**

दशकानुदशके डाव्यांनी तिरुवनंतपुरमवर अन्याय केला. एलडीएफ आणि यूडीएफ या दोघांनीही विकासाकडे दशकानुदशके दुर्लक्ष केले. त्यामुळे पायाभूत सुविधा आणि विकासापासून राज्य वंचित राहिले. डावे आणि काँग्रेसच्या भ्रष्टाचारामुळे येथील जनतेला मूलभूत सुविधांपासून वंचित ठेवण्यात आले. मात्र आता असे होणार नाही, तिरुवनंतपुरमपासून विकासाची सुरुवात होईल. मंदिरातून सोने चोरी करणाऱ्यांना तुरुंगात टाकले जाईल, अशी टीका शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यातील सत्ताधाऱ्यांवर केली.

केरळच्या दौऱ्यानंतर तामिळनाडूची राजधानी चेन्नई येथे पोहोचल्यावर मोदी यांनी जाहीर सभेतून द्रमुकला सत्तेतून बाहेर काढण्याचे आवाहन केले. द्रमुकचे सत्तेतून जाण्याचे काऊंटडाऊन सुरू झाल्याचा घणाघात त्यांनी केला. पंतप्रधान मोदी यांनी केरळ दौऱ्यात अनेक विकास प्रकल्पांचे उद्‌घाटन व भूमिपूजन केले. यानंतर तिरुवनंतपुरम येथे त्यांची जाहीर सभा झाली. यावेळी मोदी म्हणाले, गुजरातप्रमाणे



केरळमध्येही भाजपाचा उदय होत असून तिरुवनंतपुरमला मॉडेल शहर बनविण्याची वेळ आली आहे. डाव्या विचारसरणीचे गट मला कदाचित पसंत करत नसतील. पण सत्य सांगतो, १९८७ पूर्वी गुजरातमध्ये भाजपा एक लहान पक्ष होता. १९८७ मध्ये प्रथमच अहमदाबाद महानगर पालिकेवर भाजपाची सत्ता आली. अगदी त्याचप्रमाणे अलिकडेच तिरुवनंतपुरममध्येही भाजपाला यश मिळाले. ज्या प्रकारे गुजरातच्या जनतेने आमच्यावर विश्वास ठेवला, तसाच विश्वास केरळमधील जनता आता भाजपावर ठेवू लागली आहे.

**मंदिरांना जाणीवपूर्वक हानी पोहोचविण्याचे प्रयत्न**

पंतप्रधान मोदींनी सबरीमला अयप्पा मंदिराचा उल्लेख करत म्हटले, भगवान अयप्पांच्या मंदिरावर देशभरातील लोकांची श्रद्धा आहे. मात्र एलडीएफ सरकारने मंदिराला हानी पोहोचविण्यात कोणतीही कसर सोडली नाही. मंदिरातील सोने चोरी करणारे मोकाट आहेत. भाजपाची सत्ता आल्यास आरोपींची सखोल चौकशी होईल आणि दोषींना तुरुंगात टाकले जाईल.

पंतप्रधानांनी त्रिपुरा आणि पश्चिम बंगालचे उदाहरण देत सांगितले, त्रिपुरामध्ये ३० वर्षे डाव्यांचे सरकार होते. जनता त्रस्त झाल्यावर भाजपाला संधी दिली आणि आज तिथे भाजपाची सत्ता आहे, असे मोदी म्हणाले. (वृत्तसंस्था)

#### द्रमुक भ्रष्टाचार, माफिया, गुन्हेगारीचे प्रतीक

» चेन्नई येथील सभेत बोलताना मोदी म्हणाले, द्रमुक आता भ्रष्टाचार, माफिया आणि गुन्हेगारीचे प्रतीक बनले आहे. तामिळनाडूतील जनतेने विधानसभा निवडणुकीत बदलासाठी मतदान करण्याचा निर्णय घेतला आहे. द्रमुक सरकार केवळ एकाच कुटुंबाची सेवा करत आहे. घराणेशाही, भ्रष्टाचार, महिलांचा अपमान, संस्कृतीचा अवमान हेच द्रमुकचे लक्ष्य आहे. ■

---

# सुरक्षा दलाच्या चकमकीत जैशचा दहशतवादी ठार

## जम्मू-काश्मीरच्या कठुआमध्ये सुरक्षा दलांचे शोधकार्य सुरूच

◆ **श्रीनगर, २३ जानेवारी**

जम्मू आणि काश्मीरमधील कठुआ जिल्ह्यातील बिल्लावार भागात शुक्रवारी सुरक्षा दलाने राबविलेल्या शोधमोहिमेवेळी झालेल्या चकमकीत जैश-ए-मोहम्मदचा एक दहशतवादी ठार झाला. भारतीय लष्कर, सीआरपीएफ आणि पोलिसांनी ही संयुक्त कारवाई केली. या भागात काही दहशतवादी लपलेले असून सुरक्षा दलाकडून शोधकार्य सुरू आहे.



एका लष्करी अधिकाऱ्याने सांगितले की, नियंत्रण रेषेवरून घुसखोरी करून पाकिस्तानातून काही दहशतवादी कठुआ जिल्ह्यातील जंगलात असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यावर मागील पाच दिवसांपासून या भागात शोधमोहीम सुरू आहे. शुक्रवारी सुरक्षा दलाची शोधमोहीम सुरू असताना घनदाट जंगलात दहशतवाद्यांनी गोळीबार केला. त्याला जोरदार प्रत्युत्तर देण्यात आले. गोळीबार थांबल्यानंतर जैश-ए-मोहम्मदच्या एका दहशतवाद्याचा मृतदेह आढळून आला. (वृत्तसंस्था)

#### २३ दिवसांत तिसऱ्यांदा चकमक

» यावर्षी जम्मू प्रदेशात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये झालेली ही तिसरी चकमक होती. यापूर्वी ७ जानेवारी आणि १३ जानेवारी रोजी कठुआ जिल्ह्यातील बिलावर परिसरातील कहोग आणि नजोत जंगलात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमकी झाल्या होत्या. उधमपूर येथील मजालता परिसरातील सोहन गावाजवळ १६ डिसेंबर रोजी दहशतवादी आणि सुरक्षा दलांमध्ये चकमक झाली. ■

---

# भारताने न्यूझीलंडला ७ विकेट्सने हरवले

**१५ षटकांत पूर्ण केले २०९ धावांचे लक्ष्य**

**कर्णधार सूर्यकुमार, ईशान किशनचे अर्धशतक**

**रायपूर** : भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील दुसरा सामना रायपूर येथे झाला. भारताने न्यूझीलंडवर सलग दुसरा विजय मिळवला. संघाने किवीज संघाचा ७ विकेट्सने पराभव केला. भारतीय संघाने १५.२ षटकांत ३ विकेट्सच्या मोबदल्यात २०९ धावांचे लक्ष्य गाठले. कर्णधार सूर्यकुमार यादवने ३७ चेंडूंत ८२ धावांची नाबाद खेळी केली. तर ईशान किशनने ३२ चेंडूंत ७६ धावा केल्या.




---

# महाराष्ट्रात गुलामांचा बाजार भरला

## माणसं विकली जात आहेत : राज

◆ **मुंबई, २३ जानेवारी**

महाराष्ट्रातील राजकारण नासले असून जणू गुलामांचा बाजार भरलेला आहे. दररोज माणसं विकली जात आहेत, असे उद्‌गार मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी काढले. शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त षण्मुखानंद सभागृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उद्धव ठाकरे यांचेही भाषण झाले.

राज्यात आज माणसांचे लिलाव सुरू आहेत. कल्याण-डोंबिवलीत जे काही घडले त्याबद्दल मला शिसारी येत आहे. राजकारण घाणेरडे झाले आहे. बाळासाहेब ठाकरेंनी अनेक राजकीय व्यक्ती घडविले. अनेक पक्षांमध्ये ही राजकारणी आपल्याला दिसतात. बाळासाहेबांनी शून्यातून गोष्टी निर्माण केल्या. २० वर्षांपूर्वी मी बाहेर पडलो पण ती वेगळी गोष्ट होती. मी घर सोडले आणि त्याच्या वेदना फार होत्या. आजचे राजकारण पाहता बाळासाहेब असते तर त्यांना प्रचंड वेदना झाल्या असत्या. बरे झाले ते आज हयात नाहीत. आज सगळीकडे हिंदूत्वाचा बाजार मांडलाय, असे राज म्हणाले.

**आपल्याला गद्दारीचा शाप लागला : उद्धव ठाकरे**

मला घराणेशाहीचा अभिमान असून वादळाशी कसे लढायचे हे बाळासाहेबांनी शिकविले. ठाकरे नाव पुसण्याचा प्रयत्न होत आहे. महापौरपदासाठी मुंबईवरील भगवा गद्दारांनी उतरविला आहे. आपल्याला गद्दारीचा शाप लागला, असे यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले. (वृत्तसंस्था)

---

# सोन्याने भाव खाल्ला




**१,६०००० हजारांचा सर्वकालीक उच्चांक**

◆ **नागपूर, २३ जानेवारी**

अगदी वर्षभरापूर्वीच ७१ हजारांच्या आसपास असलेल्या सोन्याच्या दराने नवीन वर्षात अचानक उसळी घेतली आहे. शुक्रवारी २४ कॅरेट सोन्याचा भाव प्रती तोळा १ लाख, ५९ हजार ८६० रुपयांवर पोहचला जो सर्वकालीन उच्चांक ठरला. चांदीनेही ३.४० लाखांचा टप्पा ओलांडला आहे.

नागपुरात शुक्रवारी सकाळी सोन्याचा दर १,५२,००० रुपये होता. त्यात मोठी वाढ होऊन तो दिवसभरात १,५९,८६० पोहचला.

जागतिक व्यापारात अस्थिरता निर्माण झाल्याने गुंतवणूकदार शेअर बाजारातून पैसे काढून सुरक्षिततेसाठी सोन्याकडे वळतात. भारतात सोन्याची किंमत जागतिक दर आणि डॉलर-रुपया विनिमय दरावरही ठरतात. शुक्रवारी रुपया डॉलरच्या तुलनेत ९१.१० एवढ्या नीचांकी पातळीवर गेल्याने सोन्याचे दर कडाडले आहेत. दुसरीकडे, चांदीने सर्व विक्रम मोडीत काढले. चांदीच्या दरात एकाच दिवसात १५ हजार रुपयांनी वाढ झाली. अमेरिकेने सुरू केलेले 'टॅरिफ युद्ध' सुरूच राहिले आणि मध्यपूर्वेतील तणाव आणखी वाढला तर सोने यावर्षी १ लाख ९० हजारांपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. तर चांदी ४ लाखांचा टप्पा गाठू शकते. (तभा वृत्तसेवा)

## महत्वाचे...



### कामटे विचारमंचतर्फे सुभाषचंद्र बोस, बाळासाहेब ठाकरे जयंती साजरी

**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

शाहिद अशोक कामटे विचारमंच तर्फे नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती आणि बाळासाहेब ठाकरे जयंती निमित अभिवादन बलिदान चौक सोलापूर याठिकाणी प्रमुख अतिथी आस्था सामाजिक संस्थेचे आनंद तालिकोटी यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. यावेळी शाहिद अशोक कामटे विचारमंच अध्यक्ष योगेश कुंदूर, सुरेश शहापूरकर, वैशाली गुंड, सुरेश जगताप, सुशिलकुमार व्यास, शिवकुमार कटके, मयुर गवते, धमेंद्र कर्पेकर, गिरिष विजापूरे, सावळगी, विकास कुंदूर, जगदीश कोरे, राजू पालकर, मुददसर तांबोळी, दिपक उपळकर, संतोष विजापुरे, अमर स्वन्ने, मोटे उपस्थित होते.



### महावीर हायस्कूलमध्ये दहावी व्याख्यानमालेस प्रारंभ

**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

एसएससी बोर्ड परीक्षा फेब्रुवारी-मार्च:२०२६च्या पूर्णांशाने तयारी करिता महावीर हायस्कूल मध्ये विषय-व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. व्याख्यानाचे पहिले पुष्प जेष्ठ तज्ञ मार्गदर्शक अभिनंदन विभुते सर यांनी इंग्रजी विषयासाठी गुंफले. प्रारंभी व्याख्याते व मुख्याध्यापिका उज्ज्वला पाटील यांच्या शुभहस्ते सरस्वती प्रतिमा पूजन करण्यात आले. तद्नंतर व्याख्यान मार्गदर्शन वर्गास सुरुवात झाली. सदर वर्गात प्रशालेतील इ.१०वी विद्यार्थ्यांसोबत इ.९च्या विद्यार्थीही सहभागी झाले आहेत. एस. एस. सी. बोर्ड परीक्षा मार्च २०२६साठी उत्तर पत्रिका लेखन, व्याकरण, पत्रलेखन,अनसीन-सीन पॅसेज तसेच प्रश्न पत्रिका सोडविण्यासाठी वेळेचे नियोजन संबंधी यथायोग्य मार्गदर्शन व्याख्याते विभूते सरांनी केले. मुख्याध्यापिका उज्ज्वला पाटील यांनी व्याख्याते विभूते सरांचा शाल-श्रीफल-गुच्छ देऊन आभार मानले आणि सदर मार्गदर्शनाचा विद्यार्थ्यांना लाभ होईलच,अशी अपेक्षा व्यक्त केली.



### अध्यापक विद्यालयामध्ये क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन

**पंढरपूर, दि.२३ जानेवारी -**

येथील अध्यापक विद्यालयांमध्ये क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेचे उद्घाटन करण्यासाठी सोलापूर जिल्हा प्रशिक्षण संस्था वेळापूर येथील ज्येष्ठ अधिव्याख्याता प्रमुख पाहुण्या म्हणून क्रांती कुलकर्णी या उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन केले या प्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच.आर. वाघमारे उपस्थित होते. या क्रीडा स्पर्धा पुढील सात दिवस चालणार असून यामध्ये विविध खेळांचे आयोजन करण्यात आलेले आहे. या स्पर्धा निकोप आणि दर्जेदार, खिलाडी वृत्तीने व्हाव्यात असे मुलांना आवाहन केले. शारीरिक तंदुरुस्तीसाठी व्यायाम आणि खेळाचे महत्व त्यांनी पटवून सांगितले. याचवेळी विद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाघमारे यांनी या स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्या सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. यानंतर प्रमुख पाहुण्या सौ. कुलकर्णी यांनी स्पर्धेसाठी नाणेफेक करून पहिला सामना खो-खो या खेळाचा खेळाला गेला. यासाठी सुरुवात करून दिली. या स्पर्धा दरवर्षी विद्यालयात मोठ्या उत्साहाने पार पडत असतात. यासाठी संस्थेचे मानद सचिव एस. आर. पटवर्धन, सदस्य एस.पी.कुलकर्णी यांचे नेहमीच मोलाचे सहकार्य लाभते.

# 'चमत्कार नसतो, असते फक्त हातचलाखी' कासारवाडीत श्रमसंस्कार शिबिरात प्रबोधन



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२३ जानेवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर आणि श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत मौजे कासारवाडी येथे आयोजित सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिराच्या पाचव्या दिवशी 'वैज्ञानिक दृष्टिकोन आणि शिक्षण' या विषयावर प्रा. हेमंत शिंदे यांचे प्रभावी व प्रबोधनात्मक व्याख्यान पार पडले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सचिव सुरेश जगदाळे होते. आपल्या व्याख्यानात प्रा. हेमंत शिंदे यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारण्याचे महत्त्व, निरीक्षण, प्रयोग आणि तर्कशुद्ध विचारांची गरज यावर सखोल मार्गदर्शन केले. विविध प्रात्यक्षिकांद्वारे त्यांनी अंधश्रद्धांचे भांडाफोड करत समाजाला विचार करायला भाग पाडले.

'अंधश्रद्धा ही डोके हलवण्याची नाही तर डोके चालवण्याची वेळ आहे', 'जगात चमत्कार नसतो, असते फक्त हातचलाखी; चमत्कार करणारा भामटा असतो आणि चमत्काराला नमस्कार करणारा मूर्ख असतो', अशा परखड शब्दांत त्यांनी तरुणांना व ग्रामस्थांना जागृत केले. त्यांच्या या विचारांनी उपस्थितांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाची नवी जाणीव निर्माण झाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्याणी पिंगळे, दिव्या शिंदे हिने पाहुण्यांचा परिचय करुन दिला तर श्रावणी शिंदे हिने प्रस्तावना मांडली. निखिल नाळे याने आभार प्रदर्शन केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. एम. ए. ढगे, प्रा. के. एम. माळी, कासारवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सुधाकर बडे, सुलाखे कॉमर्स कॉलेजच्या ज्युनिअर विभागातील शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

शिबिरातील स्वयंसेवक व स्वयंसेविकांनी शिस्तबद्ध व उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. एकाच दिवशी तीन समाजोपयोगी उपक्रमांनी कासारवाडी गाजले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराचा पाचवा दिवस अत्यंत उपयुक्त आणि जनजागृतीपर ठरला. या दिवशी मोफत आरोग्य तपासणी शिबिर, किशोरवयीन मुलींसाठी मार्गदर्शन कार्यक्रम आणि अंधश्रद्धा निर्मूलनावर जनजागृती असे तीन महत्त्वाचे उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमांचा ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. विशेषतः अंधश्रद्धा निर्मूलनावरील प्रबोधनामुळे गावामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, विवेकवाद आणि सामाजिक जाणीव अधिक बळकट झाल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.



# एलबीपीएम महाविद्यालयात विद्यापीठस्तरीय कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात बी.ए. भाग दोन हिंदी अभ्यासक्रमाची नवीन शैक्षणिक धोरणानुसार परिवर्तित अभ्यासक्रम कार्यशाळा संपन्न झाली.

कार्यशाळेचे उद्घाटन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कला अधिष्ठाता व सोलापूर असोसिएशन आर्टस् अँड कॉमर्स कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. आय. जे. तांबोळी यांनी केले. हिंदी अभ्यास मंडळाचे प्रमुख प्रो. अनिल साळुंखे हे अध्यक्षस्थानी होते. यावर्षी सात विषयाच्या परिवर्तित अभ्यासक्रम ावर विषयतज्ञ प्रो. गिरीश काशिद, डॉ. मालोजी जगताप, डॉ. नवनाथ शिंदे, डॉ. निवृत्ती लोखंडे, डॉ. सुचिता गायकवाड, प्रो. सतीश घोरपडे, प्रो. दादासाहेब खांडेकर यांनी मार्गदर्शन केले तर प्रो. भगवान आदटराव, प्रो. गिरीश काशिद, डॉ. संजय मुजमुले, डॉ. मनीषा साळुंखे, डॉ. किसन वाघमोडे, डॉ. संगीता भोसले, प्रो. सौदागर साळुंखे यांनी अध्यक्षीय मनोगत मांडले.

प्रारंभी कर्मवीर अण्णा व रयत माऊली लक्ष्मीबाई पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक प्रो.किशोर पवार यांनी व आभार डॉ. देवराव मुंडे यांनी व्यक्त केले डॉ. अलका घोडके व डॉ. संजय मुजमुले यांनी सूत्रसंचालन केले. सामूहिक राष्ट्रगीताने सांगता झाली.

# नागरिकांमध्ये जनजागृती होण्यासाठी रस्ता सुरक्षा रॅली



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार दरवर्षीप्रमाणे यंदाही रस्ता सुरक्षा अभियान-२०२६ अंतर्गत सोलापूर जिल्ह्यात विविध उपक्रम राबविण्यात येत असून, नागरिकांमध्ये वाहतूक नियमांबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने सीट बेल्ट व हेल्मेट रॅलीचे आयोजन करण्यात आले.

प्रादेशिक परिवहन कार्यालय येथून दिनांक २२ जानेवारी रोजी सकाळी ८.१५ वाजता या रॅलीस प्रारंभ झाला. रॅलीचे उद्घाटन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील, व सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी असिफ मुल्लाणी यांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमामुळे वाहतूक नियमांबाबत जनजागृती होऊन जिल्ह्यातील अपघातांचे प्रमाण कमी करण्यास मदत होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

रॅलीचा मार्ग प्रादेशिक परिवहन कार्यालय, कंबर तलाव, सात रस्ता, रेल्वे स्टेशन, भैय्या चौक, रामलाल चौक, पार्क चौक, डफरीन चौक, रंगभवन, सात रस्ता, गांधी नगर, होटगी रोड, आसरा चौक, डी-मार्ट, दावत चौक, भारती विद्यापीठ मार्गे पुन्हा प्रादेशिक परिवहन कार्यालय असा होता. या रॅलीमध्ये परिवहन विभागाचे अधिकारी व कर्मचारी, वाहतूक शाखेचे अधिकारी व कर्मचारी, ड्रायव्हिंग स्कूलचे प्रतिनिधी तसेच बाईकर्स ग्रुप सोलापूरचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



# उंबरे-पागे येथे मातापालकांचे हळदी-कुंकू उत्साहात

**तभा वृत्तसेवा.**
**करकंब,दि.२३ जानेवारी-**

विद्या विकास मंदिर व कर्मवीर सुधाकरपंत परिचारक कनिष्ठ महाविद्यालय उंबरे (पागे) येथे मकर संक्रांतीचे औचित्य साधून मातापालक हळदी,कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

मातापालकांची मुलांच्या शिक्षणातील योगदानाची प्रशंसा त्यांचा गुणगौरव तसेच त्यांच्या पालकत्वाच्या जबाबदारीबद्दल चर्चा करून मार्गदर्शन करण्यात आले. त्यांच्या मुलांचे शिक्षण, आरोग्य व सामाजिक जाणीवेबाबत जागृती निर्माण करणे, शिक्षणात माता पालकांचा सक्रिय सहभाग वाढावा, त्यांना प्रोत्साहन देऊन त्यांचा गुणगौरव करावा या उद्देशाने प्रशालेच्यावतीने या मातापालक हळदी,कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी मुख्याध्यापक शहाजी पाटील यांनी मार्गदर्शन केले. उंबरे परिसरातील असंख्य महिला भगिनी, विद्यार्थिनी, युवती मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून संचालिका मेकअप आर्टिस्ट मोनाली ढोबळे तर अध्यक्षस्थानी शेवंताबाई ढोबळे उपस्थित होत्या. शिक्षिका उर्मिला बुगड, सुप्रिया पाटील, अपर्णा जोशी, पूजा रजपूत तसेच प्रशालेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

> मातापालकांनी आपल्या पाल्यांमध्ये सांस्कृतिक मूल्याची जोपासना करण्यासाठी प्रयत्न करावेत. माझी शाळा हे माझे माहेरघर असून ते केवळ शिक्षणाचे केंद्र नसून ज्ञानाचे मंदिर आणि माझ्या जडणघडणीचे ठिकाण आहे.येथील प्रेमळ व शिस्तप्रिय शिक्षकांमुळे मला जीवनात खूप काही शिकावयास मिळाले.मला या शाळेची विद्यार्थिनी असल्याचा अभिमान वाटतो.
>
> **-मोनाली ढोबळे, मेकअप आर्टिस्ट.**

# 'सिंहगड'चा 'उमंग' सांस्कृतिक महोत्सव उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव, सोलापूर येथे विद्यार्थ्यांच्या कला, संस्कृती व सर्जनशीलतेला व्यासपीठ देणारा वार्षिक सांस्कृतिक महोत्सव 'उमंग २K२६' उत्साहात पार पडला.

महोत्सवात रांगोळी, मेहंदी, छायाचित्रण, फेस पेंटिंग, कार्टून/स्पॉट पोस्टर, कोलाज, क्ले मॉडेलिंग, इन्स्टॉलेशन, क्विझ, वक्तृत्व (मराठी, हिंदी, इंग्रजी), वादविवाद, एकल व समूह गायन, एकल व समूह नृत्य, स्ट्रीट प्ले, फॅशन शो अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

स्पर्धांमध्ये ई अँड टीसी विभागाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत सांस्कृतिक विभागाची सर्वसाधारण चषक विजेती म्हणून बाजी मारली. मिस्टर सिंहगड हा मानाचा किताब यशदीप शिंदे (जनरल सायन्स इंजिनिअरिंग) यांनी तर मिस सिंहगड हा किताब किरण सुरवसे (कॉम्प्युटर सायन्स इंजिनिअरिंग) यांनी पटकावला. याचबरोबर गोल्डन बॉय यशदीप शिंदे आणि गोल्डन गर्ल गायत्री फवाडे यांना गौरवण्यात आले. विविध स्पर्धांमध्ये ETC, जनरल सायन्स इंजिनिअरिंग, CSE, सिव्हिल व इलेक्ट्रिकल विभागांच्या विद्यार्थ्यांनी विजेतेपदे मिळवत आपली कला सादर केली. विशेषतः वक्तृत्व, कला प्रकार, नृत्य व सादरीकरण स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. 'उमंग २K२६' हा महोत्सव विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय अनुभव ठरला. कार्यक्रम कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य डॉ. शंकर नवले यांच्या नेतृत्वाखाली डॉ. सुवर्णा क्षीरसागर, डॉ. करीम म ुजावर, प्रा. शशिकांत हिप्परगी, प्रा. मानसी जाधव यांनी योगदान लाभले.



# आसावा प्रशालेचे आर्यन माळी, सोहम बिराजदार संयुक्त विजेते

### माने तंत्रनिकेतनमध्ये राज्य विज्ञान प्रदर्शनात २०० शाळांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

ब्रह्मदेवदादा माने पॉलिटेक्निक येथे झालेल्या राज्य विज्ञान प्रदर्शनात दयानंद काशीनाथ आसावा प्रशालेच्या आर्यन माळी, सोहम बिराजदार यांनी संयुक्त विजेतेपद पटकाविले.

या प्रदर्शनात राज्यातील २०० शाळांनी भाग घेतला होता. यात एक हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी आपल्या कलाकृती 'मॉडेल' तसेच 'पोस्टर'च्या माध्यमातून सादर केल्या. याचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार दिलीपराव माने, सचिवा जयश्रीताई माने, उपाध्यक्ष डॉ. पृथ्वीराज माने, एन्कोरा कंपनीचे टेक लीड डॉ. दिनेश झेंडे, प्राचार्य डॉ. श्रीकांत जोशी, संकुल संचालक प्रा. राहुल माने, समन्वयक प्रा. शशिकांत फुलारी, प्रा.पवन माने, बीएमआयटीचे प्राचार्य कुलकर्णी आर. डी., लिटल हार्ट स्कूलचे प्रा. तारके ए. व्ही. यांच्या प्रमुख उपस्थितीत दीप प्रज्वलनाने झाले. प्राचार्य डॉ. जोशी यांनी प्रास्ताविक केले.



पारितोषिके संस्थेच्या सचिवा जयश्रीताई माने, उपाध्यक्ष डॉ. पृथ्वीराज माने, संकुल संचालक प्रा. राहुल माने, प्राचार्य डॉ.जोशी यांच्या हस्ते देण्यात आली. आठवी, नववी, व दहावी या गटात ५१ हजार रुपयांची बक्षिसे वितरित करण्यात आली. सूत्रसंचालन प्रा. नितीन जाधव, तर आभार प्रदर्शन प्रा. शशिकांत फुलारी यांनी केले.

**गुणानुक्रमे प्रथम तीन पारितोषिक विजेते**

**मॉडेल :** इयत्ता आठवी : आर्यन माळी, सोहम बिराजदार (आसावा हायस्कूल), पृथ्वीराज शिंदे (नागेश करजगी ऑर्किड स्कूल), अनघा पडवळकर, अनुष्का घाडगे (इंडियन मॉडेल स्कूल). इयत्ता नववी : स्पर्श ढवळे (सिंहगड पब्लिक स्कूल), अथर्व डोड्याले, गणेश शिंदे, अमित डोके (नागेश करजगी ऑर्किड स्कूल), श्रेया अधटराव (के. एल. ई. इंग्लिश मीडियम स्कूल). इयत्ता दहावी : आरती लांगले (महात्मा जीएम स्कूल), बुसरा शहापुरे, जारा शेख (एम. ए. पानगल उर्दू हायस्कूल) प्रणय गायकवाड, रोहन मुदगल, संजय पांगे (ज्ञानदीप स्कूल).

**पोस्टर :** इयत्ता आठवी : अखिलेश कोरे (सिद्धेश्वर इंग्लिश स्कूल), श्रेयस प्रधान, मोहित बनसोडे, अनिकेत प्रधान (आसावा हायस्कूल), निवेदिता चिन्हाकिंडी, लहरी येलगेटी, चन्नम्मा बुक्का, मेघना पाणीभाटे (राजराजेश्वरी हायस्कूल). इयत्ता नववी : जोया शेख (नॅशनल उर्दू हायस्कूल), श्रुती स्वामी (सिद्धेश्वर गर्ल्स हायस्कूल), प्रिया यादव (श्री डी. व्ही. ढेपे इंग्लिश स्कूल). इयत्ता दहावी : गुंड वैभवी (निर्मलाताई प्रशाला), भाग्यश्री हिरेमठ (हार्ट इंग्लिश मीडियम स्कूल), सतीश बंडा (राजराजेश्वरी हायस्कूल).

# 'ऑर्किड'मध्ये आंतरराष्ट्रीय इंटर्नशिपचा समारोप

### इंडो-फ्रेंच शैक्षणिक सहकार्याचा सोलापूरसाठी नवे मैलाचे पाऊल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

इन्स्टिट्यूट सुपारीयो दे मेकॅनिक द पॅरिस येथील चार विद्यार्थ्यांनी ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयात पाच महिन्यांची इंटर्नशिप यशस्वीरीत्या पूर्ण केली. जोना ब्रुआस, ॲड्रियन लस्ट, निकोलस बोर्त व व्हिक्टर हॉर्मंड यांनी ऑर्किड महाविद्यालयाच्या १६ भारतीय विद्यार्थ्यांसोबत मेकॅट्रॉनिक्स व एअरोस्पेस क्षेत्रातील अत्याधुनिक प्रकल्पांवर काम केले.

तळेहिप्परगा येथील नागेश करजगी ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयाने फ्रान्स मधील 'इन्स्टिट्यूट सुपारीयो दे मेकॅनिक द पॅरिस यांच्यासोबत सामंजस्य करार केला. दरवर्षी दोन्ही संस्थांकडून सहा विद्यार्थ्यांची देवाणघेवाण करता येणार आहे. या करारानुसार पॅरिस येथील चार विद्यार्थ्यांनी एआय-नियंत्रित सौरऊर्जेवर चालणारे सेल्फ-बॅलन्सिंग वाहन, पिक अँड प्लेस रोबोट, क्वाडकॉप्टर ड्रोन तसेच एअरोस्पेससाठी हलके व जैवविघटनशील (इको-कॉम्पोझिट) साहित्य विकास प्रकल्पांवर काम केले. या सर्व प्रकल्पांचे मार्गदर्शन उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास मेतन व डॉ. व्ही. एस. हिरेमठ यांनी केले. इन्स्टिट्यूट सुपारीयो दे मेकॅनिक द पॅरिस विद्यार्थ्यांची सोलापूरमध्ये झालेली ही पहिलीच पाच महिन्यांची इंटर्नशिप ठरली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे असिस्टंट सुप्रिटेंडन्ट ऑफ पोलीस राहुल आत्राम यांनी आपल्या भाषणात मेकॅट्रॉनिक्स क्षेत्रातील आंतरशाखीय प्रकल्पांचे वाढते महत्त्व अधोरेखित केले. आजच्या जागतिक औद्योगिक गरजा, तंत्रज्ञानातील झपाट्याने होणारे बदल व सद्यःकालीन आव्हाने पेलण्यासाठी यांत्रिकी व इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकीचा एकत्रित सहभाग अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. के. सोनगे यांनी ऑर्किड महाविद्यालयाच्या आंतरराष्ट्रीयीकरण धोरणाचा आढावा घेतला. समारोप कार्यक्रमाला वरिष्ठ पोलीस इन्स्पेक्टर राहुल देशपांडे, डॉ. ए. बी. मगर उपस्थित होते. परस्पर देवाणघेवाणी अंतर्गत ऑर्किड महाविद्यालयाचे दोन विद्यार्थी १६ फेब्रुवारी २०२६ रोजी इन्स्टिट्यूट सुपारीयो दे मेकॅनिक द पॅरिस येथे चार महिन्यांच्या पूर्ण शिष्यवृत्तीवर आधारित इंटर्नशिपसाठी जाणार आहेत. तसेच मागील तीन वर्षांत पॉलिटेक नॅन्सी येथील सात फ्रेंच विद्यार्थ्यांनी सोलापूरमध्ये इंटर्नशिप पूर्ण केली असून, त्याच कालावधीत ऑर्किड कॉलेजचे सहा विद्यार्थी फ्रान्समध्ये पूर्णतः अनुदानित इंटर्नशिपसाठी गेले आहेत. सूत्रसंचालन वर्षा शिरसागर व वैष्णवी माशाले यांनी केले तर आभार डॉ. ए. बी. मगर यांनी मानले.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





## २३ एप्रिलला उघडणार बद्रीनाथ धामचे कपाट

◆ **चमोली, २३ जानेवारी**

उत्तराखंडमधील चमोली येथे असलेल्या बद्रीनाथ धामचे दरवाजे यावर्षी २३ एप्रिल रोजी उघडतील. तर, उत्तरकाशी येथील गंगोत्री धाम आणि यमुनोत्री धामचे दरवाजे १९ एप्रिल रोजी भक्तांसाठी विधीपूर्वक उघडले जातील.

वसंत पंचमीच्या मुहूर्तावर नरेंद्र नगर राजवाड्यात विधीपूर्वक बद्रीनाथ धामचे दरवाजे उघडण्याच्या तारखेची अधिकृत घोषणा करण्यात आली. परंपरेनुसार, राजपुरोहित महाराजा मनुजेंद्र शाह यांची जन्मपत्रिका आणि लग्नपत्रिका पाहून शुभ मुहूर्त काढतात.

राजपुरोहित कृष्ण प्रसाद उनियाल यांच्या मते, शुभ मुहूर्त निश्चित झाल्यानंतर बोलंदा बद्रीश महाराजांकडून त्याची घोषणा केली जाते. टिहरी राजघराणे शतकानुशतके ही परंपरा पाळत आले आहे आणि पुढेही ती सुरू ठेवण्याचे म्हटले आहे.

यावेळी यात्रेच्या तयारीचा भाग म्हणून ७ एप्रिल रोजी गाडू घडा-तिळाच्या तेलाची परंपरा देखील पाळली जाईल, जी बद्रीनाथ धामच्या यात्रा तयारीचा महत्त्वाचा भाग मानली जाते. (वृत्तसंस्था)

# काही तासांतच इराण हुकूमशाहीतून मुक्त

## ट्रम्प यांचा दावा, सैन्य हल्ल्यासाठी सज्ज





◆ **दावोस, २३ जानेवारी**

अमेरिकेच्या नौदलाचा ताफा आणि लढाऊ विमाने इराणच्या दिशेने निघाली आहेत. काही तासांतच हुकूमशाहीचा अंत होईल आणि निदर्शकांची तुरुंगातून सुटका होणार असल्याचा दावा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला.

स्वित्झर्लंडच्या दावोस येथून मायदेशी परतताना प्रसार माध्यमांशी बोलताना ट्रम्प म्हणाले, ''अमेरिका इराणच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवून आहे आणि अमेरिकेचा एक मोठा नौदल ताफा त्या दिशेने निघाला आहे. काही तासांतच इराण हुकूमशाहीतून मुक्त होईल. आम्हाला युद्ध नको आहे, बळाचा वापर शेवटचा उपाय असेल. निदर्शकांवर बेछूट गोळीबार करणे मानवाधिकारांचे उल्लंघन आहे. इराणच्या नेतृत्वाला आम्ही शेवटची संधी देत आहोत. त्यांनी निदर्शकांवर बळाचा वापर करणे बंद करावे अन्यथा त्यांना मोठी किंमत चुकवावी लागेल. माझ्या माहितीनुसार निदर्शने करणाऱ्या पाच हजारांपेक्षा अधिक लोकांना ठार करण्यात आले, तर १२ हजारहून अधिक लोकांना तुरुंगात डांबण्यात आले.'' (वृत्तसंस्था)

### कोणत्याही परिस्थितीसाठी आम्ही सज्ज



ट्रम्प यांच्या धमकीला प्रत्युत्तर देताना इराणी लष्कराचे कमांडर जनरल मोहम्मद पाकपौर यांनी एका वृत्तसंस्थेशी बोलताना म्हटले की, अमेरिकेने १२ दिवस चाललेल्या युद्धातून धडा घ्यायला हवा. आमच्या देशावर हल्ला केल्यास त्यांना गंभीर परिणाम भोगावे लागेल. आमचे बोट ट्रिगरवर आहे आणि आम्ही सर्वोच्च कमांडर इन चीफच्या आदेशांचे पालन करण्यास पूर्णपणे तयार आहोत, जे आम्हाला आमच्या जीवापेक्षाही प्रिय आहेत.

### ८०० निदर्शकांची फाशी रद्द नाही, ट्रम्प तोंडघशी

इराणी सरकारच्या ताब्यात असलेल्या ८०० निदर्शकांना देशद्रोहाच्या आरोपात सर्वोच्च न्यायालयाने फाशी शिक्षा सुनावली आहे आणि ती कायम असल्याची माहिती सरकारी वकील मोहम्मद मोवाहेदी यांनी दिली. ट्रम्प यांचा दावा फेटाळून लावताना त्यांनी सांगितले, की कोणत्याही देशाच्या दबावात फाशीची शिक्षा रद्द झालेली नाही.निदर्शकांची फाशी रद्द झाल्याची ट्रम्प यांची टिप्पणी दिशाभूल करणारी असल्याचेही त्यांनी नमूद केले. मोवाहेदी यांच्या माहितीमुळे ट्रम्प पुन्हा तोंडघशी पडले आहे.



जम्मू-काश्मिरात जोरदार बर्फवृष्टी सुरू आहे. खोऱ्याबरोबरच जम्मू विभागातही पांढरी चादर पसरली आहे. वाहने बर्फाने झाकली गेली असून रस्त्यांवर बर्फाचे थर साचले आहेत

# बाळासाहेबांचे नेतृत्व आजही प्रेरणादायी

## पंतप्रधान मोदींची खास मराठीतून पोस्ट

◆ **नवी दिल्ली, २३ जानेवारी**

महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय जीवनावर खोलवर प्रभाव टाकणाऱ्या हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठीतून आदरांजली वाहिली आहे. या विशेष प्रसंगी पंतप्रधान मोदी यांनी आपल्या सोशल मीडिया अकाउंटवरून एक खास पोस्ट शेअर करत बाळासाहेबांच्या स्मृतींना उजाळा दिला आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या पोस्टमध्ये बाळासाहेब ठाकरे यांच्या सामाजिक आणि राजकीय योगदानावर प्रकाश टाकला आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक-राजकीय परिदृश्यावर खोलवर प्रभाव टाकणारे दिवंगत मा. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त या दिग्गज व्यक्तिमत्त्वाला भावपूर्ण आदरांजली, अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. मराठी भाषेतून करण्यात आलेल्या या पोस्टमुळे शिवसैनिकांमध्ये आणि बाळासाहेबांवर प्रेम करणाऱ्या लाखो समर्थकांमध्ये विशेष भावनिक वातावरण निर्माण झाले आहे. पंतप्रधानांनी मराठीतून संदेश देत बाळासाहेबांच्या विचारांप्रती असलेला आदर पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे. (वृत्तसंस्था)

# आंतरराष्ट्रीय राजकारणात मोदी-जिनपिंग ट्रम्पच्या पुढे!

◆ **वॉशिंग्टन, २३ जानेवारी**

आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकप्रियतेच्या बाबतीत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यापेक्षा पुढे आहेत. आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ इयान ब्रेमर नरेंद्र मोदी ट्रम्पच्या तुलनेत अधिक शक्तिशाली आणि मजबूत स्थितीत आहेत. जिनपिंग दीर्घकाळ सत्तेत असून कोणत्याही स्वतंत्र संस्थात्मक आव्हानांना तोंड देण्याची गरज नसल्यामुळे ते ट्रम्पपेक्षा अधिक स्थिर आणि प्रभावी असल्याचे ब्रेमर म्हणाले.





दीर्घकाळ सत्तेत राहण्यामुळे मोदींना धोरणात्मक निर्णय दूरगामी पद्धतीने घेता येतात, तसेच आंतरराष्ट्रीय दबावांना तोंड देण्याची क्षमता टिकते. याउलट, ट्रम्प किंवा अनेक युरोपीय नेत्यांना सततच्या निवडणूक दबावामुळे किंवा राजकीय अस्थिरतेमुळे दीर्घकालीन निर्णय घेणे कठीण जाते. पंतप्रधान मोदींच्या सातत्यपूर्ण धोरणात्मक भूमिकेमुळे ते अनेक युरोपीय नेत्यांपेक्षा अधिक प्रभावी आहेत, ज्यामुळे ते आंतरराष्ट्रीय धोरणांमध्ये आपले मत दृढपणे मांडू शकतात,असे ब्रेमर यांनी सांगितले.

ट्रम्प यांनी गुरुवारी हमास आणि इस्रायलमधील युद्धबंदी कायम ठेवण्यासाठी त्यांच्या प्रस्तावित 'पीस बोर्ड' चे औपचारिक अनावरण केले. तथापि, अनेक पारंपरिक अमेरिकन मित्र राष्ट्रांनी या उपक्रमापासून स्वतःला दूर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. रशियाने बोर्डात सामील होण्याचा विचार करणार असल्याचे सांगितले, तर ब्रिटनने स्पष्टपणे नकार दिला. फ्रान्सच्या नकारानंतर नॉर्वे आणि स्वीडननेही बोर्डात सामील न होण्याचे संकेत दिले आहेत. (वृत्तसंस्था)

## शिमला-मनालीत वर्षातील पहिली हिमवृष्टी

◆ **नवी दिल्ली, २३ जानेवारी**

हिमाचल प्रदेशातील अनेक भागांमध्ये थंडी वाढली आहे. शिमला आणि मनाली येथे यंदाच्या वर्षातील पहिली हिमवृष्टी झाली आहे. कांगडा आणि चंबा जिल्ह्यांमध्ये पावसाने हजेरी लावली असून काही भागांत वीजपुरवठा खंडित झाला आहे. शिमलामध्ये मंगळवारी रात्रीपासून जोरदार वारे वाहत असल्याने थंडी अधिक तीव्र झाली आहे.

गुरुवारी सकाळी बार्थिन, हमीरपूर, बिलासपूर, उना, मंडी आणि कांगडा या भागांत थंडीची लाट जाणवली. राज्यातील सुमारे वीस प्रमुख ठिकाणी किमान तापमान ५ अंश सेल्सिअसपेक्षा कमी नोंदवले गेले. हवामान विभागाने २३ जानेवारीसाठी लाहौल-स्पिती, चंबा आणि कुल्लू जिल्ह्यांमध्ये हिमवृष्टीचा इशारा दिला आहे. (वृत्तसंस्था)



जम्मू-काश्मीरमधील डोडा जिल्ह्यात गुरुवारी लष्कराचे वाहन ४०० फूट खोल दरीत कोसळल्याने १० जवान हुतात्मा झाले. या जवानांना शुक्रवारी लष्करी तळावर मानवंदना देण्यात आली

# विशाखापट्टणम रेल्वे स्टेशनवर रोबोट तैनात

◆ **विशाखापट्टणम, २३ जानेवारी**

भारतीय रेल्वेत प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि सेवा सुधारण्यासाठी एक नवा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. विशाखापट्टणम रेल्वे स्थानकावर 'एएससी अर्जुन' नावाचा मानवरूपी रोबोट तैनात करण्यात आला असून, हा पहिला असा उपक्रम आहे. पूर्व किनारी रेल्वे (ईसीआर) झोनच्या वॉल्टेअर विभागाने प्रवाशांची सुरक्षा, सेवा वितरण आणि सुरक्षा उपाय मजबूत करण्यासाठी हा रोबोट आरपीएफ (रेल्वे संरक्षण दल) अंतर्गत तैनात केला आहे.



आरपीएफचे महानिरीक्षक आलोक बोहरा यांनी सांगितले की, प्रवासी सुरक्षा, सुरक्षा आणि सेवा सुधारण्यासाठी विशाखापट्टणम रेल्वे स्थानकावर हा मानवरूपी रोबोट तैनात केला आहे. विभागीय रेल्वे व्यवस्थापक ललित बोहरा यांनी माहिती दिली की, हा रोबोट प्रगत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), इंटरनेट ऑफ थिंग्ज कनेक्टिव्हिटी आणि रिअल-टाइम मॉनिटरिंग क्षमतांनी सज्ज आहे. त्यामुळे तो आरपीएफ कर्मचारी आणि प्रवाशांसाठी स्मार्ट सहाय्यक म्हणून काम करेल.

'एएससी अर्जुन' रोबोट गर्दी व्यवस्थापन, सुरक्षा देखरेख, स्वच्छता देखरेख आणि सुरक्षा जागरूकता वाढवण्याचे काम करेल. मानवी संसाधनांवरील भार कमी करणे आणि प्रतिसाद वेळ सुधारण्याच्या उद्देशाने त्याची रचना करण्यात आली आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की हा रोबोट पूर्णपणे स्वदेशी नवोपक्रमाद्वारे विकसित केला गेला आहे. (वृत्तसंस्था)

**प्रजासत्ताक दिन परेड**

# पहिल्यांदाच महिला अग्निवीरांचा सहभाग

◆ **नवी दिल्ली, २३ जानेवारी**

देशाच्या इतिहासात प्रथमच, ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये नऊ महिला अग्निवीर भारतीय हवाई दलाच्या बँडचा भाग असतील, त्यांच्या वाद्यांवर मधुर संगीताच्या तालावर मार्च करतील.

भारतीय हवाई दलाने येथे पत्रकार परिषदेत सांगितले की, २६ जानेवारी रोजी राष्ट्रध्वज फडकवताना फ्लाइट लेफ्टनंट अक्षिता धनखड राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्यासोबत असतील. एका अधिकाऱ्याने सांगितले की, सार्जंट चार्ल्स अँटनी डॅनियल यांच्या नेतृत्वाखालील हवाई दलाच्या बँडसोबत स्क्वाड्रन लीडर जगदीश कुमार यांच्या नेतृत्वाखाली १४४ एअरमनचा मार्चिंग दल असेल. त्यांनी असेही सांगितले की, स्क्वाड्रन लीडर निकिता चौधरी, फ्लाइट लेफ्टनंट प्रखर चंद्रकर आणि फ्लाइट लेफ्टनंट दिनेश मुरली हे भारतीय हवाई दलाच्या तुकडीत अतिरिक्त अधिकारी म्हणून काम करतील.

यामध्ये गेल्या वर्षी मे महिन्यात झालेल्या ऑपरेशन सिंदूरच्या यशाचे स्मरण करण्यासाठी एक विशेष फ्रंट-लाइन फॉर्मेशन देखील समाविष्ट असेल. हवाई मुख्यालयातील समारंभ संचालनालयाचे एअर कमोडोर इम्रान एच. झैदी यांनी सांगितले की, ७५ सदस्यीय भारतीय हवाई दलाच्या बँडमध्ये ६६ अग्निवीर असतील आणि उर्वरित एअरमन असतील.



अग्निवीर तुकडीत नऊ महिला अग्निवीर

त्यांनी पुढे सांगितले की, या ६६ व्या अग्निवीर तुकडीत नऊ महिला अग्निवीर असतील आणि परेडमध्ये त्या पहिल्यांदाच भारतीय हवाई दलाच्या बँडचा भाग असतील. स्क्वाड्रन लीडर कुमार (३३) म्हणाले, प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये सहभागी होण्याची ही माझी पहिलीच वेळ आहे. कर्तव्यपथावर माझ्या सेवेचे प्रतिनिधित्व करण्याचा मला खूप अभिमान आहे.

मूळचे तामिळनाडूचे असलेले स्क्वॉड्रन लीडर कुमार यांचे वडील निवृत्त राज्य सरकारी अधिकारी आहेत आणि त्यांची आई शाळेत शिक्षिका आहे. डिसेंबर आणि जानेवारीच्या कडक हिवाळ्यात दिल्लीत सराव करताना येणाऱ्या आव्हानांना त्यांनीही सामोरे जावे लागले. सशस्त्र दलात सहभागी होणारे ते त्यांच्या कुटुंबातील पहिले आहेत. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### 'होमबाऊंड'ऑस्करच्या शर्यतीतून बाहेर

**मुंबई :** ऑस्कर २०२६ च्या नामांकनाची घोषणा नुकतीच करण्यात आली. यावेळी भारतीय प्रेक्षकांची नजर 'होमबाऊंड' या चित्रपटावर होती, पण या चित्रपटाला अंतिम नामांकन यादीत स्थान मिळवता आले नाही. ऑस्कर पुरस्कार सोहळा १५ मार्च रोजी होणार आहे. नीरज घेवान दिग्दर्शित 'होमबाउंड' हा चित्रपट भारताची अधिकृत एंट्री होती. हा चित्रपट ऑस्करच्या टॉप १५ शॉर्टलिस्टमध्ये नक्कीच पोहोचला, पण टॉप ५ नामांकित चित्रपटांमध्ये त्याचा समावेश होऊ शकला नाही. जर हा चित्रपट निवडला गेला असता, तर आमीर खानच्या 'लगान' चित्रपटानंतर आंतरराष्ट्रीय फीचर फिल्म श्रेणीत नामांकित होणारा हा पहिला भारतीय चित्रपट ठरला असता.





### 'पुष्पा ३' मध्ये दिसणार सलमान खान

**हैदराबाद :** अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा' चित्रपटाच्या दोन्ही भागांनी प्रेक्षकांचे मन जिंकले आहे. आता चाहत्यांचे लक्ष तिसऱ्या भागाकडे लागले आहे. विशेष म्हणजे, या तिसऱ्या भागात सलमान खान दिसणार असल्याची जोरदार चर्चा आहे. 'पुष्पा ३' मध्ये सलमान एका प्रभावशाली आणि गूढ पात्राच्या भूमिकेत दिसेल. त्याच्या भूमिकेचे नाव सुलतान असेल, असेही सांगितले जात आहे. अर्थात, सलमान या तिसऱ्या भागात केवळ पाहुणा कलाकार म्हणून दिसू शकतो. त्याचा या भागात फक्त परिचय करून दिला जाईल आणि नंतर त्यावर आधारित स्वतंत्र चित्रपट किंवा वेगळे कथानक उभारण्याचा निर्मात्यांचा विचार आहे. मात्र, याबाबत कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही.



### 'तस्करी' २३ देशांत ठरतेय अव्वल

**मुंबई :** नेटफ्लिक्सवर नुकतीच 'तस्करी' ही वेबसीरिज प्रदर्शित झाली. नीरज पांडे यांच्या दिग्दर्शनात तयार झालेली ही सीरिज जगभरात दाखवली जात आहे. त्यातही २३ देशात तिने पहिल्या दहा सीरिजमध्ये स्थान पटकावले असून त्यापैकी नऊ देशात ती पहिल्या स्थानावर आहे. विमानतळावरील कस्टम विभाग आणि तस्करीवरआधारित ही सीरिज अतिशय प्रभावी ठरते आहे. कथा कुठेही रेंगाळत नाही, प्रत्येक एपिसोडमध्ये नवा ट्विस्ट आहे. चांगला आशय असेल तर भाषेच्या, प्रांताच्या मर्यादा ओलांडून यश मिळवता येतं, असे या सीरिजने सिद्ध केले आहे.यात इम्रान हाश्मी, अमृता खानविलकर, शरद केळकरसह सर्वच कलाकारांनी आपल्या भूमिका अतिशय दमदार सादर केल्या आहेत. यासंदर्भात इम्रान हाश्मी म्हणालाकी, प्रत्येक देशातून मिळणारा प्रतिसाद आमच्यासाठी अमूल्य आहे. सर्व चाहत्यांचे मी मनापासून आभार मानतो. या सीरिजने आपल्या करिअरला नवी दिशा दिली आहे, असेही तो म्हणाला.





# १६ वर्षांखालील मुलांना सोशल मीडियाबंदी

◆ **अमरावती, २३ जानेवारी**

समाज माध्यमांद्वारे अनेकदा लहान मुलांसमोर अशा गोष्टी येत आहेत ज्या त्यांच्या मानसिक आणि भावनिक आरोग्यास हानिकारक आहेत. याचा विचार करून आंध्रप्रदेश सरकारने १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घालण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

राज्याचे मंत्री नारा लोकेश यांनी या निर्णयाचे फायदे स्पष्ट केले आहेत. त्यांनी दावोस येथे झालेल्या भेटीत सांगितले की, विशिष्ट वयाखालील मुलांना ऑनलाइन उपलब्ध असलेल्या कंटेंटचा योग्य प्रकारे सामना करता येत नाही. अनेकदा मुलांना गुन्हेगारी प्रवृत्तीचे किंवा नकारात्मक कंटेंट अनुभवावे लागते, ज्यामुळे त्यांच्या मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. या धोके टाळण्यासाठी एक मजबूत कायदेशीर चौकट आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.नारा लोकेश म्हणाले की, आंध्र प्रदेशातील हा निर्णय ऑस्ट्रेलियामध्ये लावलेल्या १६ वर्षांखालील मुलांसाठीच्या सोशल मीडिया कायद्याच्या अनुरूप आहे. या पद्धतीने मुलांना ऑनलाइन नकारात्मकतेपासून सुरक्षित ठेवणे हा मुख्य उद्देश आहे.

या निर्णयावर टीडीपीचे राष्ट्रीय प्रवक्ते जी. दीपक रेड्डी यांनीही आपली भूमिका मांडली. त्यांनी सांगितले की, लोकेश यांनी सोशल मीडियाचा मुलांच्या मानसिक आरोग्यावर आणि सुरक्षिततेवर होणाऱ्या परिणामांबद्दल योग्य गंभीर चिंता व्यक्त केली आहे. विशिष्ट वयाखालील मुले ऑनलाइन उपलब्ध हानिकारक सामग्रीला समजून घेण्याइतपत भावनिकदृष्ट्या प्रौढ नसतात, त्यामुळे अशा बंदीची आवश्यकता आहे. रेड्डी यांनी म्हटले की, आंध्रप्रदेश सरकार जागतिक सर्वोत्तम पद्धतींचा अभ्यास करत असून ऑस्ट्रेलियाच्या १६ वर्षांखालील सोशल मीडिया कायद्याचे परीक्षण केले आहे. याशिवाय, रेड्डी यांनी वायएसआर काँग्रेसच्या मागील राजवटीत महिलांवर क्रूर आणि अपमानास्पद हल्ले करण्यासाठी सोशल मीडियाचा गैरवापर झाल्याचेही स्मरण केले. (वृत्तसंस्था)

**आंध्रप्रदेश सरकारचा मोठा निर्णय**



### मुलांच्या हितासाठी निर्णय

लहान मुलांना ऑनलाईन नकारात्मकतेपासून दूर ठेवणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. आंध्र प्रदेश सरकारचा हा निर्णय लहान मुलांच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वाचा पाऊल असून, सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या योग्य नियमनाच्या दिशेने टाकलेले एक जबाबदारीपूर्ण पाऊल मानले जात आहे.

## जपानमध्ये ८ फेब्रुवारीला मध्यावधी निवडणूक

◆ **टोकियो, २३ जानेवारी**

देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान साने ताकाची यांनी शुक्रवारी संसदेचे कनिष्ठ सभागृह बरखास्त करण्याची घोषणा केली. देशात ८ फेब्रुवारी रोजी मध्यावधी निवडणुका होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

तीन महिन्यांच्या पदावर राहिल्यानंतर ताकाची यांनी हा निर्णय घेतला. ऑक्टोबरमध्ये जपानच्या पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून निवडून आलेल्या ताकाची यांची लोकप्रियता वाढली आहे. तथापि, संसद बरखास्त केल्याने अर्थसंकल्पावरील मतदान पुढे ढकलण्यात आले जे कमकुवत अर्थव्यवस्थेला आधार देण्यासाठी आणि वाढत्या महागाईला तोंड देण्यासाठी होते. (वृत्तसंस्था)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# अमेरिकी अशांतिदूताचा अट्टहास

जगातील सर्वांत जुनी लोकशाही असलेला अमेरिका नावाचा देश जगातील इतर लोकतांत्रिक राष्ट्रांसाठी नेहमीच नायक राहिलेला आहे. साधारणतः तीनशे वर्षांपूर्वी अमेरिका नावाचा देश अस्तित्वातच नव्हता. तो अस्तित्वात आला आणि त्याने विकसित केलेल्या लोकतांत्रिक व्यवस्थेमुळे शतकभरात त्याने जगात नाव मिळविले. जगाच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या श्रमजीवींचे आणि बुद्धिजीवींचेही अमेरिकेने स्वागत केले. या सर्वांनी मिळून अमेरिकेला महासत्ता बनविले. त्यामुळे अमेरिकेला जाणे, अमेरिका पाहणे, अमेरिकेत राहणे हे जगातल्या अनेक देशांतील नागरिकांसाठी प्रतिष्ठेचे लक्षण होते. जगाच्या दृष्टीने अमेरिकेची प्रतिमा नायकाची होती. अशा या नायकाच्या वाट्याला डोनाल्ड ट्रम्प या राष्ट्राध्यक्षाच्या माध्यमातून एक खलनायक आलेला आहे. अमेरिकेचे अर्थसत्ता, लष्करी सत्ता आणि बौद्धिक सत्ता म्हणून असलेले वर्चस्व रसातळाला नेण्याचा जणू चंगच या महाशयांनी बांधलेला आहे. त्यातील अलिकडचे उदाहरण व्हेनेझुएलाचे आणि त्यानंतरचे अगदी ताजे उदाहरण ट्रम्प तात्यांनी ग्रीनलॅण्ड नावाच्या स्वायत्त प्रदेशावर वाकडी नजर टाकल्याचे. ग्रीनलॅण्ड हा प्रदेश उत्तर अमेरिका खंडात असला तरी तो डेन्मार्कच्या आधिपत्याखाली येतो. डेन्मार्क हा उत्तर युरोपातला देश. ग्रीनलॅण्डशी अमेरिकेचा अर्थाअर्थी संबंध नाही. पण, एखाद्या राष्ट्रप्रमुखाने गावगुंडासारखेच वागायचे ठरविले तर काय होते, याचा अनुभव साऱ्या जगालाच येत आहे. आतापर्यंत जगात कुठेही काही कमी-जास्त होत असेल तर अमेरिका तिथे नाक खुपसायचा किंवा नाक खुपसून कमी-जास्त करायचा. आताही ते थांबलेले नाही. ट्रम्प अमेरिकेचे दुसऱ्यांदा अध्यक्ष होण्याच्या आधीपर्यंत अमेरिकेची ही सवय काहीशी मर्यादित होती. आता मी म्हणेन तेवढा कर तुम्हाला द्यावा लागेल, मला हवा असलेला प्रदेश तुम्हाला माझ्या स्वाधीन करावा लागेल, ही ट्रम्प यांची भाषा. ग्रीनलॅण्डवर नजर टाकून एका अर्थाने अमेरिकेने विस्तारवादाचे भयावह रूप जगाला दाखविण्यास सुरुवात केली आहे. अख्खा युरोप त्यामुळे ट्रम्प यांच्याविरुद्ध एकवटला आहे. ट्रम्प महाशय स्वतःच जगात युद्धसदृश परिस्थिती निर्माण करीत असताना दुसरीकडे जगातील सात-आठ युद्धे आपण थांबवल्याचा दावाही करत असतात. आपल्याला नोबेल पुरस्कार मिळावा, असा ट्रम्प यांचा आग्रह आहे. अशांतता आणि अस्थिरता पसविणाऱ्या राष्ट्रप्रमुखाने नोबेलवर हक्क सांगावा म्हणजे मोठ्ठाच विनोद आहे. अमेरिकेच्या पाठिंब्यानेच इस्रायलने गाझा पट्टीत हजारो निरपराध लोकांची कत्तल केली. आता त्या गाझा पट्टीत शांतता प्रस्थापित करण्यासाठी 'बोर्ड ऑफ पीस' म्हणजे शांतता मंडळ स्थापन करण्यासाठी ट्रम्प नामक 'अशांतिदूत' पुढाकार घेत आहेत. यासाठी त्यांनी ६० देशांना अमांत्रित केले आहे. २१ देशांनी ट्रम्प यांच्या या पुढाकाराला प्रतिसाद देत त्यात सहभागी होण्याची तयारी दर्शवली. भारतासह अन्य काही देशांनी या मुद्यावर आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही. जे देश तयार झालेत, ते उत्स्फूर्तपणे नव्हे तर ट्रम्प यांच्या दबावामुळे तयार झाले आहेत. या माध्यमातून ट्रम्प यांना सर्व आंतरराष्ट्रीय संघटनांना निष्प्रभ करीत जगात आपले एकमेव नेतृत्व प्रस्थापित करायचे आहे, असे दिसते. बोर्ड ऑफ पीस अस्तित्वात येणार असेल तर संयुक्त राष्ट्रांचे काय करायचे, याचे उत्तर ते देत नाहीत. संयुक्त राष्ट्रांना, आंतरराष्ट्रीय नियम व पायंड्यांना ते मोजत नाहीत. जे देश आपले ऐकत नाहीत, त्यांच्यावर आर्थिक निर्बंध ट्रम्प यांनी लादले आहेत. अनेक देशांसमोर गंभीर स्वरूपाचे आर्थिक संकट उभे झाले आहे. दुसऱ्यांसाठी खड्डा खोदणाऱ्या ट्रम्प यांनी आपल्या नकळत अमेरिकेसाठीही मोठा खड्डा खोदून ठेवला आहे हेही तेवढेच खरे. कधी ना कधी अमेरिकी लोकांच्या लक्षात ते येईलच.

अमेरिकेचे खरे हितैषी आपणच आहोत, असे दाखवत आणि तथाकथित राष्ट्रवादाचा बुरखा पांघरत ट्रम्प अमेरिकेच्या लोकांना आपल्यामागे फरफटत येण्यास भाग पाडत आहेत. कधीकाळी जगात अमेरिका आणि सोविएत युनियन अशा दोनच महाशक्ती होत्या. साडेतीन दशकांपूर्वी सोविएत युनियनचे विघटन झाले आणि जगात अमेरिका ही एकमेव महाशक्ती उरली. त्यामुळे अमेरिकेची जगात दादागिरी सुरू झाली. तरीही त्याला पूर्वी मर्यादा होत्या. ट्रम्प विचित्र आहेत. आपण राजकारणी कमी आणि व्यापारी जास्त आहोत, हे ट्रम्प नेहमी जाणवून देतात. फायद्यासाठी कोणत्याही थराला जायची त्यांची तयारी असते. अध्यक्षपदाचा पहिला कार्यकाळ संपल्यानंतर झालेल्या निवडणुकीत ज्यो बायडेन यांनी ट्रम्प यांचा पराभव केला होता. तो पराभव मानण्यास ट्रम्प यांनी नकार दिला होता. बिनडोक समर्थकांना अमेरिकेचे संसद भवन असलेल्या कॅपिटल हिलवर चालून जाण्याची चिथावणी द्यायलाही ट्रम्प यांनी मागेपुढे पाहिले नाही. अमेरिकेच्या आतापर्यंतच्या कोणत्याही अध्यक्षाने केले नसेल, एवढे नुकसान एकट्या ट्रम्प यांनी केले आहे. आताही ते तेच करीत आहेत. ते अमेरिकेची इभ्रत घालवीत आहेत. तेलाचे सर्वाधिक साठे असलेला व्हेनेझुएला बळकावल्यानंतर ट्रम्प यांची वक्रदृष्टी आता उत्तर गोलार्धातील ग्रीनलॅण्ड या चिमुकल्या बेटावर गेली आहे. अमेरिकेने व्हेनेझुएलाच्या अध्यक्षांचे पत्नीसह अपहरण केले आणि त्यांना न्यूयॉर्कच्या तुरुंगात डांबले. त्यांच्यावर अमली पदार्थांचा व्यापार आदी अनेक आरोप करत खटलाही भरला. व्हेनेझुएलाच्या अध्यक्षांनी त्यांच्या देशात जे काही केले, त्याचे कोणालाच समर्थन करता येणार नाही. खरा प्रश्न असा की, त्यांच्यावर अशा पद्धतीने कारवाई करण्याचा अधिकार अमेरिकेला कोणी दिला? दुसरा प्रश्न असा की, ग्रीनलॅण्ड त्यांना कशासाठी हवा? आधी ग्रीनलॅण्ड हा प्रदेश पैशाच्या बळावर विकत घेण्याचा प्रयत्न अमेरिकेने केला, पण तो फसला. आर्थिक ताकदीच्या बळावर आपल्याला हवे असलेले प्रांत विकत घेण्याची अमेरिकेची सवय जुनी आहे. याआधी अमेरिकेने अलास्का, लुईझियाना असे प्रांत विकत घेतले आहेत. जे विकत घेऊ शकत नाही, ते लष्करी बळाच्या ताकदीवर बळकवायलाही अमेरिका मागेपुढे पाहत नाही. ग्रीनलॅण्डवर अमेरिकेचा डोळा फार आधीपासून आहे. १८६७ आणि नंतर १९१० मध्ये अमेरिकेने ग्रीनलॅण्ड विकत घेण्याचा प्रयत्न केला, पण तो तेव्हा फसला होता. अमेरिकेने प्रयत्न सोडले नाहीत. हिटलरच्या जर्मनीच्या आक्रमणाचा सामना करण्यास सक्षम नसल्यामुळे ग्रीनलॅण्ड बेटाची मालकी असलेल्या डेन्मार्कने अमेरिकेकडे मदतीची मागणी केली आणि अमेरिकेने ग्रीनलॅण्ड बेटावर लष्करी तळ उभारत तेव्हा डेन्मार्कचे जर्मनीपासून रक्षण केले. आता त्याची किंमत वसूल करण्याचा अमेरिकेचा प्रयत्न आहे. अमेरिकेच्या सुरक्षेसाठी ग्रीनलॅण्ड आवश्यक असल्याचा अमेरिकेचा दावा हास्यास्पद आहे. ग्रीनलॅण्ड अमेरिकेपासून ४८०० किमी दूर आहे. डेन्मार्क हा चिमुकला देश असला तरी पाकिस्तानसारखी त्याने अमेरिकेसमोर शरणागती पत्करलेली नाही. डेन्मार्कला पाठिंबा देणाऱ्या देशांवर आर्थिक निर्बंध लादण्याचाही इशारा अमेरिकेने दिला आहे. विशेष म्हणजे फ्रान्स आणि ब्रिटन यासारख्या मित्र देशांनाही अमेरिकेची ही आक्रमक आणि विस्तारवादी भूमिका मान्य नाही. डेन्मार्क हा युरोपचा भाग आहे आणि युरोपीय देशांत झालेल्या सुरक्षाविषयक करारानुसार, कोणत्याही एका देशावर झालेला हल्ला हा संपूर्ण युरोपवरील हल्ला मानला जातो. त्यामुळे अमेरिकेने ग्रीनलॅण्डवर हल्ला करून तो प्रदेश बळकावण्याचा प्रयत्न केला तर युरोपातील देश डेन्मार्कच्या मदतीला धावतील. अमेरिकेची लष्करी ताकद आणि समस्त युरोपची ताकद यांची तुलना होऊ शकत नसली तरी संघर्ष उडाला तर तिसऱ्या महायुद्धाची स्थिती निर्माण होऊ शकते. ट्रम्प यांनाही याची जाणीव असावी. त्यामुळे त्यांनी सध्या तरी आपण ग्रीनलॅण्डवर हल्ला करणार नाही, अशी मानभावी भूमिका घेतली आहे. पण, ट्रम्प कधी काय करतील, याचा भरवसा नाही. अमेरिकी अशांतिदूताचा अट्टहास जगाला कोणत्या संकटात घालेल, हेही त्यामुळेच सांगता येत नाही. ▮

## प्रासंगिक

# परीक्षा पद्धतीतले कालसुसंगत बदल

**प्रा. राम प्रकाश किन्हीकर**

प्राध्यापकी पेशात एखाद्या हाडाच्या शिक्षकाला विद्यार्थ्यांना शिकवणे, विद्यार्थ्यांमध्ये रमणे जेवढे आवडते तेवढेच त्या शिक्षकाला दोन गोष्टी अत्यंत टाळाव्याशा वाटतात. पण गंमत अशी आहे की टाळाव्याशा वाटणाऱ्या या दोन्ही गोष्टी त्याच्या पेशाचा अविभाज्य अंग असल्याने त्याने कितीही टाळाव्या म्हटल्यात तरी तो टाळू शकत नाही. एक म्हणजे परीक्षांदरम्यान पर्यवेक्षण करणे आणि दुसरी म्हणजे परीक्षा झाल्यानंतर उत्तरपत्रिका तपासणे. माझ्या बाबतीत मी या दोन्हीवर उतारा काढलाय. पर्यवेक्षण सुरू असताना जे आवश्यक काम आहे (परीक्षार्थींच्या उत्तरपत्रिकांवर सह्या, बारकोड्स चिकटवणे, परीक्षाविषयक इतर नोंदी करणे वगैरे) ते साधारण अर्ध्या तासात संपवून उरलेला दीड-अडीच तास हा अगदी आपला वेळ असतो. या वेळात मी माझ्या लिखाणासंबंधी चिंतन करतो. एखादे टिपण घ्यावेसे वाटले तर जवळच्या छोट्या डायरीत टिपून घेतो. मनात खूप दिवसांपासून घोळत असलेल्या एखाद्या कल्पनेचा विस्तार करायचा असेल तर या वेळासारखा दुसरा वेळ नाही. हा वेळ मी असा सत्कारणी लावतो. आणि परीक्षा झाल्या झाल्या पेपर्स तपासून घेतले म्हणजे मग पेपर तपासणीचे कामसुद्धा कंटाळवाणे होत नाही. अशा प्रकारे शिक्षकी पेशातल्या या टाळाव्याशा वाटणाऱ्या पण टाळता न येणाऱ्या बाबींवर मी माझा तोडगा काढलेला आहे.

या पर्यवेक्षणादरम्यान माझ्या मनात या परीक्षा पद्धतींबाबत कायमच एक प्रश्नचिन्ह तयार होत असते. आजची आपली पारंपरिक परीक्षा पद्धती ही कालबाह्य होतेय का? आणि होत असली तर सर्वांनाच हे पटूनही त्यावर उपाययोजना का होत नाही? पाठांतरावर आधारित परीक्षा पद्धतीला माझा विरोध नाही. ज्या ज्या देशांनी, संस्कृतींनी पाठांतरावर आधारित परीक्षा पद्धतीला पहिलेपासून झुगारून दिलेले आहे त्यांच्या शिक्षणपद्धतीचे काय हाल झालेत? ते आपण आज बघतोय. पाठांतरावर आधारित परीक्षा पद्धती हवीच पण ती पदवीला प्रवेश घेईपर्यंत. तोपर्यंत विद्यार्थ्यांचा मेंदू पाठांतरावर छान तयार व्हायला हवा.

पदवी परीक्षेत मात्र पाठांतरावर भर नकोय. पदवीच्या अगदी पहिल्या वर्षापासूनच. पदवी मिळवतोय म्हणजे जो विषय आपण पदवीसाठी निवडलाय त्यात मला कौशल्य प्राप्त करायचेय. मग त्यात आपली पारंपरिक परीक्षा पद्धती थिटी पडतेय असे मला ठामपणे वाटत आलेले आहे. या सर्व परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांच्या पाठांतर परीक्षेऐवजी त्यांनी त्या विषयातले किती कौशल्य अर्जित केले याचे मूल्यमापन व्हावे असे मला वाटते. आणि आजचा काळ हा सर्वार्थाने या सर्व बदलांसाठी अनुकूल असताना तर हे करणे अत्यंत सोपी आहे. फक्त कुणीतरी तसा ठाम निर्णय घेऊन तसे पाठबळ या नवविचारांना द्यायला हवे.

कोरोना काळात घरी बसल्या बसल्या, महाविद्यालयात रोजचे जाण्यायेण्याचे तास वाचल्याने, फक्त थेअरी लेक्चर्स घ्यायचे असल्याने प्रात्यक्षिकांचे तास वाचल्याने उरलेल्या वेळात आपल्यापैकी बऱ्याच जणांनी कोर्सेरासारख्या ऑनलाईन माध्यमावर अनेक विषय शिकले. मी पण त्यातलाच एक होतो. माझ्या विषयाव्यतिरिक्त मी अनेक नवीन तंत्रज्ञान त्या माध्यमातून शिकलो. त्या अभ्यासक्रमात अनेक तज्ज्ञांची व्हिडीओ लेक्चर्स असतात, त्यांच्या नोट्स दिलेल्या असतात. आपण ते बघायचे आणि आपल्याला कळलेय की नाही हे बघायला त्यांच्या परीक्षा द्यायच्यात. परीक्षा पण ऑनलाईनच. परीक्षेदरम्यान त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देताना आपण त्यांचे व्हिडीओ बघू शकतो, नोट्स वाचू शकतो. कारण शेवटी ही परीक्षा आपल्या आकलनाची असते आपल्या पाठांतराची नव्हे. आणि परीक्षेतले प्रश्न सुद्धा नोट्स वाचून, व्हिडीओज पाहून त्यातून थेट उत्तरे देण्यासारखे नसतात. परीक्षेतले प्रश्न सुद्धा आपल्या आकलनावर आधारित असतात आणि बऱ्याचशा विषयांमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी चक्क ८० टक्के गुण मिळवायचे असतात. समजा एखाद्या दिवशी आपण त्या परीक्षेत तेवढे गुण प्राप्त करू शकलो नाही तर पुन्हा २४ तासांनीच ती परीक्षा पुन्हा द्यायला मिळते तोपर्यंत तो पेपर आपल्या कॉम्प्युटरवर पुन्हा उघडत नाही. २४ तासांत पुन्हा तेवढे ज्ञान प्राप्त करायचे, तेवढे आकलन प्राप्त करायचे आणि मग परीक्षा द्यायची. मला ही पद्धत फार आवडली.

आज मी संगणक अभियांत्रिकी, डेटा सायन्स, कृत्रिम बुद्धिमत्ता वगैरे क्षेत्रातले विद्यार्थी आजच्या पारंपरिक परीक्षा पद्धतीत प्रोग्रॅमिंगचे पेपर्स लिहिताना बघितले की त्यांची, त्यांचे पेपर्स तपासणाऱ्यांची आणि या एकूणच परीक्षा पद्धतीची कीव येते. एखादा कॉम्प्युटर प्रोग्राम कागदावर लिहिताना तो नीट चालतोय की नाही हे त्या विद्यार्थ्याला कसे कळणार? तो प्रोग्राम बरोबर लिहिलाय की नाही हे त्या पेपर तपासणाऱ्याला तरी कसे कळणार? हे माझ्यापुढचे गहन प्रश्न आहेत. त्यापेक्षा त्यांची अशी कोर्सेरा पद्धतीची परीक्षा झाली असती तर तो प्रोग्राम चालतोय की नाही हे त्यांचे त्यांनाच कळले असते. त्यातल्या चुका कशा काढायच्या याचे कौशल्य त्यांचे त्यांनीच मिळवले असते. यात परीक्षकाची भूमिका केवळ तसा पेपर देण्याची आणि अशा ऑनलाईन माध्यमात जर व्यवस्थित नियोजन केले तर प्रत्येक विद्यार्थ्याला एकाच काठिण्यपातळीचे पण वेगवेगळे प्रोग्राम्स लिहायला सांगता येऊ शकेल त्यामुळे एकमेकांचे बघून लिहिणे वगैरे प्रकार टळू शकतील.

आजकाल तर कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान वापरून अनेक सॉफ्टवेअर कंपन्या विद्यार्थ्यांची घरबसल्या परीक्षा घेत असतात. एकाच वेळी अक्षरशः हजारो विद्यार्थ्यांची. त्यात त्या विद्यार्थ्याने परीक्षेच्या विंडो व्यतिरिक्त दुसरी विंडो (गूगल, चॅट जीपीटी वगैरेला विचारण्यासाठी) नुसती उघडली तरी त्या विद्यार्थ्याची परीक्षाच रद्द होते. त्या विद्यार्थ्याच्या लॅपटॉप / डेस्कटॉपचा कॅमेरा त्या विद्यार्थ्याच्या सगळ्या हालचाली टिपत असतो. थोडीही संशयास्पद हालचाल, बोलणे त्यात दिसले की एक वॉर्निंग येते आणि त्या वॉर्निंगला भीक न घालता आपण आपले चुकीचे काम सुरूच ठेवले तर त्या विद्यार्थ्याची ती परीक्षा रद्द होते.

आणखी एक मुद्दा. वर्षभर शिकवून वर्षाअखेर एका तीन तासांच्या परीक्षेत त्या विद्यार्थ्याचे ज्ञान जोखण्याची जुनी पद्धती कशाला? वर्षभर त्या विद्यार्थ्याने महाविद्यालयात किती प्रोजेक्टस केलेत, किती संशोधन केले, किती विविध कौशल्ये आत्मसात केलीत, त्याची आकलन क्षमता किती आहे, याचे गुणांकन त्या त्या वेळी त्या त्या शिक्षकाने केले तर शेवटी ही परीक्षा घेणे हेच कालबाह्य ठरेल. अंतिम तीन तासांच्या परीक्षेचा आणि त्या विद्यार्थ्याने वर्षभर केलेल्या मेहनतीचा संबंध आपल्याला तोडता येणार नाही का? बरे या अंतर्गत मूल्यमापनात हे शिक्षक जर भेदभावपूर्वक वागणूक करीत असतील तर त्यावरही अंकुश ठेवण्याची यंत्रणा अगदी सहज उभारता येऊ शकते. असलेल्या कौशल्यापेक्षा जास्त मूल्यमापन करण्याचे एखाद्या संस्थेने ठरविले आणि त्याप्रमाणे त्या विद्यार्थ्यांचे ओव्हरव्हॅल्युएशन केले तर ती एक केवळ कागदी सूज ठरेल. कारण असे ओव्हरव्हॅल्युड विद्यार्थी जेव्हा नोकरीसाठी त्या त्या कंपन्यांमध्ये, आस्थापनांमध्ये जातील तेव्हा त्यांच्या या फुगवलेल्या गुणांचे पितळ उघडे पडेल आणि त्या त्या महाविद्यालयाची, विद्यापीठाची विश्वासार्हता धोक्यात येईल. याउलट आकसापोटी जाणूनबुजून एखाद्या विद्यार्थ्याला कमी गुण प्रदान करणाऱ्यांवरही महाविद्यालयांतर्गत, विद्यापीठांतर्गत कठोर अंकुश ठेवण्याची यंत्रणा राबवता येईल. थोडक्यात काय, आजची लक्षात ठेवण्याची क्षमता तपासणारी पारंपरिक परीक्षा पद्धती आपल्याला विद्यापीठातल्या पदवी स्तरापासून पुढे नक्की टाळता येऊ शकते. त्याऐवजी विद्यार्थ्यांची कौशल्ये तपासण्याची पद्धती आणायला आजच्या युगात फार श्रम पडणार नाहीत. गरज आहे ती शिक्षणतज्ज्ञांच्या जबरदस्त इच्छाशक्तीची आणि त्यांना सरकारमधल्या, विद्यापीठामधल्या, समाजातल्या सर्वच घटकांकडून मिळणाऱ्या अगदी सकारात्मक सहकार्याची. ▮

९९२२११६६८७

(लेखक गेली तीस वर्षे अभियांत्रिकी अध्यापन क्षेत्रात आहेत.)

## मुंबई वार्तापत्र

# 'प्रिय अशोकराव...' एक श्रद्धांजली ग्रंथ!

**नागेश दाचेवार**

प्रिय अशोकराव : विचारांचा दीपस्तंभ, जो काळाच्या पलीकडे उजळत राहील. काही व्यक्ती काळाच्या चौकटीत बसत नाहीत. त्या काळ घडवतात. डॉ. अशोकराव गजानन मोडक हे अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक होते. त्यांच्या स्मृतींना अर्पण केलेला 'प्रिय अशोकराव' हा श्रद्धांजली ग्रंथ म्हणजे केवळ आठवणींचा संग्रह नाही, तर विचार, मूल्ये आणि राष्ट्रनिष्ठेचा जिवंत दस्तावेजच म्हणावा लागेल.

भारतीय सार्वजनिक जीवनात काही व्यक्तिमत्त्वे केवळ शैक्षणिक, राजकीय किंवा सामाजिक चौकटीत बंदिस्त होत नाहीत, ती विचार, मूल्य, शिस्त आणि राष्ट्रनिष्ठा यांचा जिवंत संगम असतात. दिवंगत डॉ. अशोकराव मोडक हे अशाच दुर्मिळ व्यक्तिमत्त्वांपैकी एक होते. त्यांचे आयुष्य म्हणजे ज्ञान, चारित्र्य, सेवाभाव आणि राष्ट्रचेतना यांचा समन्वय असलेली एक प्रेरणादायी गाथा होती. त्यांना केवळ प्राध्यापक, आमदार, विद्यार्थी संघटक किंवा विचारवंत म्हणून ओळखणे अपुरे ठरेल. कारण ते एका काळाचे मार्गदर्शक, विचारांचे शिल्पकार आणि समाजासाठी नैतिक दीपस्तंभ होते. १९४० ते २०२६ या प्रदीर्घ कालखंडात शिक्षण, समाजकारण, वैचारिक चळवळी आणि राष्ट्रचिंतन या सर्व क्षेत्रांत अशोकरावांनी आपला ठसा उमटवला. या ग्रंथातून त्यांच्या जीवनकार्याचा पट अत्यंत शिस्तबद्ध, संदर्भयुक्त आणि अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडण्यात आला आहे. त्यामुळे, हा ग्रंथ केवळ एक भावनिक श्रद्धांजली म्हणून नव्हे, तर शैक्षणिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाचे आहे. हा स्मरणग्रंथ, श्रद्धांजली संग्रह ई-बुकाचे लेख संकलन, देवदत्त जोशी, अभय बापट, राजेश प्रभू साळगावकर यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण आणि वैचारिक शिस्त जपत केले असून, संपादन व ई-बुक निर्मिती, राजेश प्रभू साळगावकर यांनी केले आहे. संपूर्ण ग्रंथरचना ही विचार, शिस्त आणि सौंदर्यबोध यांचा समतोल साधणारी आहे. तर, डॉ. अशोकराव मोडक यांचे जीवनकार्य, विचारनिष्ठा आणि संघभावना पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने, वैचारिक अधिष्ठानावर आधारित या स्मरणग्रंथाचे प्रकाशन अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या पुढाकारातून करण्यात आले आहे.



या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे ते शोकभावनेत अडकून राहत नाही. उलट, अशोकरावांनी आपल्याला काय दिले? आणि तो वारसा आपण कसा पुढे नेणार? याचा रोडमॅप आहे. मान्यवरांचे शोकसंदेश, कुटुंबीयांच्या भावना आणि सहकाऱ्यांच्या आठवणी एकत्र येऊन एका विचारवंताचे पूर्ण व्यक्तिचित्र उभे करणारे हे ई-बुक आहे. यात अरुण करमरकर, डॉ. जयंत कुलकर्णी, अभय बापट, पराग शरदकुमार वेदक, मकरंद मुळे, डॉ. प्रशांत पेशकार, कौंतेय देश, दुर्गेश परुळेकर, प्रा. धनंजय कुलकर्णी, डॉ. सुहास पेडणेकर, प्रा. नीला सहस्रबुद्धे, नवनीता तेलंग, दिनेश रणदिवे, लीना ओक-मॅथ्यू, शोभना भिडे (नाशिक), अरुण करमरकर (दुसरा लेख), नीलेश मदाने, शरमणी मराठे, सीमा मिलिंद कांबळे, दिलीप महाजन, प्रा. डॉ. प्रशांत धर्माधिकारी (बडोदा) आणि राजेश प्रभू साळगावकरांनी आपले अनुभव मांडले आहे.

**शिक्षक ते विचारवंत : एक प्रेरणादायी प्रवास :** डॉ. मोडक यांचे संशोधन जागतिक स्तरावर ख्यात असले तरी त्याचा केंद्रबिंदू भारतीय सभ्यतेचा आत्मा होता. त्यांनी मार्क्सवाद, समाजवाद आणि पाश्चात्त्य राजकीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास अनुकरणासाठी नव्हे, तर तुलनात्मक आत्मचिंतनासाठी केला. राष्ट्रीय जाणिवेपासून तुटलेले शिक्षण निर्जीव ठरते आणि बौद्धिक शिस्तीशिवाय राष्ट्रवाद गोंगाट बनतो. त्यांच्या व्याख्यानांतून एक मूलभूत प्रश्न सतत उलगडत असे भारत आधुनिक जगाशी संवाद साधताना आपला सांस्कृतिक आत्मा कसा जपू शकतो? हा विचारच त्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मूल्यांशी नैसर्गिकरीत्या जोडतो. त्यांच्या दृष्टीने संघ म्हणजे राजकीय मंच नव्हता, तर चारित्र्य, संयम आणि सेवाभावाची प्रयोगशाळा होती. जिथे कर्म, शिस्त आणि नम्रता घडते.

स्वामी विवेकानंद, सावरकर, गोखले, लोहिया यासारख्या विचारवंतांवरील त्यांच्या लेखनात विचारशील उदारता आणि वैचारिक प्रामाणिकता दिसून येते. त्यांनी कुणालाही अंधपूज्य किंवा अंधविरोधाचा विषय बनवले नाही. तर त्या काळातील नैतिक संघर्षांचे प्रतिनिधी म्हणून समजून घेतले. डॉ. मोडक हे केवळ प्राध्यापक नव्हते, तर शिक्षण हे राष्ट्रनिर्मितीचे साधन आहे, यावर ठाम विश्वास असलेले विचारवंत होते. वर्गखोलीत ज्ञान देताना त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये विचार करण्याची क्षमता, मूल्यांची जाणीव आणि सामाजिक जबाबदारी रुजवली. या ग्रंथातील सहकाऱ्यांच्या व विद्यार्थ्यांच्या लेखनातून त्यांचे हे व्यक्तिमत्त्व प्रकर्षाने समोर येते. शैक्षणिक क्षेत्रापुरते न थांबता, अशोकरावांनी सार्वजनिक जीवनातही सक्रिय भूमिका बजावली. विधानपरिषद सदस्य म्हणून त्यांनी मांडलेले विचार, एकात्म मानवदर्शनावरील त्यांचे चिंतन आणि राष्ट्रीय प्रश्नांवरील स्पष्ट भूमिका या ग्रंथात ठळकपणे प्रतिबिंबित होतात. त्यामुळे हा संग्रह विचार आणि कृती यांचा संगम कसा असावा याचे उत्तम उदाहरण ठरतो.

**पुढील पिढीसाठी वैचारिक ठेवा :** सार्वजनिक जीवनात काही व्यक्तिमत्त्वे केवळ शैक्षणिक, राजकीय किंवा सामाजिक चौकटीत बंदिस्त होत नाहीत तर ती विचार, मूल्य, शिस्त आणि राष्ट्रनिष्ठा यांचा जिवंत संगम असतात. दिवंगत डॉ. अशोकराव मोडक हे अशाच दुर्मिळ व्यक्तिमत्त्वांपैकी एक होते. त्यांचे आयुष्य म्हणजे ज्ञान, चारित्र्य, सेवाभाव आणि राष्ट्रचेतना यांचा समन्वय असलेली एक प्रेरणादायी गाथा होती. त्यांना केवळ प्राध्यापक, आमदार, विद्यार्थी संघटक किंवा विचारवंत म्हणून ओळखणे अपुरे ठरेल. कारण ते एक काळाचे मार्गदर्शक, विचारांचे शिल्पकार आणि समाजासाठी नैतिक दीपस्तंभ होते. 'प्रिय अशोकराव' हा संग्रह संशोधक, विद्यार्थी, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि विचारप्रवण वाचकांसाठी मार्गदर्शक ठरतो. तो आपल्याला केवळ एका व्यक्तीचे स्मरण करून देत नाही, तर विनम्रता, अभ्यासूवृत्ती आणि राष्ट्रनिष्ठा ही मूल्ये अंगीकारण्याचे आवाहन करतो. अशोकराव मोडक यांचा देहकाल जरी संपला असला, तरी त्यांच्या विचारांचा प्रकाश या ई-बुकातून पिढ्यान्‌पिढ्या उजळत राहणार आहे. ▮

९२७०३३३८८६

## वेध

# हिंद दी चादर गुरू तेग बहादूर

**नीलेश जोशी**

भारतीय इतिहासात धर्म, स्वातंत्र्य, त्याग, जीवनमूल्य आणि अन्यायाविरुद्ध लढणाऱ्यांची मोठी परंपरा आहे. या परंपरेत अनेकांनी स्वतःच्या जीवनाचे बलिदान दिल्याची देखील उदाहरणे पाहावयास मिळतात. 'देव, देश अन् धर्मासाठी, प्राण घेतले हाती' या ओळी प्रत्यक्ष जगलेल्या अनेक महापुरुषांचे चारित्र्य आजही प्रेरणादायी ठरतात. या शृंखलेत शिखांचे नववे गुरू श्री गुरू तेग बहादूर यांचे नाव अग्रस्थानी आहे. त्यांचे बलिदान अर्थात शहिदी, धर्मासाठी आणि अत्याचारा विरोधातील सर्वोच्च बलिदान आहे. काश्मीरमधील पंडितांवर होत असलेल्या धार्मिक अत्याचारांविरोधात उभे राहून त्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. काश्मिरी पंडितांनी गुरू तेग बहादूर यांना 'हिंद दी चादर' असे संबोधले. चादर म्हणजे संरक्षण, आश्रय आणि ऊब. त्यांनी हिंदूंच्या धर्मस्वातंत्र्याचे रक्षण केले म्हणूनच आजही ते सर्वांसाठी आदर्श आहेत.

१७ व्या शतकात औरंगजेबाच्या शासन काळात जिझिया कर, बळजबरीने धर्मांतरण, मंदिरांचा विध्वंस आणि हिंदू-शिखांवर सतत आणि अत्यंत क्रूर पद्धतीने होणाऱ्या अत्याचारामुळे समाजातील प्रत्येक जण पीडित होता. काश्मीरमध्ये राहणाऱ्या पंडितांवर तर अमानुष अत्याचार सुरू होते. धर्म बदला किंवा अत्याचार सहन करा अशी ताकीदच औरंगजेबाच्या मोघल सैन्याने तेथील जनतेला दिली. त्याच्या अत्याचारांमुळे त्रस्त काश्मिरी पंडितांचे एक शिष्टमंडळ आनंदपूर साहिब येथे गुरू तेग बहादूर यांच्याकडे आले. त्यांनी आपली व्यथा त्यांच्याकडे मांडली आणि आमच्या धर्माचे रक्षण कोण करेल? असा प्रश्न उपस्थित केला. यावर गुरू तेग बहादूर यांनी या संकटाला स्वतःचे संकट मानले. त्यांनी स्पष्ट सांगितले की, धर्मस्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी बलिदान द्यावे लागले, तरी हरकत नाही पण धर्मरक्षण होईलच. त्यानंतर त्यांनी औरंगजेबाला आधी माझे धर्मांतरण करा, मग इतरांचे असा संदेश दिला. सत्तेच्या उन्मादात असलेल्या धर्मांध औरंगजेबाला हे एकप्रकारे आव्हानच होते. औरंगजेबाने गुरू तेग बहादूर यांना अटक केली. त्यांच्यासोबत भाई मतीदास, भाई सतीदास आणि भाई दयालदास या तिघांना देखील ताब्यात घेतले. गुरू आणि शिष्यांना धर्मांतरण करण्यासाठी सांगण्यात आले. पण ते आपल्या म्हणण्यावर अढळ होते. अखेर ११ नोव्हेंबर १६७५ रोजी दिल्लीच्या चांदणी चौकात प्रथम भाई मतीदास यांना आरीने उभे चिरून त्यांची हत्या केली गेली. भाई सतीदास यांना कापसात गुंडाळून जिवंत जाळण्यात आले, तर भाई दयालदास यांना उकळत्या पाण्यात टाकून ठार केले. आपल्या समोरच तीनही शिष्यांची क्रूर हत्या झाल्याचे पाहून देखील गुरू तेग बहादूर ना डगमगले ना त्यांनी धर्मांतरणाला संमती दिली. अखेर त्यांचा देखील शिरच्छेद करून त्यांची निर्घृण हत्या करण्यात आली. धर्मासाठीचे हे सर्वांत मोठे बलिदान अर्थात शहिदी आहे. बलिदानानंतर गुरू तेग बहादुरांचे पुत्र गुरू गोबिंद सिंग त्यांनी खालसा पंथाची स्थापना केली. देव, देश आणि धर्मासोबतच अन्याय, अत्याचाराविरुद्ध संघटित प्रतिकाराची परंपरा निर्माण केली.

'सकल जगत् मे खालसा पंथ गाजे, जगे धर्म हिंद् सकल भंड बाजे' असे म्हणत अत्याचारी मोघलांचे आक्रमण संघर्ष करून त्यांनी थोपविले. श्री गुरू गोबिंद सिंग शीख धर्माचे दहावे आणि अंतिम गुरू होते. त्यांनी धर्म रक्षणार्थ मोघलांसोबत तब्बल ४२ वर्षे संघर्ष केला. ७ ऑक्टोबर १७०८ रोजी विदर्भा लगत असलेल्या मराठवाड्यातील नांदेड येथे त्यांनी देह ठेवला. तेथे सचखंड गुरुद्वारा आहे. यावर्षी गुरू तेग बहादुरांच्या शहिदीला ३५० वर्षे पूर्ण झाली आहेत. देशभरातील शीख धर्माचे अनुयायी त्याचे स्मरण करीत आहेत. महाराष्ट्रात देखील या बलिदानाचे स्मरण केले जात आहे. गुरुग्रंथ साहिबमध्ये संत नामदेवांचे ६१ दोहे आणि शिखांचे अंतिम गुरू गोबिंद सिंग यांनी देह ठेवला तो नांदेड येथील सचखंड गुरुद्वारा असा महाराष्ट्राचा थेट संबंध या परंपरेशी आहे. गुरू तेग बहादूर यांच्यासोबत त्यावेळी असलेले आणि गुरुनानक नाम लेवा संगत अशी ओळख असलेल्या शीख, शिकलकरी, लबाणा, बंजारा, मोईयाल, सिंधी, वाल्मीकि, उदासीन संप्रदाय, वारकरी संप्रदाय यांच्या माध्यमातून ३५० वर्ष पूर्ण झालेल्या शहिदीचे स्मरण करण्याकरिता नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. खरं म्हणजे आजपर्यंत धर्मासाठी सर्वोच्च बलिदानाची परंपरा असलेला इतिहास काहीसा उपेक्षित राहिला किंबहुना राजकीय स्वार्थापोटी जाणीवपूर्वक दुर्लक्षित ठेवला गेला. पण आता हा इतिहास महाराष्ट्र शासन आणि दमदमी टकसालचे प्रमुख बाबा हरनामसिंग, रा. स्व. संघ धर्मजागरण विभाग यांच्या पुढाकाराने समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी विविध कार्यक्रम, उपक्रम करण्यात आले. यापैकीच एका मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन नांदेड येथे केले असून हा कार्यक्रम प्रत्येक राष्ट्रभक्त हिंदूंसाठी प्रेरणा देणारा सोबतच समरसता आणि हिंदू एकतेचा संगम ठरेल. ▮

९४२२८६२४८४

### पथदिव्यांसंबंधी सूचना

दोन दिवसांनंतर रथसप्तमी तसेच २६ जानेवारी (प्रजासत्ताक दिन) साजरा होणार असून त्या अनुषंगाने शाळा, महाविद्यालये तसेच विविध संस्थांमध्ये प्रात्यक्षिक सरावाला सुरुवात झालेली आहे. रथसप्तमीनिमित्त अनेक योगप्रेमी पहाटे सूर्यनमस्कारासाठी एकत्र येतात. तसेच प्रजासत्ताक दिनानिमित्त सराव सुरू आहे. यासाठी शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, सायकलस्वार तसेच पायी जाणारे नागरिक पहाटेच्या वेळेत घराबाहेत पडतात. मात्र त्यावेळी मुख्य मार्ग सोडल्यास सगळीकडील पथदिवे बंद झालेले असतात. जवळजवळ सव्वा सहा, साडे सहा वाजेपर्यंत सर्वत्र अंधार असतो. त्याच वेळी भटक्या कुत्र्यांची टोळकी सावजाच्या शोधात असतात. यामुळे अपघात होण्याची शक्यता असते. तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. यामुळे संबंधित विभागाला नम्र विनंती आहे की, ऋतूनुसार आणि परिस्थितीनुसार पथदिवे सुरू-बंद करण्याचे नियोजन करण्यात यावे. काही दिवसांनंतर दिवस लवकर उजाडू लागेल, त्या वेळी वेळापत्रकात आवश्यक ते बदल करता येतील. मात्र सध्याच्या काळात योग्य नियोजन केल्यास नागरिकांची आणि विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही तसेच सुरक्षितता अबाधित राहील. संबंधित विभागाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने योग्य ते उपाय करावे.

**प्रांजली विजय ब्रह्मे**/नागपूर

●● ●●

### रस्ते खोदून ठेवणाऱ्या ठेकेदारांवर अंकुश नाही का?

नागपुरातील रस्ते नवीन करणे, डांबरीकरण करणे, सिमेंट रस्ते बांधणे सुरू आहे. परंतु हे रस्ते तयार झाले की लगेच कुठलातरी ठेकेदार येतो. गॅस, पाणी, टेलिफोन व इतर पाईप टाकण्यासाठी हे रस्ते खोदतो. हे आधी का करीत नाही हा अनंत काळापासूनचा प्रश्न आहे. हे रस्ते खोदले की ते व्यवस्थित बुजविले जात नाहीत. फक्त दगड आणि माती टाकून तात्पुरते दुरुस्त केले जातात. खेता ब्रदर्स लेआऊट, खामला परिसरात असेच रस्ते खोदले आणि आता निवडणुका आल्या म्हणून थातुरमातुर दुरुस्त केले असे दाखविले. ज्या ठेकेदारणे हे रस्ते खोदले होते त्याने इतके दिवस म्हणजे जवळपास नऊ महिने तसेच का ठेवले? लोकांना होणाऱ्या त्रासाची ठेकेदार आणि प्रशासन यांना जाणीवच नाही असे म्हणावे लागेल. अतिशय महत्त्वाचा खामला चौक अथवा ऑरेंज सिटी चौकामधील रस्ता एका बाजूने खोदला आणि ती नाली फक्त माती टाकून बुजविली. या चौकात प्रचंड वाहतूक आहे. आता ती नुसती नाली नसून प्रचंड मोठा खड्डा झाली आहे. लोकांची वाहने त्यातून जातात. एक सर्कस सुरू आहे. अपघातला आमंत्रण आहे. याकडे ठेकेदार अथवा प्रशासनाचे लक्ष का नाही? यांच्यावर कारवाई झाली पाहिजे आणि मग तो रस्ता दुरुस्त झाला पाहिजे.

**राजेंद्र बेनोडेकर**/८४२२०९९९२५

●● ●●

## वाचक पत्रे

### प्रजासत्ताक दिन : कर्तव्यांचे आत्मचिंतन

दोन दिवसांनी आपण प्रजासत्ताक दिन साजरा करणार आहोत. २६ जानेवारी १९५० रोजी आपल्या देशात संविधान लागू झाले. लोकशाही, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता ही संविधानाची मूलभूत तत्त्वे आहेत. संविधानाने दिलेले अधिकार उपभोगताना त्या अधिकारांशी निगडित कर्तव्यांप्रति आपण किती जागरूक आहोत, याचे आत्मचिंतन करण्याचा हा दिवस आहे. आत्मचिंतन करताना एक महत्त्वाचा प्रश्न मनात येतो, आपण एक सुज्ञ नागरिक म्हणून आपल्या कर्तव्यांप्रति किती सजग आहोत? संविधानाने जसे आपल्याला मूलभूत अधिकार दिले आहेत, तसेच काही मूलभूत कर्तव्येही दिली आहेत. त्यामध्ये मतदान करणे, कायद्याचे पालन करणे, सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे, सामाजिक सौहार्द जपणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे आणि देशहिताला प्राधान्य देणे यांचा समावेश आहे. या प्रत्येक कर्तव्याचे आपण कितपत प्रामाणिकपणे पालन करतो, याचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे.

आज आपण पाहतो की सरकारी तसेच खाजगी क्षेत्रात भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात फोफावलेला आहे. लाच देणे-घेणे, कर न भरणे, सार्वजनिक मालमत्तेचा दुरुपयोग करणे, सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरवणे, कायद्याचे पालन न करणे, मतदानाबाबत उदासीनता दाखवणे, तसेच रहदारीच्या नियमांकडे दुर्लक्ष करणे, या सर्व समस्या समाजात ठळकपणे दिसून येतात. पण या सगळ्यांसाठी केवळ सरकारच जबाबदार आहे का? निश्चितच नाही.

या समस्यांना आपण सर्व नागरिकदेखील तितकेच जबाबदार आहोत. त्यामुळे ''मी देशासाठी काय करतो आहे?'', ''मी माझ्या कर्तव्यांचे प्रामाणिक पालन करतो आहे का?'' असे प्रश्न स्वतःला विचारून आत्मपरीक्षण करण्याचा हा दिवस आहे. प्रत्येक नागरिकाने जर आपले अधिकार आणि कर्तव्य यांची योग्य सांगड घालून जबाबदारीने वागण्याचा संकल्प केला आणि देशभक्ती केवळ घोषणांपुरती मर्यादित न ठेवता ती दैनंदिन वागणुकीत उतरवली, तरच खऱ्या अर्थाने प्रजासत्ताक दिवस सार्थ होईल. ▮

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

●● ●●

# शिवाजी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना वाहतूक नियमाबाबत मार्गदर्शन

**बार्शी, दि. २३ जानेवारी-**

बार्शी शहर पोलीस ठाणे रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत शिवाजी महाविद्यालय बार्शी येथील विद्यार्थ्यांना वाहतूक नियमाबाबत मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयतील इयत्ता ११ व १२ चे एकूण २४ विद्यार्थी व विद्यार्थीनींना पोलीस ठाणे येथे वाहतूक नियमांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना बार्शी येथील बस स्टॅण्ड चौक, पोस्ट चौक, पांडे चौक, भोसले चौक इ. वर्दळीच्या ठिकाणी वाहतूक पोलीस अंमलदार यांच्यासोबत काम करण्यासाठी दुपारी १२ ते २ दरम्यान नेमण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी स्वतः हजर राहून वाहतूक नियमन केले. त्यातून त्यांना वाहतूक नियमांबाबत जनजागृती झाली व त्यांनी वाहतूक नियम कसे पाळावे याबाबत स्वतः माहिती घेतली. अशा प्रकारे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना स्वतः रस्त्यावर उभे राहून वाहतूक नियमन करणे व नियम पाळणे याबाबत जनजागृती करण्यात आली. यामुळे विद्यार्थ्यांनी आपली सकारात्मक मते व्यक्त केली. सदरचे जनजागृती कार्यक्रम हा रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी पोसई महेश गळगटे, शिवाजी कॉलेजचे प्राचार्य ए.बी. शेख, प्रा. युवराज खुळे, प्राध्यापिका शिल्पा वाघ व बार्शी शहर पोलीस ठाणे येथे सर्व वाहतूक अंमलदार यांनी पार पाडले. तसेच कॉलेजचे २४ विद्यार्थी यांनी परिश्रम घेऊन हे अभियान यशस्वी केले.


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**अ-खरेदी**

विभागीय स्टोअर ऑफिस सेंट्रल रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वेच्या ई-खरेदी वेबसाइट www.ireps.gov.in वर सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/ठेकेदारांकडून खालील कामांसाठी ऑनलाइन निविदा मागवत आहे. 01. निविदा क्रमांक:-96265011, 02. वर्णन:- RDSO Drg.no.T5919 Alt-2 (नवीनतम बदल) आणि ERC S. No. T-31-2021-पाचव्या पुनरावृत्तीसाठी खळड स्पेसिफिकेशनची पुष्टी करणारे इलास्टिक रेल क्लिप्स MK-V चे सामान, उत्पादन आणि पुरवठा (सुधारणा-2 आणि नवीनतम बदलांसह) (टीप: जिथे जिथे वापरलेले नवीनतम बदल म्हणजे निविदा बंद करण्याच्या वास्तविक तारखेपर्यंतचे बदल असतील.) 03 प्रमाण:- 120846 क्रमांक, 04 अर्नेस्ट मनी (INR):- रु.241480.00. www.ireps.gov.in वर 04-02-2026 रोजी 11:30 नंतर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ. संभाव्य निविदाधारकांना या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात घेण्यासाठी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वारंवार वेबसाइटला भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे. वेबसाइट: www.ireps.gov.in.

**वरिष्ठ विभागीय साहित्य व्यवस्थापक**
**सोलापूर**

**धोकादायक आणि स्फोटक वस्तू घेऊन प्रवास करणे हा दंडनीय गुन्हा आहे.**



**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-खरेदी**

क्रमांक: एसयूआर/सीनियर डीएमएम/टी.क्रमांक: 96255816 दिनांक: 20.01.2026 ई-निविदा सूचना:-विभागीय भांडार कार्यालय: मध्य रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वेच्या ई-खरेदी वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून ऑनलाइन निविदा मागवत आहे. 01. निविदा क्रमांक:-96255816, 02. वर्णन:- येथे जोडलेल्या तांत्रिक तपशीलांनुसार इलेक्ट्रिकली चालित, रोटरी स्क्रू, एअर-कूल्ड, मायक्रोप्रोसेसर आधारित स्थिर एअर कॉम्प्रेसर 500 सीएफएम 10 किलो/सेमी2 चा पुरवठा, स्थापना, कमिशनिंग आणि सिद्ध चाचणी., 03. प्रमाण:- 2 संख्या, ०४. अर्नेस्ट मनी (INR):- रु. 116460.00 www.ireps.gov.in वर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ. 02-02-2026 रात्री 11:30 नंतर. संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेत जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल. वेबसाइट: www.ireps.gov.in.

**वरिष्ठ विभागीय साहित्य व्यवस्थापक**
**सोलापूर**

**धोकादायक आणि स्फोटक वस्तूंसह प्रवास करणे हा दंडनीय गुन्हा आहे.**



**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-प्रोक्योरमेंट**

क्रमांक: एसयूआर/सीनियर डीएमएम/टी.क्र.96255853 दिनांक: 22.01.2026 ई-निविदा सूचना विभागीय स्टोअर ऑफिस मध्य रेल्वे,सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवल्या जातात. 01. निविदा क्रमांक:- 96255853, 02. वर्णन:- हलके वजन लिथियम बॅटरी टॅम्पिंग मशीन वन सेट ज्यामध्ये २ टॅम्पर आहेत. (8 बॅटऱ्या, 4 चार्जर्स, 04 टॅम्पिंग टूल, 02 ट्रान्सपोर्टेशन ट्रॉलीसह) ज्यामध्ये जोडलेले तपशील जोडलेले आहेत. 03. प्रमाण: 29 संच., 04. अर्नेस्ट पैसे (INR):- रु.468130.00, तारीख आणि निविदा बंद करण्याची वेळ www.ireps.gov.In:- 09-02-2026 11:30 नंतर. संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात घेण्यासाठी वेबसाइट वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे. वेबसाइट: www.ireps.gov.in.

**सीनिअर डिव्हिजनल मटेरियल मॅनेजर**
**सोलापूर**

**तिकिटांसाठी रेलवन ॲप डाउनलोड करा**



**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सिग्नल आणि टेलिकॉम काम**

ई-निविदा सूचना (पुनर्निमंत्रण)
निविदा सूचना क्रमांक SUR-N-T-2025-26-41
दिनांक: 22.01.2026

DRM(ST) चे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहे:- क्रमांक:- 1, कामाचे नाव त्याच्या परिसरासह:- मध्य रॅलवेच्या सोलापूर विभागात जिओग्रिड आणि जिओ-टेक्सटाइल पद्धती (TFTR) आणि (TBR) सह बीसीएम कामाशी संबंधित सिग्नलिंग काम, निविदा क्रमांक:- SUR-N-T-2025-26-41, कामाची अंदाजे किंमत:- रु. 82,68,713.84, निविदा फॉर्मची किंमत:-शून्य, जमा करावयाची बयाणा रक्कम:-रु. 1,65,400, काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने, निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ:- 16/02/2026 15.30 वाजल्यानंतर. तपशील ireps वेबसाइटवर उपलब्ध आहेत. जर काही सुधारणा असतील तर त्या फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केल्या जातील. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/पोस्टल/ई-मेल, फॅक्स, हस्तलिखित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना कंपनीच्या नावासह वर्ग III डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र मिळवण्याची आणि www.ireps.gov.in वर नोंदणी करण्याची विनंती केली जाते. अर्नेस्ट मनी पेमेंट (EMD) नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटी स्वरूपात स्वीकारले जाईल आणि मूळ बँक गॅरंटी निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी (म्हणजे बोली सादर करण्याची शेवटची तारीख वगळून) निविदा दस्तऐवजात दर्शविल्याप्रमाणे नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याला वैयक्तिकरित्या वितरित करावी. अधिक तपशीलांसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक एस अँड टी शाखा**
**सोलापूर**

**तिकिटांसाठी रेलवन ॲप डाउनलोड करा**



**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सिग्नल आणि टेलिकॉम काम**

ई-निविदा सूचना (पुनर्निमंत्रण) निविदा सूचना क्रमांक SUR-N-T-2025-26-40
दिनांक: 22.01.2026

डीआरएम (एस अँड टी) चे कार्यालय, सेंट्रल रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov वर ऑनलाइन ई-निविदा मागवत आहे. खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून:- क्रमांक:- 1., कामाचे नाव आणि त्याचे स्थान: मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात विविध वस्तू शेड आणि चेंजिंग रूमच्या विकासासाठी एफओआयएस नेटवर्कसह दूरसंचार सुविधेची तरतूद/स्थलांतर. निविदा क्रमांक:- SUR-N-T-2025-26-40, कामाची किंमत:- रु. 1,22,45,668.66, निविदा फॉर्मची किंमत:- शून्य, जमा करावयाची बयाणा रक्कम: रु. 2,11,200.00, काम पूर्ण करण्याचा कालावधी:-8 महिने, www.ireps.gov.in वर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ 16.02.2026 रोजी दुपारी 3.30 वाजता. तपशील ireps वेबसाइटवर उपलब्ध आहेत. शुद्धीपत्रक/दुरुस्ती असल्यास ती फक्त वरील ई-खरेदी वेबसाइटवर अपलोड केली जाईल. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/पोस्टल/ई-मेल, फॅक्स, हस्तलिखित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना कंपनीच्या नावासह वर्ग III डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र मिळवण्याची आणि www.ireps.gov.in वर नोंदणी करण्याची विनंती केली जाते. ईमेस्ट मनी (ईएमडी) चे पेमेंट नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटी स्वरूपात स्वीकारले जाईल आणि मूळ बँक गॅरंटी निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी (म्हणजेच बोली सादर करण्याची शेवटची तारीख वगळून) निविदा दस्तऐवजात दर्शविल्याप्रमाणे नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याला वैयक्तिकरित्या वितरित करावी. अधिक माहितीसाठी कृपया www.Ireps.gov.in ला भेट द्या.

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक एस अँड टी शाखा**
**सोलापूर**

**तिकिटांसाठी रेलवन ॲप डाउनलोड करा**


## IDFC FIRST Bank Limited

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

### वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेले आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तीचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 132694008 | मालमत्तेवर कर्ज | 1. अशोक मारुती यमगर<br>2. मारुती भानुदास यमगर | 27/12/2025 | INR 7,05,386.01/- |

**मालमत्तेचा पत्ता :** बार्शी बेअरिंग सीटीएस क्रमांक ३८८४/ई/४ येथे स्थित असलेल्या स्थावर मालमत्तेचा तो सर्व तुकडा आणि पार्सल, एम.सी. घर क्रमांक नवीन क्रमांक पी९आर३००३२७० (जुने १२०२६६३), ५४०.४ चौ. फूट, बार्शी, तालुका: बार्शी, सोलापूर, महाराष्ट्र येथे स्थित आहे आणि सदर मालमत्तेला उत्तरेकडून गंगाधर बगळे यांची मालमत्ता, दक्षिणेकडून १२ मीटर रुंद रस्ता, पूर्वेकडून सीटीएस क्रमांक ३८८४/ई/४ मधील उर्वरित भाग, पश्चिमेकडून नागनाथ धनवे यांची मालमत्ता असे वेढलेले आहे.

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेडम्हणून ओळखले जाते)**

**दिनांक : 24/01/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

## GANDHI NATHA RANGJI HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE, SOLAPUR

13, Budhawar Peth, Jain Boarding Campus, Balives, Solapur-413002.
Phone College : (0217) 2624900-01, Prathisthan : (0217) 2327040
Email : gnrhmc09@gmail.com Website : www.gnrhmcsolapur.org

**WANTED**

**Applications are invited for**

| Name of Post | Subject | Qualification | Vacancies |
|---|---|---|---|
| Principal | 01 (Open) | | |
| Professor | Repertory | MD (Hom.) | 01 (Open) |
| Professor | Physiology | MD (Hom.) | 01 (Open) |
| Professor | Pharmacy | MD (Hom.) | 01 (Open) |
| Assistance Professor / Lecturer | Anatomy | MD (Hom.) | 01 (SC) |
| Assistance Professor / Lecturer | Medicine | MD (Hom.) | 01 (SC) |
| Assistance Professor / Lecturer | Surgery | MD (Hom.) | 01 (Open) |
| Assistance Professor / Lecturer | Pathology | MD (Hom.) | 01 (Open) |

Qualification, experience and pay scales are as per NCH New Delhi / MUHS, Nashik Norms. Eligible candidates should send resume and copies of qualifications certificates at lecturer post is having compulsory NTET examination passed all the above certificates at College Office within 15 days submit in the college from the date of publication of Advertisement.

**Mr. Sanjay S. Gandhi**
**President**

Sri Swami Samarth Ads

## सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः मौजे येळंब तसेच बार्शी तालुका व पंचक्रोशीतील, तसेच आसपासचे परिसरातील लोकांना आमचे अशिलाने दिलेल्या माहितीवरुन व दाखविलेल्या कागदपत्रावरुन व नोटीस देण्यास सांगितलेवरुन या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे येळंब येथील जमीन गट नं. २२/१/ब तिचे क्षेत्र ०३ हे. २० आर, पो.ख. ०० हे. ०७ आर, एकूण क्षेत्र ०३ हे. २७ आर, तिचा आकार ०४ रु. ९२ पै. पैकी न विभागलेली आमचे अशिलांचे खरेदी मालकी हिस्स्याची संपूर्ण जमिन, येणेप्रमाणे वर्णनाची आतील दगडमाती, झाडे झुडपे, इ. तदंगभूत वस्तुसह संपूर्ण जमिन, वर वर्णन केलेली जमीन ही मुळ गलांडे पाटील यांचे कुटूंबाची असून ७/१२ हक्कपत्रकी खाशेराव तुळशीराम गलांडे, मिरा सोमनाथ गलांडे, शुभांगी सोमनाथ गलांडे, पल्लवी सोमनाथ गलांडे व मंगल चंद्रसेन घोडके यांचे नावाची नोंद वारसा हक्काने झालेली असून आमचे अशिलाचे नावाची नोंद मंगल चंद्रसेन घोडके यांचेकडून खरेदी घेतलेल्या हिस्स्यास खरेदीखताने आलेली आहे.

वर वर्णन केलेली मिळकत ही अविभक्त, समाईक असून तुम्ही खाशेराव तुळशीराम गलांडे, मिरा सोमनाथ गलांडे, शुभांगी सोमनाथ गलांडे, पल्लवी सोमनाथ गलांडे हे तुमच्या हिस्स्याची जमीन आमचे अशिलांचे परस्पर विक्री करु लागला आहात याची खात्रीशिर माहिती आम चे अशिलास मिळालेली आहे. सदरची जमीन ही अविभक्त असल्याने व मुळ गलांडे पाटील यांचे घराण्याची असल्याने तुम्ही विक्री करत असलेल्या तुमच्या हिस्स्याची जमीन घेण्याचा अग्रहक्क (Right of premption) आमचे अशिलाचा आहे. त्यामुळे आमचे अशिलाच्या परस्पर वर वर्णन केलेल्या तुमच्या हिस्स्याच्या मिळकतीचा हस्तांतरणाचा व्यवहार आमचे अशिलांना विचारलेशिवाय कोणीही करु नये. सदर मिळकतीचे संदर्भाने मे. दिवाणी न्यायालय बार्शी या ठिकाणी कॅव्हेट अर्ज नं. ४९/२०२६ चा दाखल आहे.

सबब वर नमूद मिळकतीसंदर्भाने आमचे अशिलाचे परस्पर वर नमूद व्यक्तींसोबत हस्तांतरणाचा व्यवहार केलेस तो आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही कसल्याही प्रकारची फसगत होवू नये म्हणून सदरची सावधानतेची जाहीर नोटीस स्थळप्रत राखून दिली. ता. २३/०१/२०२६

**सही/-**
**ॲड. श्री. नितीन गजेंद्र शिंदे**
B..(Hon's) LLM. DTL, GDC, CJ.
**५२५/२९२ मातोश्री अंबिका हौसिंग सोसायटी, बार्शी, जि. सोलापूर, मो.नं. ९८६०३३८६३२**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

**प्रधान कार्यालय/ Head Office**
**लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5**

**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापुर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

91 YEARS

### नियम - ८ (१)
### ताबा सूचना

याद्वारे, बँक ऑफ महाराष्ट्रचा अधिकृत अधिकारी, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ अंतर्गत, आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३ च्या उप-कलम (१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, ३१/१०/२०२५ रोजी मागणी सूचना जारी केली होती, ज्यामध्ये खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि जामीनदारांना सदर सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत संपूर्ण देय रक्कम परत करण्याची सूचना देण्यात आली होती.

कर्जदार रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, या सूचनाद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, मी, सदर कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट नियम, २००२ च्या नियम ८ अंतर्गत मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, २२/०१/२०२६ रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला या मालमत्तांशी कोणताही व्यवहार न करण्याची ताकीद देण्यात येत आहे आणि या मालमत्तांशी केलेला कोणताही व्यवहार वर नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रच्या भाराच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्ता सोडवण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे वेधले जाते.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा-साखरपेठ.**<br>**कर्जदार:**<br>१.M/S **अल्कॉन ऑर्गेनिक्स**<br>**प्रस्ताव :- श्री संदीप रामचंद्र चव्हाण**<br>पत्ता: F- ६/१७, MIDC, चिंचोली इंडस्ट्रियल एरिया, सोलापूर - पुणे हायवे, चिंचोली, सोलापूर, महाराष्ट्र- पिन कोड - ४१३२५५ मोबाईल नंबर - ९८९०४११४०६<br>**२. श्री संदीप रामचंद्र चव्हाण**<br>पत्ता: फ्लॅट क्र. ७, वैष्णव वास्तू अपार्टमेंट, विजापूर रोड, निर्मिती विहार जवळ, इंदिरानगर (N.V), सोलापूर, महाराष्ट्र, पिन कोड-४१३००४<br>मोबाईल क्रमांक - ९८९०४११४०६<br>**३. श्री.सुनीता संदीप चव्हाण**<br>W/o. . संदीप रामचंद्र चव्हाण<br>पत्ता: फ्लॅट क्र. ७, वैष्णव वास्तू अपार्टमेंट, विजापूर रोड, निर्मिती विहार जवळ, इंदिरानगर (N.V), सोलापूर, महाराष्ट्र,<br>पिन कोड-४१३००४मोबाईल नंबर - ९८९०४११४०६ | **सुरक्षा : -**<br>**श्री. संदीप रामचंद्र चव्हाण** यांच्या नावे मालमत्ता गहाण.<br>एमआयडीसी चिंचोली, ता. मोहोळ, जिल्हा सोलापूर, महाराष्ट्र येथील भूखंड क्रमांक एफ-६/९, एफ-६/१०, एफ-६/१६, एफ-६/१७, एफ-६/१८ येथील ३२७५.०० चौ.मीटर जागेचे नोंदणीकृत गहाण.<br>**F६/९ च्या सीमा:**<br>पूर्व: ३० मीटर रुंद MIDC रोड<br>उत्तर: प्लॉट क्रमांक F ६/१०<br>पश्चिम: प्लॉट क्रमांक F ६/८<br>दक्षिण: प्लॉट क्रमांक F ६/१८<br>**F६/१० च्या सीमा:**<br>पूर्व: प्लॉट क्रमांक F६/११ आणि प्लॉट क्रमांक F ६/१६<br>उत्तर: MIDC ३० मीटर रॉड आणि प्लॉट क्रमांक F६/११<br>पश्चिम: प्लॉट क्रमांक F६/९ आणि चखऊ ३० मीटर रोड<br>दक्षिण: प्लॉट क्रमांक F ६/१७ आणि प्लॉट क्रमांक F ६/१८<br>**F६/१६ च्या सीमा:**<br>पूर्व: प्लॉट क्रमांक F६/१५ आणि MIDC २० मीटर रोड<br>उत्तर: प्लॉट क्रमांक F६/११ आणि F६/१५<br>पश्चिम: प्लॉट क्रमांक F६/१७ आणि F ६/११<br>दक्षिण: MIDC रोड २० मीटर आणि प्लॉट क्रमांक F ६/१७<br>**F६/१७ चा भाग** सीमा:<br>पूर्व: प्लॉट क्रमांक F६/१६ आणि MIDC २० मीटर रस्ता<br>उत्तर: प्लॉट क्रमांक F६/१२ आणि प्लॉट क्रमांक F६/११<br>पश्चिम: प्लॉट क्रमांक ऋ६/१८ आणि प्लॉट क्रमांक F ६/९<br>दक्षिण: MIDC रोड २० मीटर<br>**F६/१८ च्या सीमा:**<br>पूर्व: प्लॉट क्रमांक F/१७<br>उत्तर: प्लॉट क्रमांक F ६/९<br>पश्चिम: प्लॉट क्रमांक F ६/१९<br>दक्षिण: चखऊ रोड २० मीटर<br><br>२. फ्लॅट क्रमांक ७, चौथा मजला, वैष्णव वास्तु अपार्टमेंट, जुना यांचे नोंदणीकृत गहाणखत ३६४/ए/१/२, नवीन ३१/ए/१/२, प्लॉट क्रमांक ३, नेहरू नगर, विजापूर रोड, सोलापूर, महाराष्ट्र<br>प्लॉट क्रमांक ३ च्या सीमा:<br><br>पूर्व: रस्ता<br>उत्तर: प्लॉट क्रमांक ४<br>पश्चिम: खुली जागा<br>दक्षिण: प्लॉट क्रमांक २<br>फ्लॅट क्रमांक ७ च्या सीमा<br>पूर्व: रस्त्याकडे उघडी बाजू<br>उत्तर: उघडा मार्जिन<br>पश्चिम: जिना केस/लिफ्ट<br>दक्षिण: उघडा मार्जिन | **खात्यातील शिल्लक :**<br>रु. २,१४,४६,३२५.७४/-+<br>**असमायोजित व्याज :**<br>**एकूण** = २,१४,४६,३२५.७४/-<br>(रुपये दोन कोटी चौदा हजार छत्तीस हजार तीनशे पस्तीस रुपये फक्त)<br>**सांकेतिक ताबा**<br>**दिनांक :** २२/०१/२०२६ |

ठिकाण - सोलापूर
दिनांक - 22/01/2026

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि**
**प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**

# १ एप्रिल पासून जनगणना मोहिम

**सोलापूर, दि. २३ जानेवारी-** देशातील बहुप्रतीक्षित 'जनगणना २०२७' च्या पहिल्या टप्प्यास १ एप्रिलपासून सुरुवात होईल. यासाठी सरकारने ३३ प्रश्नांची यादी अधिसूचित केली आहे. प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशाला १ एप्रिल ते ३० सप्टेंबर या दरम्यान आपल्या सोयीनुसार ३० दिवसांचा कालावधी निवडून ही प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. या मोहिमेअंतर्गत नियुक्त केलेले प्रगणक घराघरात जाऊन घराची मालकी, घराचा वापर आणि घराच्या बांधकामासाठी वापरलेले साहित्य याबद्दल माहिती घेतील. जनगणनेच्या पुढील संवादासाठी नागरिकांचा मोबाईल क्रमांकही नोंदवला जाईल. विशेष म्हणजे, प्रत्यक्ष प्रगणक घरी येण्यापूर्वी १५ दिवस नागरिकांना 'स्व-गणना' करण्याचा पर्यायही उपलब्ध करून देण्यात आला आहे.

## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर

मुख्य कार्यालय : ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२
फोन नं-०२१७-२६२२९४४/२६२२९३३

SHRI MAHAVIR URBAN CO-OP BANK LTD SOLAPUR ॥ धनवृद्धि समृद्धि ॥

### द्वितीय विक्री सूचना

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ मधील नियम ८ (६) व ९ नुसार स्थावर मालमत्तेची निविदा मागवून विक्री करण्याची सूचना**

येथे सूचना देण्यात येते कि, या ठिकाणी नमूद करण्यात आलेली स्थावर मिळकत ज्याचा प्रत्यक्ष ताबा सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ नुसार घेण्यात आलेला असून निविदा मागवून मालमत्तेची विक्री करण्यात येत आहे. खाली नमूद केलेल्या मालमत्तेची विक्री पुढील अटी आणि शर्तीनुसार करण्यासाठी इच्छुक निविदादाराकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता | कर्ज खाते क्र. / थकीत कर्ज रक्कम | मागणी नोटीस दिनांक / प्रत्यक्ष ताबा घेतलेली दिनांक | तारण मालमत्ता तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | **कर्जदार :**<br>**१) नवनाथ बिल्डर्स अँड डेव्हलपर्स चे भागीदार**<br>**अ) वैजनाथ भीमाशंकर कुंभार**<br>**ब) मीनाक्षी वैजनाथ कुंभार**<br>रा: ६४, नाथ होम्स, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर ४१३००४<br>**जामीनदार :**<br>**२) नरेश मुसळप्पा कस्सा**<br>रा: ३१, गणेश पेठ, गणेश पेठ शॉपिंग सेंटर समोर, दाजी पेठ, सोलापूर ४१३००५<br>**३) लता रमेश कट्टा**<br>रा: १०२/सी/८६, भवानी पेठ, सोलापूर ४१३००२<br>**४) वैजनाथ भीमाशंकर कुंभार**<br>**५) मीनाक्षी वैजनाथ कुंभार**<br>दोघे रा: ६४, नाथ होम्स, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर ४१३००४ | **कर्ज खाते क्र.**<br>**००५००३२०७००००००९**<br>एकूण रक्कम रुपये **३,९७,९०,७८३/- (तीन कोटी सत्याण्णव लाख नव्वद हजार सातशे त्र्याऐंशी) अधिक** दि. ०१/०७/२०२४ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + नोटीस व कोर्ट खर्च + इतर खर्च | **०३/०७/२०२४**<br>**२८/०५/२०२५** | डी. व सब डी. सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील मौजे मजरेवाडी येथील मिळकत यांसी जुना सर्वे नं. ३२७/१अ/१अ यांसी नवीन सर्वे नं.११७/१अ/१अ/२/१ पैकी प्लॉट नं.११,१२,१३,१४ याचे एकूण क्षेत्र २०२९.८७ चौ. मी. यांसी चतुर्सिमा<br>पूर्वेस - रस्ता<br>पश्चिमेस - सर्वे नं. ११७/१अ/१अ/२/१ मधील प्लॉट नं. १५,१६,१७,१८<br>उत्तरेस - सर्वे नं. ३२३<br>दक्षिणेस - रस्ता |
| २ | **कर्जदार :**<br>**१) नवनाथ बिल्डर्स अँड डेव्हलपर्स चे भागीदार**<br>**अ) वैजनाथ भीमाशंकर कुंभार**<br>**ब) मीनाक्षी वैजनाथ कुंभार**<br>रा: ६४, नाथ होम्स, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर ४१३००४<br>**जामीनदार :**<br>**२) नवनाथ बिल्डर्स अँड डेव्हलपर्स चे भागीदार**<br>**अ) वैजनाथ भीमाशंकर कुंभार**<br>**ब) मीनाक्षी वैजनाथ कुंभार**<br>रा: ६४, नाथ होम्स, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर ४१३००४<br>**३) नरेश मुसळप्पा कस्सा**<br>रा: ३१, गणेश पेठ, गणेश पेठ शॉपिंग सेंटर समोर, दाजी पेठ, सोलापूर ४१३००५<br>**४) लता रमेश कट्टा**<br>रा: १०२/सी/८६, भवानी पेठ, सोलापूर ४१३००२<br>**५) वैजनाथ भीमाशंकर कुंभार**<br>**६) मीनाक्षी वैजनाथ कुंभार**<br>दोघे रा : ६४, नाथ होम्स, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर ४१३००४ | कर्ज खाते क्र.<br>**००५००३२१३००००००५**<br>एकूण रक्कम रुपये **१,४३,५६,६५८/- (एक कोटी त्रेचाळी लाख छप्पन हजार सहाशे अठ्ठावन्न)** अधिक दि. ०१/०७/२०२४ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज नोटीस व कोर्ट खर्च + इतर खर्च | **०३/०७/२०२४**<br>**२८/०५/२०२५** | डी. व सब डी. सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगर पालिका हद्दीतील मौजे मजरेवाडी येथील मिळकत यांसी जुना सर्वे नं. ३२७/१अ/१अ यांसी नवीन सर्वे नं.११७/१अ/१अ/२/१ पैकी प्लॉट नं.११,१२,१३,१४ याचे एकूण क्षेत्र २०२९.८७ चौ. मी. यांसी चतुर्सिमा<br>पूर्वेस - रस्ता<br>पश्चिमेस - सर्वे नं. ११७/१अ/१अ/२/१ मधील प्लॉट नं. १५,१६,१७,१८<br>उत्तरेस - सर्वे नं. ३२३<br>दक्षिणेस - रस्ता |
| ३ | **कर्जदार :**<br>**१) मीनाक्षी वैजनाथ कुंभार**<br>रा: ६४, नाथ होम्स, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर ४१३००४<br>**जामीनदार :**<br>**२) नवनाथ बिल्डर्स अँड डेव्हलपर्स चे भागीदार**<br>**अ) वैजनाथ भीमाशंकर कुंभार**<br>**ब) मीनाक्षी वैजनाथ कुंभार**<br>रा: ६४, नाथ होम्स, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर ४१३००४<br>**३) नरेश मुसळप्पा कस्सा**<br>रा: ३१, गणेश पेठ, गणेश पेठ शॉपिंग सेंटर समोर, दाजी पेठ, सोलापूर ४१३००५<br>**४) लता रमेश कट्टा**<br>रा: १०२/सी/८६, भवानी पेठ, सोलापूर ४१३००२<br>**५) वैजनाथ भीमाशंकर कुंभार**<br>रा: ६४, नाथ होम्स, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर ४१३००४ | कर्ज खाते क्र.<br>**००५००३२१३००००००४**<br>एकूण रक्कम रुपये **१,२९,४०,६६९/- (एक कोटी एकोणतीस लाख चाळीस हजार सहाशे एकोणसत्तर)** अधिक दि. ०१/०७/२०२४ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + नोटीस व कोर्ट खर्च + इतर खर्च | **०३/०७/२०२४**<br>**२८/०५/२०२५** | डी. व सब डी. सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील मौजे मजरेवाडी येथील मिळकत यांसी जुना सर्वे नं. ३२७/१अ/१अ यांसी नवीन सर्वे नं.११७/१अ/१अ/२/१ पैकी प्लॉट नं.११,१२,१३,१४ याचे एकूण क्षेत्र २०२९.८७ चौ. मी. यांसी चतुर्सिमा<br>पूर्वेस - रस्ता<br>पश्चिमेस - सर्वे नं. ११७/१अ/१अ/२/१ मधील प्लॉट नं. १५,१६,१७,१८<br>उत्तरेस - सर्वे नं. ३२३<br>दक्षिणेस - रस्ता |

| |
|---|
| **राखीव किंमत :-** रु. ५,९९,५३,५४५/- (रु. पाच कोटी नव्याणव लाख त्रेप्पन हजार पाचशे पंचेचाळीस फक्त) |
| **बयाणा रक्कम :-** रु. ५९,९६,०००/- (रु. एकोणसाठ लाख शहाण्णव हजार फक्त) |
| **निविदा स्वीकृतीची तारीख आणि वेळ :** दि. ०७/०२/२०२६- दुपारी ३:०० पर्यंत |
| **निविदा दाखल करण्याचे ठिकाण:** मुख्य कार्यालय ६०/६१ पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२ |
| **अ) निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ :** दि. ०९/०२/२०२६ सायंकाळी ५:०० वाजता |
| **ब) निविदा उघडण्याचे ठिकाण:** मुख्य कार्यालय ६०/६१ पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२ |

**इतर अटी आणि शर्ती :**

१) स्थावर मालमत्तेची विक्री **''जेथे आहे, तशी आहे''** या तत्वावर आणि जर काही बोजा असेल तर त्यासह करण्यात येईल. (बँकेकडील माहितीनुसार मालमत्तेवर बोजा नाही)
२) राखीव किंमतीपेक्षा कमी किंमतीस मालमत्तेची विक्री केली जाणार नाही.
३) मालमत्तेची पाहणी दिनांक ०५/०२/२०२६ रोजी सकाळी ११:०० ते दुपारी ४:०० पर्यंत करता येईल.
४) इच्छुक प्रस्तावकाने त्याची निविदा कोऱ्या कागदावर मोहोरबंद पाकिटात त्यावर **''नवनाथ बिल्डर्स अँड डेव्हलपर्स यांची मौजे मजरेवाडी येथील मालमत्ता खरेदीसाठी निविदा''** असे पाकिटावर लिहून बयाणा रक्कम अनामत रक्कमेपोटी (ईएमडी) **रु. ५९,९६,०००/-** जी राखीव किंमतीच्या अंदाजे १० टक्के आहे. **श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली., सोलापूर** यांच्या नावे काढलेली डिमांड ड्राफ्टसह दिनांक ०७/०२/२०२६ - दुपारी ३:०० पर्यंत वाजेपर्यंत सादर करावी.
५) यशस्वी प्रस्तावकाच्या नावे विक्रीचा व्यवहार कर्ज देणाऱ्या बँकेच्या अनुमतीनंतर पूर्ण केला जाईल.
६) यशस्वी प्रस्तावकाने विक्रीच्या किंमतीच्या २५ टक्के रक्कम (आधी जमा केलेल्या बयाणा रक्कमेसह) विक्रीचा व्यवहार त्याचाशी झाल्यानंतर त्वरित आणि उर्वरित रक्कम ६० दिवसाच्या आत जमा करावयाची आहे. जर प्रस्तावकाने नमूद केल्यानुसार विक्रीची रक्कम जमा केली नाही तर त्याने जमा केलेली अनामत रक्कम जप्त होईल.
७) व्यवहारासाठी लागणारा अन्य खर्च, स्टॅम्प ड्युटी, नोंदणी फी, इतर खर्च यशस्वी प्रस्तावकाने भरावयाचा आहे.
८) प्राधिकृत अधिकार्याने कोणतेही कारण न देता लिलाव पुढे ढकलणे/रद्द करणे किंवा अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा संपूर्ण अधिकार राखून ठेवला आहे.
९) अधिक तपशीलासाठी मोबाईल क्र. ७०२०८३३०६० व कोणत्याही कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधता येईल.

**दिनांक : २३/०१/२०२६**
**स्थळ : सोलापूर**

**सील**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### दिल्ली कॅपिटल्सने केली बदली खेळाडूंची घोषणा

**बडोदा :** दिल्ली कॅपिटल्सने शुक्रवारी जखमी खेळाडू दिया यादव आणि ममता मडीवाला यांच्या जागी महिला प्रीमियर लीग हंगामाच्या उर्वरित सामन्यांसाठी प्रगती सिंग आणि ई. सृजना यांची बदली खेळाडू म्हणून घोषणा केली. प्रगती सिंग आणि एडला सृजना यांना प्रत्येकी १० लाख रुपयांच्या मूळ किमतीवर करारबद्ध करण्यात आले आहे. प्रगती सिंग ही एक अष्टपैलू खेळाडू आहे, जिने आतापर्यंत तिच्या कारकिर्दीत पंजाब महिला, इंडिया बी महिला अंडर-१९ आणि इंडिया ई महिला संघांचे प्रतिनिधित्व केले आहे. सृजना दिल्ली कॅपिटल्सच्या संघात नेट बॉलर म्हणून सामील होती आणि आता तिला २०२६ च्या उर्वरित हंगामासाठी बदली खेळाडू म्हणून करारबद्ध करण्यात आले आहे. १६ वर्षीय दीया यादवने बडोदा येथे मुंबई इंडियन्सविरुद्ध महिला प्रीमियर लीगमध्ये पदार्पण केले आणि ती २०२६ मध्ये खेळणारी सर्वात तरुण खेळाडू ठरली. शनिवारी बडोदा येथे दिल्ली कॅपिटल्सचा रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुविरुद्ध महत्त्वाचा सामना आहे.

### ऑस्ट्रेलियाविरुद्ध मालिकेसाठी पाकिस्तानचा संघ जाहीर

**नवी दिल्ली :** २०२६ च्या आयसीसी टी२० विश्वचषकापूर्वी पाकिस्तान क्रिकेट संघ ऑस्ट्रेलियाविरुद्ध तीन सामन्यांची टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट मालिका खेळणार आहे. या मालिकेसाठी पाकिस्तान क्रिकेट मंडळाने अखेर १६ खेळाडूंचा संघ जाहीर केला आहे. सलमान अली आघा संघाचे नेतृत्व करणार आहे. संघात बाबर आझम व शाहीन शाह आफ्रिदीचा पुन्हा संघात समावेश करण्यात आला आहे. मात्र, मोहम्मद रिझवान याला संघातून बाहेर ठेवण्यात आले आहे. ही मालिका २८ जानेवारी ते १ फेब्रुवारी दरम्यान लाहोरच्या गद्दाफी स्टेडियमवर खेळली जाईल. मालिकेचा पहिला सामना २९ जानेवारी रोजी होणार आहे.संघ आणि सपोर्ट स्टाफ २४ जानेवारी रोजी स्टेडियमवर जमतील, तर ऑस्ट्रेलियन संघ २८ जानेवारीला लाहोरमध्ये पोहोचेल. मालिकेत सलमान अली आघा, बाबर आझम, फहीम अशरफ, फखर जमान, शाहीन शाह आफ्रिदी, शादाब खान, उस्मान खान आणि इतर खेळाडू सामील आहेत, जे विश्वचषकाआधी तयारीसाठी महत्त्वाचे ठरेल.

### दक्षिण आफ्रिकेच्या विश्वचषक संघात रिकेलटन, स्टब्सची निवड


**जोहान्सबर्ग :** रायन रिकेलटन आणि ट्रिस्टन स्टब्स यांची बुधवारी पुढील महिन्यात होणाऱ्या टी-२० विश्वचषकासाठी दक्षिण आफ्रिकेच्या संघात दुखापतग्रस्त टोनी डी झोर्झी आणि डोनोव्हान फरेरा यांच्या जागी बदली खेळाडू म्हणून निवड करण्यात आली. डी झोर्झीला गत वर्षीच्या अखेरीस दक्षिण आफ्रिकेच्या भारत दौऱ्यादरम्यान उजव्या पायाच्या स्नायूला दुखापत झाली होती, तर फरेरा सध्या सुरू असलेल्या २० स्पर्धेदरम्यान जखमी झाला. हे दोन्ही खेळाडू वेस्ट इंडिजविरुद्धच्या तीन सामन्यांच्या मायदेशातील टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेतूनही बाहेर झाले आहेत. गत वर्षीच्या उपविजेत्या संघाला आयसीसी स्पर्धेसाठी डेव्हिड मिलरच्या उपलब्धतेबद्दलही चिंता आहे. डी झोर्झीच्या दुखापतीतून सावरण्याची प्रक्रिया अपेक्षेप्रमाणे झालेली नाही.

### नागालॅण्डने आसामला बरोबरीत रोखले

**चेन्नई :** अटो चोपीने अखेरच्या क्षणी केलेल्या गोलमुळे, शुक्रवार धकुआखाना स्टेडियमवर संतोष करंडक २०२५-२६ च्या अंतिम फेरीत एका रोमांचक सामन्यात नागालॅण्डने यजमान आसामला ३-३ अशा बरोबरीत रोखले. या हंगामातील स्पर्धेच्या अंतिम फेरीत दोन्ही संघांसाठी हा पहिला गुण होता. आसामला तामिळनाडूविरुद्ध ०-१ असा पराभव पत्करावा लागला होता, तर नागालॅण्डला आपल्या गत सामन्यात गतविजेत्या पश्चिम बंगालकडून ०-४ असा मोठा पराभव स्वीकारावा लागला होता.

### राज्य शालेय बॉक्सींग स्पर्धेत माढा महाविद्यालयाच्या सायली शेळके हिला कांस्य

**माढा, दि. २३ जानेवारी-**



माढा येथील रयत शिक्षण संस्थेच्या माढा महाविद्यालयाची सायली शेळके हिने अकोला येथे झालेल्या राज्य शालेय बॉक्सींग स्पर्धेत कांस्य पदक पटकाविले. सायलीने १९ वर्षाखालील ७५-८१ किलो वजनी गटात नेतृत्व करताना उत्कृष्ट प्रदर्शन करत हे पदक पटकावले. सायलीला डॉ. पंकज ढमाळ यांचे मार्गदर्शन लाभले. सायलीच्या यशाबद्दल महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष संजीव पाटील, प्राचार्य डॉ. घन:शाम हराळे, उपप्राचार्य अशोक लोंढे, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. पंकज ढमाळ, डॉ. सतीश घाडगे यांनी अभिनंदन केले.

# रणजी करंडक : विदर्भाच्या गोलंदाजांचा प्रभावी मारा

## दर्शन, आदित्य, नचिकेत, पार्थचे प्रत्येकी २ बळी ● विदर्भ २९५, आंध्र प्रदेश २२८


दर्शन नळकांडे



आदित्य ठाकरे

◆ **अनंतपूर, २३ जानेवारी**

प्रतिष्ठेच्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत येथे आंध्र प्रदेशविरुद्ध सुरु असलेल्या एलिट अ गटाच्या साखळी गतविजेत्या विदर्भने दुसऱ्या दिवशी ७१ धावांची आघाडी मिळविली. यश राठोडच्या दमदार ११५ धावांच्या शतकी खेळीच्या बळावर विदर्भाने पहिल्या डावात ८९.३ षटकांत सर्वबाद २९५ धावा उभारल्या. त्यानंतर विदर्भाच्या गोलंदाजांनी प्रभावी मारा करत आंध्र प्रदेशला ६६.३ षटकांत २२८ धावांवर रोखले. पहिल्या डावात ६७ धावांची आघाडी मिळविणाऱ्या विदर्भाने दुसऱ्या दिवसअखेर दुसऱ्या डावात एकही गडी न गमावता चार धावांची नोंद केली. सध्या विदर्भ एकूण ७१ धावांनी आघाडीवर आहे.

विदर्भाने ७ बाद २६७ धावांवरून पुढे खेळत २८ धावांची भर घातली व त्यांचा पहिला डाव २९५ धावांवर आटोपला. कालचा नाबाद शतकवीर १९१ चेंडूंत १४ चौकारांच्या मदतीने ११५ धावांची खेळी केली. नचिकेत भुतेने ६६ चेंडूंचा सामना करत ३ चौकारांसह ३१ धावांची भर घातली. आंध्र प्रदेशकडून कालिदिंदी राजूने ५ बळी टिपलेत, तर कावुरी सतेजाने ३ बळी व नितीश कुमार रेड्डी व सौरभ कुमारने प्रत्येकी एक बळी टिपला.

प्रत्युत्तर देताना आंध्र प्रदेशचा सलामीवीर अभिषेक रेड्डी व आठव्या क्रमांकावरील सौरभ कुमार तसेच नितीश कुमार व करण शिंदेने तेवढी विदर्भाच्या गोलंदाजांचा धैर्याने सामना केला, मात्र त्यांचे इतर फलंदाज खेळपट्टीवर फार वेळ टिकाव धरू शकले नाहीत. अभिषेक रेड्डीने ९१ चेंडूंचा सामना करत १२ चौकारांसह ७३ धावांचे, तर सौरभ कुमारने ८७ चेंडूंत ८ चौकारांसह ६२ धावांचे योगदान दिले. नितीश कुमार रेड्डीने ३५ धावांची, तर करण शिंदेने २० धावांची भर घातली. आंध्र प्रदेशला २२८ धावांवर रोखताना विदर्भाकडून दर्शन नळकांडे, आदित्य ठाकरे, नचिकेत भुते व पार्थ रेखडेने प्रत्येकी २ बळी टिपले, तर हर्ष दुबेला एक बळी टिपण्यात यश मिळाले. ◀(वृत्तसंस्था)

# सरफराज खानने हैदराबादविरुद्ध मुंबईसाठी द्विशतक झळकावले

## सिद्धेश लाडसोबत चौथ्या गड्यासाठी २४९ धावांची भागीदारी



◆ **हैदराबाद, २३ जानेवारी**

भारतीय फलंदाज सरफराज खानने शुक्रवारी राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर हैदराबादविरुद्ध रणजी करंडक एलिट गट क सामन्यात मुंबईसाठी २०६ चेंडूंमध्ये शानदार द्विशतक झळकावले.

सरफराजने आपल्या कारकिर्तेतील पाचवे प्रथम-श्रेणी द्विशतक नोंदवले, अखेरीस तो २१९ चेंडूंमध्ये २२७ धावा करून बाद झाला. त्याच्या या खेळीत १९ चौकार आणि नऊ षट्कारांचा समावेश आहे. यात त्याचा स्ट्राइक रेट १०३.६५ होता. यामध्ये त्याने भारतीय वेगवान गोलंदाज आणि हैदराबादचा कर्णधार मोहम्मद सिराजच्या केवळ ३९ चेंडूंमध्ये ४५ धावा काढल्या.

त्याने प्रभारी कर्णधार सिद्धेश लाड (१०४) सोबत चौथ्या गड्यासाठी २४९ धावांची भागीदारी केली, त्यामुळे ३ बाद ८२अशी अवस्था झालेल्या मुंबईला ५०० धावांचा टप्पा पार करता आला. त्याच्या या खेळीमुळे सामना मुंबईच्या बाजूने वळला आहे, तसेच सरफराजने प्रथम-श्रेणी क्रिकेटमध्ये ५,००० धावांचा टप्पाही पार केला आहे. ◀(वृत्तसंस्था)

# सौराष्ट्रकडून पंजाबचा दोन दिवसांत धुव्वा

◆ **राजकोट, २३ जानेवारी**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत एलिट क गटाच्या साखळी सामन्यात शुक्रवारी सौराष्ट्रने पंजाबचा दोन दिवसांत धुव्वा उडवला. या विजयामुळे सौराष्ट्राच्या बाद फेरी गाठण्याच्या आशा कायम आहे. या सामन्यात शुभमन गिलने निराशाजनक कामगिरी केली असून त्याने ० आणि १४ धावा केल्या. दुसऱ्या डावात सौराष्ट्र्याच्या पार्थ भुत व धर्मेंद्रसिंह जडेजाने प्रत्येकी पाच बळी घेतले, त्यामुळे पंजाबचा संघ दोन्ही डावांमध्ये मिळून केवळ ७९ षटकेच खेळू शकला. सामन्यात एकूण १० बळी टिपणारा व नाबाद ३७ धावांची खेळी करणारा पार्थ भुत सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

फिरकी गोलंदाजांना मदत करणाऱ्या खेळपट्टीवर सौराष्ट्राच्या पहिल्या डावातील १७२ धावांच्या प्रत्युत्तरात पंजाबला १३९ धावांपर्यंत मजल मारता आली. सौराष्ट्रने दुसऱ्या डावात २२६ धावा काढून पंजाबसमोर विजयासाठी ३२० धावांचे लक्ष्य ठेवले, परंतु पंजाबचा संपूर्ण संघ १२५ धावांतच गारद झाला. ◀(वृत्तसंस्था)



# कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयास उपविजेतेपद

## आंतरमहाविद्यालयीन सॉफ्टबॉल स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ जानेवारी -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन सॉफ्टबॉल स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेच्या पंढरपूरच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या पुरुष संघाने उपविजेतेपद संपादिले.

संघाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव, अधिष्ठाता डॉ. बी. एस. बलवंत, डॉ. सुशील कुमार शिंदे व डॉ. अमोल ममलया, उपप्राचार्य, सर्व प्राध्यापक व सेवक वर्गाने विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. संघाने दाखवलेली सांघिक भावना, शिस्त व मेहनत ही इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, असे मत प्राचार्य डॉ. जाधव यांनी व्यक्त केले.

# राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलींना तृतीय स्थान

## संघात सोलापूरची संस्कृती माने, संघव्यवस्थापक संतोष जाधव

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

गुडीवाडा, आंध्रप्रदेश येथे १८ ते २३ जानेवारी दरम्यान झालेल्या शालेय राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्र संघाने १४ वर्षांखालील मुलींच्या गटात तृतीय स्थान संपादिले. या संघात सोलापूरच्या संस्कृती माने व संघ व्यवस्थापकपदी जागृती विद्यामंदीरचे क्रीडा शिक्षक संतोष जाधव यांचा समावेश होता.

**महाराष्ट्राचा संघ:** ईशिका अण्णासाहेब बवले, ज्ञानेश्वरी विक्रम बवले, आराध्या



योगेश दौंडकर, समृद्धी संतोष झगडे (पुणे), भैरवी रत्नदीप इंगवले (सातारा), शर्वरी सचिन पाटील ( वाशिम), अमृता विजय पाटील (ठाणे), सीमा लतिफ शेख (लातूर), राधिका कमलेश्वर अकिंगे (नाशिक), संस्कृती दिपक माने (सोलापूर), कृष्णा हरीओम वर्मा (नाशिक), पायल अनिल आढे (परभणी). प्रशिक्षक- सायली जाधव.



# मुलांच्या गटात सोलापूर, मुलींच्या गटात सांगली विजेता

## राज्य ज्युनियर सॉफ्टबॉल स्पर्धा

**अक्कलकोट, दि. २३ जानेवारी -**

मुलांच्या गटात सोलापूर व मुलींच्या गटात सांगलीने ३१व्या राज्य ज्युनियर सॉफ्टबॉल स्पर्धेचे अजिंक्यपद पटकाविले.

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान अक्कलकोट व सोलापूर मनपा जिल्हा सॉफ्टबॉल असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या स्पर्धेत

मुलांच्या अंतिम सामन्यात सोलापूर मनपा संघाने लातूर संघाचा ३-१ होमरन ने पराभव केला. जळगाव संघाने अमरावती संघास ७-१ होम रनने हरवीत तृतीय स्थान संपादले.

मुलींमध्ये सांगली जिल्ह्याने जळगाव जिल्ह्यास ३-१होमरनने नामवित विजेतेपद पटकावले. तृतीय क्रमांकासाठी झालेल्या सामन्यात कोल्हापूरच्या मुलींच्या संघाने पीसीएमसी संघाचा ७-० होम रनने धुव्वा उडविला.

यशस्वी संघास वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष नगराध्यक्ष विद्यमान नगरसेवक महेश इंगळे यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, राज्य सचिव शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त डॉ प्रदीप तळवेलकर, युवा नेते प्रथमेश इंगळे, गोकुळ तांदळे, जिल्हा उपाध्यक्ष प्रा.संतोष गवळी, अभय बिराज, प्रसन्नजीत बनसोडे आदी उपस्थित होते.

या स्पर्धेसाठी पंच म्हणून संतोष आवचार ,गणेश बेटूदे ,भीमा मोरे, कल्पेश कोल्हे सोमनाथ नलावडे शेषराज वानखेडे विकास वानखेडे संकेत पावले स्वप्निल गदादे, शिवानी देशमुख,माधुरी महाजन आदीनी काम पाहिले.

जिल्हा सॉफ्टबॉलचे स्पर्धा सचिव प्रा.संतोष खेंडे , मारुती घोडके , खजिनदार गंगाराम घोडके, मारुती घोडके,परमेश्वर व्हसुरे संचालक श्रीधर गायकवाड, रवींद्र चव्हाण, प्रशांत राणे, प्रबुद्ध चिंचोलीकर , संतोष पाटील, प्रशांत कदम, सिताराम भांड सागर जगझाप, महादेव वाघमारे, समर्थ आहेरवाडी, अनिकेत कांबळे यांनी या स्पर्धेचे यशस्वी नियोजन केले.

# छत्रपती क्रीडा मंडळ धाराशिवला विजेतेपद

## राज्य निमंत्रित खो-खो स्पर्धा : राजमाता जिजाऊ क्रीडा मंडळ पुणे द्वितीय




**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. २३ जानेवारी-**

महिलांच्या राज्य निमंत्रित खो-खो स्पर्धेत धाराशिवच्या छत्रपती क्रीडा मंडळाने विजेतेपद पटकाविले. अंतिम सामन्यात त्यांनी पुण्याच्या राजमाता जिजाऊ क्रीडा मंडळाचा पराभव केला.

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व माजी विद्यार्थी कल्याणकारी संघ क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ पी एम उषा, महाराष्ट्र खो खो असोसिएशन आणि सोलापूर खो खो ॲम्युचर यांच्या संयुक्त विद्यमाने कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त ही स्पर्धा आयोजित केली होती.

पारितोषिके यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ बार्शीचे अध्यक्ष अरुणदादा बारबोले यांच्या हस्ते देण्यात आली. अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष नंदन जगदाळे होते. यावेळी महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सचिव प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव, संस्थेचे डॉ. बी वाय यादव, पी. टी पाटील, अरुण देबडवार, जे . सी. शितोळे आदी उपस्थित होते. प्रा. डॉ. पी.ए. पाटील व डॉ. एल.आय. राठोड यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एस.एस. मारकड यांनी आभार मानले.

**या स्पर्धेतील गुणानुक्रमे पारितोषिके प्राप्त संघ:**

छत्रपती क्रीडा मंडळ धाराशिव (२१ हजार), राजमाता जिजाऊ क्रीडा मंडळ पुणे ( १५ हजार), रा. फ. नाईक क्रीडा मंडळ ठाणे ( ११ हजार) शिवभक्त क्रीडा मंडळ ठाणे ( ७ हजार).

**अष्टपैलू, संरक्षक व आक्रमक पारितोषिके विजेते :** संध्या सुरवसे (धाराशिव), अश्विनी शिंदे (धाराशिव), प्रियंका इंगळे (पुणे).

# पहिल्या दिवस अखेर महाराष्ट्राच्या पहिल्या डावात नाबाद ४७ धावा, त्रिपुराचा पहिला डाव २०९ धावात संपुष्टात

## महाराष्ट्र विरुद्ध त्रिपुरा, २३ वर्षाखालील मुलांचा कर्नल सी के नायडू चषक सामना

### तन्मोय व सत्यजित दास यांची संयमी अर्धशतके तर शुभम मेडचे ४ बळी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी -**

येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर सुरू झालेल्या महाराष्ट्र विरुद्ध त्रिपुरा ह्या ४ दिवसीय क्रिकेट सामन्यात पहिल्या दिवशी खेळ थांबला तेंव्हा महाराष्ट्र संघाने त्रिपुरा संघाच्या पहिला डावाच्या २०९ धावांच्या मोबदल्यात बिन बाद ४७ धावा केल्या असून त्रिपुरा कडून सलामीचा फलंदाज तन्मोय दास व सत्यजित दास यांच्या संयमी अर्धशतकाचा समावेश आहे तर महाराष्ट्राच्या उत्कृष्ट गोलंदाज शुभम मेडने ४ बळी मिळविले.

फलंदाजी साठी उत्तम खेळपट्टी असल्याचे पाहून पाहुण्या त्रिपुरा संघाने सकाळी प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि सलामीचे फलंदाज दीपजोय देब व तन्मोय दास यांनी अर्धशतकी सलामी दिली. २२व्या षटकात शुभम मेड ने जोडी फोडताना देब (२४ धावा ६९ चेंडू) याला पायचीत केले. त्यानंतर आलेल्या सप्तजीत दास ने चेंडूगणिक धावा करण्याचे सूत्र अवलंबिले व त्याचे सोबत सलामीवीर


शुभम मेड


सप्तजीत दास


तन्मोय दास

तन्मोयने १०२ चेंडू मध्ये ३-३ चौकार, षटकार लगावत अर्धशतक साजरे केले आणि दास जोडगोळीने दुसऱ्या गड्यासाठी ५२ धावांची भागीदारी रचली. जेवणाला खेळ थांबण्याच्या शेवटच्या षटकात स्वराज चव्हाणने तन्मोय याला दिग्विजय पाटील करवी झेलबाद करत जोडी फोडली तेंव्हा ११९ धावा (३५.३ षटके) झालेल्या.

दुसऱ्या सत्राचा खेळ सुरू झाला आणि ३० धावांची भर घातली तेंव्हा मध्यमवती गोलंदाज अजय बोरुडे यांनी अर्धशतकवीर सत्यजित दास याला ५४ धावांवरती सचिन धस करवी झेलबाद व ३ धावांच्या फरकात दुर्लभ रॉय याला देखील पायचीत केले. त्यानंतर आलेल्या आनंध भौमिक व अरिंदम बर्मन यांनी ३५ धावांची भागीदारी केली असता शुभम ने दुसरा बळी मिळवला तो आनंध (१२ धावा) याला पायचीत करत. चहापानाला खेळ थांबला तेव्हा त्रिपुरा संघ १९६/६ (६८ षटके) अशा स्थितीत होता.

त्यानंतर मात्र शेवटच्या सत्रात तळातले फलंदाज एकापाठोपाठ एक बाद होत गेले व त्रिपुराचा पहिला डाव २०९ धावांवरती संपुष्टात आला. अरींदम बर्मन ने ३१ धावा केल्या तर महाराष्ट्र कडून स्वराज चव्हाण ४६/३ बळी, अजय बोरुडे २ व किरण चोरमले १ बळी घेतले.

महाराष्ट्राकडून पहिल्या डावाची सुरुवात हर्ष मोगावीरा आणि अनिरुद्ध साबळे यांनी करत दिवसा अखेरीला नाबाद ४७ धावांची सलामी दिली. खेळपट्टीवर हर्ष मोगावीरा नाबाद २६ अनिरुद्ध साबळे नाबाद १७ धावांवरती खेळत आहेत.

महाराष्ट्र संघाला दुसऱ्या दिवशी पहिल्या डावात आघाडी घेण्यासाठी अद्यापि १६३ धावांची गरज आहे व ती संघ उद्या किती गड्यांच्या मोबदल्यात घेतो हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

# प्रदक्षिणा मार्गाने निघाली भव्यदिव्य शोभायात्रा






## विवाहात सुमारे ७ हजार वऱ्हाडी भाविकांनी घेतला महाप्रसाद



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ जानेवारी-**

वसंत पंचमीच्या शुभ मुहूर्तावर आज गुरुवार, दिनांक २३ जानेवारी रोजी श्री विठ्ठल व श्री रूक्मिणी मातेचा विवाह सोहळा मोठ्या भक्तिभावात व उत्साहपूर्ण वातावरणात श्री विठ्ठल सभामंडप येथे संपन्न झाला.

दुपारी ठीक ४.३० वाजता श्री विठ्ठल रूक्मिणी मातेची पाद्यपूजा मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्री. राजेंद्र शेळके यांच्या शुभहस्ते सपत्नीक विधीवत पार पडली. या सोहळ्यासाठी भाविकांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लावली होती. विवाह सोहळ्यानिमित्त दर्शनासाठी व सहभागी होण्यासाठी आलेल्या भाविकांसाठी श्री संत तुकाराम भवन व श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास येथे अन्नप्रसादाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. या अन्नप्रसादाचा सुमारे ७,००० भाविकांनी लाभ घेतला. अन्नप्रसादामध्ये चपाती, भरले वांगे, मटकी-बटाटा-वटाणा रस्सा भाजी, दही चटणी, पापड, भजी, जिरा राईस, फोडणीचे वरण, गुलाबजाम, शिरा, बालुशाही, जिलेबी तसेच बुंदी लाडू यांचा समावेश होता. सदर भोजनप्रसाद व्यवस्थेची जबाबदारी विभाग प्रमुख श्री. विनोद पाटील व श्री. बलभिम पावले यांच्याकडे सोपविण्यात आली होती. अन्नप्रसाद वाटपासाठी विविध स्वयंसेवी संस्थांचे स्वयंसेवक सहकार्य करत होते. यावेळी विवाह सोहळ्यानिमित्त प्रदक्षिणा मार्गाने भव्य व देखणी शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेमध्ये ढोलपथक, मर्दानी खेळ, लेझीम पथक, लाईट छत्री, बॅन्ड पथक यांचा समावेश होता.आकर्षक फुलांनी सजविण्यात आलेल्या रथामुळे शोभायात्रेला विशेष शोभा प्राप्त झाली. या शोभायात्रेचा आनंद घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

> श्री रुक्मिणी मातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, तांबडी चिंचपेटी, जवमनी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मी हार, मोहरांची, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा, मोत्याचे मंगळसूत्र, नथ, तन्मयी, मोत्याचा कंठा, हिरवी चिंचपेटी इत्यादी अलंकार परिधान करण्यात आले होते.

## महत्वाचे...



### वळसंग पोलीस ठाण्यात पोलीस अधीक्षकांची वार्षिक तपासणी

**वळसंग २३ जानेवारी-**

दि.२२ जानेवारी रोजी वळसंग पोलीस ठाणे येथे माननीय पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांची वार्षिक तपासणी यशस्वीरीत्या पार पडली. यावेळी माननीय पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी पोलीस ठाण्याच्या कार्यपद्धतीचा आढावा घेतला. तपासणीदरम्यान गुन्हे, अर्ज, मयत प्रकरणे तसेच इतर अभिलेखांची बारकाईने पाहणी केली. याप्रसंगी पोलीस अधीक्षक हस्ते चोरी व फसवणूक प्रकरणातील पुण्यातून हस्तगत केलेला मुद्देमाल संबंधित फिर्यादींना परत करण्यात आला. मुद्देमाल मिळाल्यानंतर फिर्यादींनी आनंद व्यक्त करत अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. तसेच पोलीस ठाण्यातील मुद्देमालाची संपूर्ण माहिती डिजिटल पद्धतीने जतन करण्यात आली असून प्रत्येक मुद्देमालावर क्यूआर कोड आधारित प्रणाली राबविण्यात आली आहे. यामुळे मुद्देमालाची माहिती तत्काळ उपलब्ध होण्यास मदत होत आहे असे संपूर्ण माहिती वळसंग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल डोंगरे यांनी माहिती दिली.

### श्रीशिवचरीत्राचे गाढे अभ्यासक अनिलकाका बडवे यांचे निधन

**पंढरपूर,दि.२३ जानेवारी -**



श्री शिवचरीत्राचे गाढे अभ्यासक, जाणता राजा नाटकातील ज्येष्ठ कलाकार, कडवे हिंदुत्ववादी, रायगडाचे धारकरी, कुशल संघटक, हिंदुमहासभेचे माजी प्रदेशाध्यक्ष, उत्कृष्ट प्रवचनकार, प्रल्हाद महाराज बडवे यांचे वंशज, साप्ताहिक संतमतचे संस्थापक संपादक ह.भ.प.अनिलकाका शंकर बडवे (वय- ८४) यांचे शुक्रवारी निधन झाले. श्रीक्षेत्र पंढरीत चातुर्मासात साधकांमध्ये आध्यात्मिक ज्ञानाबरोबरच क्षात्रतेज हि असले पाहिजे तरच 'धर्मरक्षण' शक्य आहे या विचाराने चातुर्मास साधकांना चार महिने अखंड श्रीशिवचरीत्राचे 'पाठ' सांगण्याचे काम देखील गेल्या अनेक वर्षापासून ते सातत्याने करीत होते. (कै.) अनिल बडवे यांच्या पश्चात पत्नी,दोन विवाहित मुली,एक मुलगा,सुन,नातवंडे, जावाई असा मोठा परिवार आहे. येथील प्रसिध्द विधिज्ञ अँड.आशुतोष बडवे यांचे ते वडील होते.



## नगराध्यक्ष आनंद माने यांच्या हस्ते फेरीवाल्यांना धनादेशाचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२३ जानेवारी -**

सांगोला नगरपरिषदेतर्फे नगराध्यक्ष आनंद माने व मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांच्या हस्ते सांगोल्यातील ३० पथ विक्रेत्यांना पीएम स्वनिधी अंतर्गत कर्जाचे वितरण करण्यात आले. तसेच पथ विक्रेत्यांना कर्ज मंजुरीचे पत्र वितरित करण्यात आले.

नगराध्यक्ष माने यांनी उपस्थित पथ विक्रेत्यांना मिळालेले कर्ज वेळेत परतफेड करण्याविषयी मार्गदर्शन केले. तसेच ज्या पथविक्रेत्यांनी प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेचा अद्याप लाभ घेतला नसेल अशा पथ विक्रेत्यांना या योजनेची माहिती देण्याचे आवाहन उपस्थितांना केले.

यावेळी बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापक नागेश गुंजोटे, युनियन बँक ऑफ इंडियाचे कर्ज व्यस्थापक प्रवीण खटकाळे तसेच नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भारतातील लोकशाही समरस व सहिष्णू : प्रा.डॉ. शिंदे

### भारतीय संविधानातील अल्पसंख्यांक अधिकार विषयावर व्याख्यान संपन्न



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२३ जानेवारी -**

भारतीय संविधानाच्या उद्देशिकेत देशाच्या लोकशाही व्यवस्थेचे सार दडलेले आहे. भारताने धार्मिक राष्ट्राचा स्वीकार न करता धर्मनिरपेक्ष लोकशाहीचा स्वीकार केल्यामुळे देशात सामाजिक एकात्मता, बंधुता व शांतता टिकून आहे. धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व स्वीकारल्यामुळे भारतातील लोकशाही समरस व सहिष्णू बनली आहे. समान नागरी कायदा लागू झाल्यास सर्व धर्मांतील स्त्रियांना अधिक न्याय व समानता मिळू शकेल असे प्रतिपादन प्रा. डॉ. सुशीलकुमार शिंदे यांनी केले.

येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात अल्पसंख्यांक विकास समितीतर्फे भारतीय संविधानातील अल्पसंख्यांक अधिकार तरतुदी या विषयावर प्रा. डॉ. शिंदे यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी अधिष्ठाता प्रा. डॉ. बाळासाहेब बळवंत होते. अल्पसंख्यांक विकास समितीचे नोडल ऑफिसर प्रा. डॉ. दत्तात्रय डांगे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. शिंदे यांनी भारतामध्ये विविध धर्म, जाती, भाषा व संस्कृतींचा संगम असून धार्मिक व भाषिक सलोखा ही भारतीय संस्कृतीची मूलभूत वैशिष्ट्ये असल्याचे सांगितले. भारतीय संविधानाने अल्पसंख्यांकांच्या धार्मिक, सांस्कृतिक व शैक्षणिक हक्कांचे संरक्षण केले असून कलम १४, १५ व १६ अंतर्गत सर्व नागरिकांना समान संधी देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. अध्यक्षीय मनोगतात प्रा. डॉ. बळवंत म्हणाले की, भारतीय संविधानाने जगातील विविध राष्ट्रांच्या कायद्यांचा अभ्यास करून आदर्श मूल्यांचा स्वीकार केल्यामुळे ते जगातील एक सर्वोत्तम व आदर्श संविधान ठरल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रा. सविता उपपल्ली यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. दादासाहेब हाके, प्रा. सुलताना मुलाली, प्रा. सारिका मुळूक, प्रा. डॉ. सुमय्या पठाण, प्रा. डॉ. शैलेंद्र सोनवले, प्रा. गणेश भाकरे आदी उपस्थित होते. बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. शाखेतील ६९ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उपस्थिती नोंदविली. अल्पसंख्यांक विकास समितीचे चेअरमन प्रा. रियाज शेख यांनी आभार मानले. अमोल माने व ओंकार नेहतराव यांनी परिश्रम घेतले.

## करकंब येथे बालकांचे बोरन्हाण



**करकंब, दि.२३ जानेवारी-**

येथील परिसरात अनेक घरांतून माता-भगिनींकडून लहान बालकांचा बोरन्हाण कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. बोरन्हाण संस्कार करण्यामागे लहान मुलांचे आरोग्य चांगले रहावे, त्यांची रोगप्रतिकारक शक्ती वाढावी हा हेतू आहे. संक्रांति निमित्त बोरन्हाण करण्याची ही प्रथा श्रीकृष्ण जन्मापासूनच चालत आलेली आहे. लहान मुलांना या ऋतूंची बाधा होऊ नये म्हणून या काळात मिळणारी फळे जसे बोरे,ऊस हरभरा,भुईमुगाच्या शेंगा यांचे सेवन मुलांनी केल्यास त्यांचे शरीर सुदृढ तसेच निरोगी होण्यास तसेच त्यांची प्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते. त्यामुळे बोरन्हाणाचे वेळी सध्याच्या ऋतुमध्ये आलेली फळे व अन्य पदार्थ वापरतात.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**वैद्यकीय काम**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने विभागीय रेल्वे रुग्णालय, सोलापूरसाठी स्थानिक खरेदीच्या वस्तूंच्या खालील पुरवठ्यासाठी मुख्य वैद्यकीय अधीक्षक, रेल्वे रुग्णालय, सोलापूर यांनी ई-निविदा मागविल्या आहेत. वाटपाच्या तारखेपासून 24 महिन्यांसाठी. 1. कामाचे नाव:- डॉ. कोटनिस मेमोरियल रेल्वे रुग्णालय, सोलापूर, मध्य रेल्वे, येथे 24 तास (24×7) स्थानिक खरेदीसाठी परवानाधारक विक्रेते/कंपन्या/रसायनशास्त्रज्ञांच्या बळकटीकरणासाठी कराराचे मूल्यांकन करा. सेवा सुरू झाल्यापासून 02 वर्षांच्या कालावधीसाठी. 2. निविदा सूचना क्रमांक:-DRH-SUR-LP-MED2026, दिनांक:20/01/26, 3. पुरवठ्याचा अंदाजे खर्च:- 24 महिन्यांसाठी रु. 70,91,471.1/- (रुपये सत्तर लाख एक्याण्णव हजार चारशे एकहत्तर रुपये फक्त). 4. निविदा कागदपत्रांची किंमत (परतफेड न करण्यायोग्य):- शून्य, 5. बयाणा रक्कम ठेव (EMD):- रु. 141830/- (रु. एक लाख एकेचाळीस हजार एलघ्टशे तीस रुपये फक्त) (परत करण्यायोग्य) बयाणा रक्कम जमा करण्यासाठी ई-पेमेंट गेटवेद्वारे ऑनलाइन वेबसाइट www.ireps.gov.in द्वारे करता येते. 6. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ आणि निविदा उघडण्याची वेळ आणि तारीख: 16-02-2026 (15.00 वाजेपर्यंत) फक्त www.ireps.gov.in या वेब पोर्टलद्वारे ऑनलाइन. निविदा 16/02/26 रोजी दुपारी 3.00 वाजता उघडल्या जातील. 7. निविदा कागदपत्रे उपलब्ध:- निविदा कागदपत्रे cr.indianrailways.gov.in वेबसाइटद्वारे सूचित केली जातील. ८. काम सुरू करण्याची निश्चित तारीख: स्वीकृती पत्र जारी केल्यापासून 30 दिवसांच्या आत किंवा सीएमएस सोलापूरच्या सूचनांनुसार. 9. निविदा खर्च आणि ईएमडी, आवश्यक कागदपत्रे (जर असतील तर) सादर करण्याचे अधिकार आणि ठिकाण आणि निविदा कागदपत्रांवर स्पष्टीकरण मागणे:- फक्त www.Ireps.gov.in या वेब पोर्टलच्या ई-पेमेंट गेटवेद्वारे ऑनलाइन. 10. पात्रता निकष:- निविदा एजन्सीकडे डिजिटल टोकन असणे आवश्यक आहे. आयआरईपीएसने मान्यता दिली आहे.

**मुख्य वैद्यकीय अधीक्षक**
**सोलापूर**

**रेल्वे मार्गाचे अनधिकृत क्रॉसिंग हा दंडनीय गुन्हा आहे.**

## निधन वृत्त...

### पेरसिंह जहागिरदार


**पिलीव, दि.२३ जानेवारी-**



माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील जहागिरदार घराण्यातील पेरसिंह उर्फ भैय्यासाहेब जयसिंहराव जहागिरदार (वय-५०) यांचे अल्पशा आजाराने पुणे येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, एक बंधू, पुतणे, बहीण असा परिवार आहे.

### मुकेशकुमार मित्तल

**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**



संजना अपार्टमेंट, होटगी रस्ता येथील मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील मुख्य नियंत्रक मुकेश कुमार मित्तल (वय ५८) यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी आणि दोन मुली आहेत. मुकेश कुमार मित्तल रेल्वे विभागात अतिशय लोकप्रिय व्यक्तिमत्व होते.

**बैंक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra**
**प्रधान कार्यालय/ Head Office**
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal sol@mahabank.co.in

**नियम - ८ (१)**
**ताबा सूचना**

याद्वारे, बँक ऑफ महाराष्ट्रचा अधिकृत अधिकारी, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ अंतर्गत, आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३ च्या उप-कलम (१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, ०३/०२/२०२५ रोजी मागणी सूचना जारी केली होती, ज्यामध्ये खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि जामीनदारांना सदर सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत संपूर्ण देय रक्कम परत करण्याची सूचना देण्यात आली होती.

कर्जदार रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, या सूचनाद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, मी, सदर कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट नियम, २००२ च्या नियम ८ अंतर्गत मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, २१/०१/२०२६ रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा भौतिक ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला या मालमत्तांशी कोणताही व्यवहार न करण्याची ताकीद देण्यात येत आहे आणि या मालमत्तांशी केलेला कोणताही व्यवहार वर नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रच्या भाराच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्ता सोडवण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे वेधले जाते.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- बार्शी**<br>**कर्जदार -**<br>**१.श्री. धीरज प्रशांत जगदाळे**<br>प्लॉट क्रमांक ६, गट क्रमांक ८०१/२, पाटील कॉलनी, अलीपूर रोड बार्शी ४१३४०१.<br>**२.श्री. वसंत अनंत जगदाळे**<br>S/o अनंत रामा जगदाळे, मु.पो.चरे, ता. बार्शी, जि. सोलापूर, महाराष्ट्र - ४१३४०९ | **सुरक्षा :-**<br>**श्री. धीरज प्रशांत जगदाळे** यांच्या नावावर प्लॉट क्रमांक ६, गॅट क्रमांक ८०१/२, पाटील कॉलनी, अलीपूर रोड बार्शी ४१३४०१ चे सर्व तुकडे आणि पार्सल, बांधकाम क्षेत्र - ७५.०० चौ. मीटर,<br>एकूण जमीन क्षेत्र - ९६.०० चौ. मीटर<br>सीमा खालीलप्रमाणे:<br>पूर्व: रस्ता<br>दक्षिण: रस्ता<br>पश्चिम: त्याच गॅट क्रमांक ८०१/२ मधील प्लॉट क्रमांक ७<br>उत्तर: गॅट क्रमांक ८०१ मधील मालमत्ता<br>CERSI आयडी २०००३३६८३५८० | **खात्यातील शिल्लक :**<br>रु.२९,७७,२९४.००/- +<br>**लागू न केलेले व्याज**<br>रु.१,१५,३९३.००/-<br>**एकूण** = रु.३०,९२,६८७.००/-<br>(रुपये तीस लाख ब्याण्णव हजार सहाशे सत्याऐंशी फक्त रुपये)<br>**भौतिक ताबा**<br>**दिनांक :** २१/०१/२०२६ |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - 21/01/2026**

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि**
**प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**

**श्री. सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती सोलापूर**
**श्री. सिध्देश्वर बाजार पेठ, हैद्राबाद रोड, सोलापूर**
**फोन नं. २३०४६०८**

जा.नं. जाहीर आवाहन/२९०८
दिनांक : २३/१/२०२६

**जाहीर आवाहन**

महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ७ नुसार व महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी - विक्री (विकास व विनियमन) नियम १९६७ चे नियम ६ व ७ मधील तरतुदीनुसार श्री. सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती सोलापूर चे अनुज्ञप्ती / परवानाधारक आडते, व्यापारी, दलाल, प्रक्रिया, वखारवाला, हमाल, तोलार, मापारी इत्यादींनी श्री. सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती सोलापूर यांचेकडून घेतलेल्या अनुज्ञप्तीचे नुतनीकरण करावयाचे आहे. दिनांक १/४/२०२५ ते विमांक ३१/३/२०२६ या कालावधीतील श्री. सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती सोलापूर ची अनुज्ञप्ती / परवाना धारण केलेल्या परवानाधारकांना कळविण्यात येते की, त्यांचे अनुज्ञप्ती परवान्याची मुदत दिनांक ३१/३/२०२६ रोजी संपत आहे.

तरी ज्या अनुज्ञप्तीधारकांना दिनांक १/४/२०२६ ते दिनांक ३१/३/२०२७ या कालावधीकरीता अनुज्ञप्ती / परवान्याचे नुतनीकरण करावयाचे आहे अशा अनुज्ञप्ती / परवानाधारकांनी दिनांक १/२/२०२६ ते दिनांक २८/२/२०२६ या कालावधीमध्ये श्री. सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती सोलापुर या कार्यालयाकडे खालील कागदपत्रासह व योग्य त्या फी च्या पूर्ततेसह अनुज्ञप्ती / परवाना नुतनीकरण करणेकरीता अर्ज सादर करावेत.

दिनांक १/३/२०२६ ते दिनांक ३१/३/२०२६ या कालावधीत अनुज्ञप्ती / परवाना नुतनीकरणाकरीता दिलेल्या मुदतीनंतर अर्ज केल्यास नियमातील तरतुदीनुसार आडते, व्यापारी, दलाल यांना अनुज्ञप्ती परवाना नुतनीकरणाच्या फी च्या १० टक्के इतकी रक्कम विलंबाकार म्हणून आकारण्यात येईल. तसेच इतर अनुज्ञप्ती / परवानाधारकांना दररोज एक रुपया प्रमाणे विलंबाकार (लेट फी) म्हणून आकारण्यात येईल. दिनांक ३१/३/२०२६ नंतर अनुज्ञप्ती नुतनीकरण केले जाणार नाही, अनुज्ञप्ती नुतनीकरणासाठीचे अर्जांचे नमुने बाजार समितीच्या मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) मिळू शकतील. दिनांक ३१/३/२०२६ नंतर नूतनीकरण न करता विनाअनुज्ञप्ती / विनापरवाना कोणत्याही आडते/ व्यापारी व इतर परवानाधारकांनी व्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ६ च्या उल्लंघनाबद्दल कलम ४६ प्रमाणे त्याच्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची सबंधितांनी नोंद घ्यावी

**अनुज्ञप्ती / परवाना नूतनीकरण करतेवेळी खालील बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.**

१) बँक किंवा त्रयस्थ इसमाचे हमीपत्र सदरचे हमीपत्र जामिनकीत बदल झाले नसल्यास मूळ हमीपत्र अर्जासोबत स्वयंम स्वाक्षरीनिशी सादर करावेत.
२) मूळ अनुज्ञप्ती / परवाना प्रत सोबत असणे आवश्यक आहे.
३) ज्या कोणाकडे बाजार फी व देखरेख खर्चाची बाकी असेल ती अनुज्ञप्ती नुतनीकरणाच्यापूर्वी बाजार समितीकडे भरणा करणे आवश्यक आहे.
४) ज्या आडते / व्यापाऱ्यांनी बाजार फी व सुपरव्हिजन कॉस्टचा चेक दिला असेल तो बँकेमार्फत वटल्यानंतरच अनुज्ञप्तीचे नूतनीकरण करण्यात येईल.
५) ज्याच्याकडे प्लॉट भाडे / दुकान भाडेची येणे बाकी असेल ती अनुज्ञप्ती नुतनीकरणापूर्वी भरणा करणे बंधनकारक आहे.
६) अर्जदाराने आपले २०२५-२०२६ या वर्षातील केलेल्या व्यवहाराचे वार्षिक उलाढालीचे प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. त्याशिवाय अनुज्ञप्ती नुतनीकरण केले जाणार नाही. ज्या आडत / व्यापारी / प्रक्रियाची अनुज्ञप्ती सन २०२५-२०२६ साठी नवीन अनुज्ञप्ती घेतली आहे, पण त्या फर्मवर दिनांक १/४/२०२५ ते ३१/३/२०२६ पर्यंत कोणत्याही प्रकारचा शेतीमाल खरेदी-विक्री व्यवहार केला नाही त्या आडत / व्यापारी / प्रक्रिया अनुज्ञप्तीधारकांचे सन २०२६-२०२७ या वर्षासाठी या कार्यालयाकडून नुतनीकरण करण्यात येणार नाही याची संबधीतांनी नोंद घ्यावी.
७) बाजार समितीचे व्यापाऱ्यांना लिजवर दिलेल्या प्लॉटची लीज मुदत संपली आहे अशा प्लॉटधारक आडते / व्यापाऱ्यांची अनुज्ञप्ती नुतनीकरण केले जाणार नाही.
८) सर्व प्रकारच्या अनुज्ञप्तीधारकांनी परवाना नूतनीकरण करतेवेळी मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था सोलापूर यांचेकडील दिनांक ९/१/२०१८ रोजीच्या कलम ४० (ई) च्या निर्देशान्वये ई-नाम योजने अंतर्गत ई ऑक्शन मध्ये सहभागी होत असलेबाबतचे हमीपत्र देणे बंधनकारक आहे. हमीपत्राशिवाय परवाना नुतनीकरण केले जाणार नाही.

वरीलप्रमाणे सर्व बाबीची पूर्तता करुन अनुज्ञप्ती / परवाना नुतनीकरणाचा अर्ज श्री. सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती सोलापूरच्या मुख्य कार्यालय येथे कार्यालयीन वेळेमध्ये मुदतीत सादर करावेत याची सर्व आडते, व्यापारी, दलाल, प्रक्रिया, वखारवाला, हमाल, तोलार व मापारी यांनी वेळेत नोंद घ्यावी.

**सही/-** **सचिव** | **सही/-** **सभापती**

**श्री. सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समित्ती सोलापूर**

# भारतीय शिक्षणपध्दती अनुभवाधारित : डॉ. साठे

## सोलापूर विद्यापीठात लाभसेटवार व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जानेवारी-**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच रोजगाराभिमुख कौशल्ये व प्रात्यक्षिक ज्ञान प्राप्त होणार आहे. भारतीय शिक्षणपध्दती ही अनुभवाधारित आहे.

याद्वारे समाजोपयोगी संशोधनावर अधिक भर देण्याची गरज आहे. डिजिटल युगात ऑनलाइन संशोधन उपयुक्त असले तरी त्यावर अति अवलंबून राहणे टाळावे, असे प्रतिपादन पुणे येथील बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयचे प्राध्यापक डॉ.



प्रशांत साठे यांनी केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात डॉ.अनंत व डॉ.लता चारिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित लाभसेटवार व्याख्यानमालेत 'शैक्षणिक धोरण आणि महाराष्ट्रातील सद्यस्थिती' या विषयावर बोलताना ते पुढे म्हणाले, भारतीय शिक्षणपध्दती ही बालवयापासून विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, संस्कृती आणि ज्ञानाची बीजे रोवणारी आहे. कुटुंबवत्सल्यावर आधारित ही शिक्षणप्रणाली अनुभवातून शिकवण देणारी असून तिचा जगभर डंका आहे. डॉ.गौतम कांबळे अध्यक्षस्थानावरुन बोलताना म्हणाले, केंद्र सरकारने आणलेल्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी महाराष्ट्रासह अनेक राज्यांनी स्वीकारली आहे. मात्र काही राज्यांमध्ये अद्याप या धोरणाबाबत पुरेशी माहिती नाही. एकसंध भारतासाठी संपूर्ण देशात नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होणे अत्यावश्यक आहे. यावेळी ट्रस्टचे संस्थापक डॉ.अनंत लाभसेटवार व डॉ.लता लाभसेटवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी प्रा.देवानंद चिलवंत, डॉ.अनिल घनवट, डॉ.विकास कडू, दत्ता पुकाळे, ओम इंगळे आदी उपस्थित होते. डॉ.प्रभाकर कोळेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ.तेजस्विनी कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ.ज्ञानेश्वरी हजारे यांनी आभार मानले.



# लोकशिक्षण, जनजागृतीसंदर्भात पत्रकारिता अत्यंत सामर्थ्यशाली माध्यम : प्रशांत माने

### दैनिक सोलापर 'तरुण भारत'च्या वतीने पत्रकार, पत्रकारितेतर कर्मचाऱ्यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जानेवारी-**

लोकशिक्षण आणि जनजागृतीसंदर्भात पत्रकारिता अत्यंत सामर्थ्यशाली माध्यम मानले जाते. समाजातील प्रश्न निर्भीडपणे मांडत जबाबदार पत्रकारिता करणे ही काळाची गरज आहे. पत्रकारांनी समाजातील लोकभावना ओळखून त्या प्रभावीपणे मांडाव्यात, असे प्रतिपादन दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने यांनी केले.

पत्रकार दिनानिमित्त दैनिक सोलापूर 'तरुण भारत'च्या वतीने पत्रकार, पत्रकारितेतर कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. मुख्य संपादक प्रशांत माने आणि व्यवस्थापक विनायक पुला यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी वृत्तसंपादक अजितकुमार संगवे, वरिष्ठ उपसंपादक अविनाश गायकवाड, वरिष्ठ उपसंपादक श्रीनिवास गाजूल, शाम जोशी, आरती कुसेकर, उपसंपादक किरण बनसोडे, यशवंत गुरव, मकरंद ढोबळे, डीटीपी ऑपरेटर अभिषेक उघडे, आनंद उपरे, जावेदबाशा जमादार आदींचा गौरव करण्यात आला. बदलत्या काळात पत्रकारांवर मोठी जबाबदारी आहे. समाजहिताचे प्रश्न प्राधान्याने मांडून लोकशाही बळकट करण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून घडले पाहिजे. सत्य, निर्भीडता आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांशी प्रामाणिक राहून पत्रकारांनी कार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.



## श्री सिध्दारुढ महास्वामीजींचा उद्या पालखी महोत्सव

**सोलापूर, दि.२३ जानेवारी-**

आकाशवाणी केंद्र रोड परिसरातील रवींद्र नगर, गवळी वस्ती येथील श्री सिध्दारुढ सेवाभावी संघटनेच्या वतीने रविवार, २५ जानेवारी रोजी श्री सिध्दारुढ महास्वामीजींचा १४ वा पालखी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रारंभी महारुद्राभिषेक, महापूजा, महाआरती असे विविध कार्यक्रम होणार आहेत, असे सिध्दारुढ सेवाभावी संघटनेचे अध्यक्ष श्रीशैल होळीकट्टी, उपाध्यक्ष अशोक गोब्बुर यांनी सांगितले. मृत्युंजय महास्वामीजी, डॉ.अभिनव रामलिंग महास्वामीजी यांच्या आशीर्वादाने विविध धार्मिक कार्यक्रमही पार पाडण्यात येत आहे. श्रीक्षेत्र हुबळी येथील श्री सिध्दारुढ महास्वामीजी यांच्या तत्वज्ञानावर आधारित ष.ब्र.अभिनव रेवणसिध्द पट्टदेवरु हे प्रवचन देत आहेत. रविवारी होणाऱ्या पालखी महोत्सवास भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

## बार्शी जि.प.गटातील चार, पं.स.मधून सात जणांची माघार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि जानेवारी-**

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी गुरुवारी छाननीनंतर अर्ज माघार घेण्याच्या पहिल्याच दिवशी ११ जणांनी उमेदवारी मागे घेतली. यामध्ये जिल्हा परिषद गटातील चार तर पंचायत समिती गणातील ७ जणांचा समावेश आहे.

रजनी जयसिंग पाटील (पांगरी गट), श्रीगणेश सरदार गव्हाणे (पानगाव गट), मंदाकिनी सुरेश कापसे आणि अश्विनी सुरेश कापसे शेळगाव (आर) गट या चार उमेदवारांनी जि.प.गटातून आपली उमेदवारी मागे घेतली आहे. नागनाथ महादेव आगलावे (बावी गण), प्रदीप पांडुरंग मोरे, विकास महादेव माने (पानगाव गण), अमरसिंग सुभाष लोखंडे, उर्मिला अमोल माने आणि कविता अविनाश मोहिते (मानेगाव गण), करुणा भिकाजी साबळे (शेळगाव आर, गण) या उमेदवारांनी पंचायत समिती गणातून माघार घेतली. तालुक्यातील जि.प.च्या ६ गटासाठी ५६ उमेदवार तर पंचायत समितीच्या १२ गणासाठी १०२ उमेदवार रिंगणात राहिले आहेत. सोमवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशीच सर्व चित्र स्पष्ट होणार आहे.

## सीडीएसएल आयपीएफतर्फे गुंतवणूकदार जागरुकता कार्यक्रम

**सोलापूर, दि. २२ जानेवारी-**

देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, हिराचंद नेमचंद वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थी आणि प्राध्यापकांसाठी सीडीएसएल इन्व्हेस्टर प्रोटेक्शन फंडने (सीडीएसएल आयपीएफ) गुंतवणूकदार जागरुकता कार्यक्रमांचे आयोजन केले. सिक्युरिटीज मार्केटची परिसंस्था आणि डिपॉझिटरी सेवा, सिक्युरिटीज मार्केटची मूलभूत तत्त्वे आणि डिपॉझिटरीजच्या भूमिकेवर या सत्रांमध्ये मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाचा उद्देश सिक्युरिटीज मार्केट कसे कार्य करते, याचे मूलभूत ज्ञान देणे, सिक्युरिटीज बाजारातील कार्यप्रणाली स्पष्ट करणे आणि डिपॉझिटरी सेवा सुरक्षित, पारदर्शक आणि कार्यक्षम गुंतवणूक प्रक्रिया कशा सक्षम करतात हे दाखवणे हा होता.

## शिवसेना 'उबाठा'कडून बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन

**सोलापूर, दि.२३ जानेवारी-**

शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने शिवसेना प्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात त्यांच्या प्रतिमेचे पूजन पुष्पहार घालून करण्यात आले.

शिवसेना मध्यवर्ती कार्यालय येथे सदरचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. जिल्हा प्रमुख अजय दासरी, उपजिल्हा प्रमुख दत्तात्रय गणेशकर, काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. यावेळी वंदनिय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे अमर रहे..



बाळासाहेब परत या परत या, जय भवानी जय शिवराय असे घोषणा देत परिसर दणाणून गेला होता.

यावेळी माजी महापौर अलका राठोड, शहर प्रमुख नाना मोरे, जगदीश कलकेरी, सुरेश शिंदे, मुलाणि, विभागाचे प्रमुख पिरजादे, दत्ता रूचनभैरे अदि शिवसेना पदाधिकारी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# गडीनाडू कन्नड साहित्य, संस्कृती उत्सव उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जानेवारी-**

कर्नाटक गडी प्रदेश अभिवृद्धी प्राधिकरण, बेंगळुरू यांच्या संयुक्त विद्यमाने आणि श्री किरटेश्वर संस्थान मठ, सोलापूर यांच्या सहकार्याने गडीनाडू कन्नड साहित्य-संस्कृती उत्सव २०२६' हा कार्यक्रम सोलापुरातील भवानी पेठ येथील श्री किरटेश्वर संस्थान मठ येथे उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात कोंतम चौक येथील महात्मा बसवेश्वर महाराजांच्या पुतळ्याला पूजन करून करण्यात आली. यानंतर भुवनेश्वरी माता व कार्यक्रमाचे सर्वाध्यक्ष श्री शरण श्रीधर मुराळे, श्री.म.नि.प्र. स्वामीनाथ महास्वामीजी यांच्या उपस्थितीत रथयात्रा व पदयात्रा काढण्यात आली. कोंतम चौक ते कुंभार वेस येथील किरटेश्वर मठपर्यंत पदयात्रा काढण्यात आली. मोरेश्वर कन्नड हायस्कूल, एस.व्ही.सी.एस. हायस्कूल आणि श्री सिद्धेश्वर हायस्कूलच्या यांच्या विद्यार्थ्यांनीही नृत्य सादरीकरण केले. बसवराज अगदी, डॉ.संध्या जोशी यांनी गायन सादर केले. मीनाक्षी बागलकोटी ग्रुप यांनी 'सत्य केसावीला सुळेगे सुकविला सुकविला' हे नाटक सादर केले.



रेणुका बागलकोटी व राजेश्वरी लोकापुरे यांनी वचन सादरीकरणासह गायन सादर केले. मल्लिकार्जुन पाटील, तेजश्री शशिकांत तळे, काशिनाथ आकशे यांना पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले.

यावेळी कन्नड भाषिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ.मृत्युंजय रुमाले लिखित 'मृत्युंजय मृत्युंजय महास्वामी गळू' आणि डॉ.गीता डिग्गी यांच्या 'मते हाडीतू कोगीले' या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे उपकुलगुरु डॉ.लक्ष्मीकांत दामा, शरण श्रीधर मुराळे, रविकुमार सोलापुरे, मल्लिकार्जुन पाटील, रेणुका बागलकोटी, सिंधुताई काडादी आदी उपस्थित होते.

# हवामानाचा अनपेक्षित खेळ नेमका थांबणार कधी?

### व्हायरल आजारांनी नागरिक त्रस्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

सोलापूरसह राज्यात हवामानात सातत्याने बदल होताना दिसून येत आहे. कधी पावसाचा तर कधी थंडीचा अनुभव येत आहे. व्हायरल आजारांनी नागरिक त्रस्त झाले असून हवामानाचा हा अनपेक्षित खेळ नेमका कधी थांबणार? असा सवाल नागरिकांतून उपस्थित केला जात आहे.

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, जानेवारी महिन्यातही पावसाची शक्यता कायम असून, वातावरण अस्थिर राहणार आहे. नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी, म्हणजे १ जानेवारी रोजी राज्यातील काही भागांमध्ये मुसळधार पावसाने हजेरी लावली होती. त्यानंतरही हवामानात अपेक्षित स्थिरता आलेली नाही.

सोलापूरमध्येही मध्यंतरी आभाळी वातावरण झाल्याने कमी झालेली थंडी पुन्हा हळूहळू वाढू लागल्याने सायंकाळी ७ नंतर नागरिकांना हुडहुडी भरत आहे. यामुळे सोलापुरातील तापमानही काही अंशाने घटते आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते, उत्तरेकडून येणाऱ्या शीतलहरीचे प्रमाण सध्या अत्यंत कमी आहे. याच कारणामुळे राज्यातील तापमानात वाढही होत आहे. काही दिवसांपूर्वी राज्यातील अनेक भागांमध्ये गारठा जाणवत होता, मात्र सध्या तीव्र थंडी जवळपास गायब झाली आहे.


याआधी राज्यातील तापमान ५ ते ६ अंश सेल्सिअसपर्यंत खाली गेले होते. सध्या अनेक ठिकाणी किमान तापमान ११ अंश सेल्सिअसच्या पुढे नोंदवले जात आहे.

मॉन्सून देशातून परतून अनेक महिने झाले असले तरी पावसाने मात्र जाण्याचं नाव घेतलेलं नाही. देशातील अनेक भागांमध्ये अद्यापही पावसाची नोंद होत आहे. महाराष्ट्रातही अवकाळी पावसाची शक्यता कायम असून, भारतीय हवामान विभागाने याबाबत इशारे दिले आहेत. ढगाळ वातावरणा मुळे उकाडा वाढण्याची शक्यता असून, त्यामुळे नागरिकांना दमट हवामानाचा सामना करावा लागत आहे. बदलत्या हवामानामुळे शेती, दैनंदिन जीवन आणि आरोग्यावरही त्याचा परिणाम होत असल्याचं चित्र आहे. सोलापूर शहरातही हवामानात लक्षणीय बदल पाहायला मिळत आहे.

काही दिवसांपूर्वी शहरात कडाक्याची थंडी जाणवत होती. किमान तापमानात घट झाल्यामुळे गारठा वाढला होता. मात्र, गेल्या दोन दिवसांत किमान तापमानात कमी-जास्तपणा दिसून येत आहे. हवामानातील सततच्या बदलांचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे.

कधी थंडी, कधी पाऊस, तर कधी उकाडा अशा परिस्थितीमुळे सर्दी, खोकला, ताप आणि व्हायरल आजारांचे प्रमाण वाढत असल्याचे डाक्टरांकडून सांगितले जात आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारपणातून सावरत असलेल्यांनी अधिक काळजी घेण्याचा सल्ला तज्ज्ञ देत आहेत. अचानक बदलणाऱ्या तापमानामुळे शरीराला जुळवून घेणं कठीण होत असून, रोगप्रतिकारक शक्तीवरही त्याचा परिणाम होत आहे.

जानेवारी महिन्यात साधारणपणे थंडीचा



जोर वाढतो, मात्र यंदा चित्र वेगळं दिसत आहे. हवामानात होणारे बदल पुढील काही दिवस सुरूच राहतील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे राज्यातील नागरिक, शेतकरी आणि प्रशासन सर्वच जण हवामानाच्या पुढील हालचालींकडे लक्ष ठेवून आहेत.

## महत्वाचे...



### एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलचे सामान्य ज्ञान ऑलिम्पियाडमध्ये यश

**सोलापूर, दि.२३ जानेवारी-**

माईर्स एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी ऑलिम्पियाड फाउंडेशन (एसओएफ)आयोजित आंतरराष्ट्रीय सामान्य ज्ञान ऑलिम्पियाड २०२६मध्ये यश संपादन करून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा उमटवला आहे. विविध गटात झालेल्या या सामान्य ज्ञान ऑलिम्पियाडमध्ये विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक पटकावत शाळेचा नावलौकिक वाढविला आहे. स्पर्धेत इयत्ता पहिलीतील अभिनव खाडे, तिसरीतील आदित्य शौर्य, चौथीमधील रेयांश म्हस्के, पाचवीतील श्रीरंग गजा, सहावीतील सृष्टी दिवटे आणि सातवी मधील वेदांत गुंड या विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. मुख्याध्यापिका रेखा पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



### स्वातंत्र्य सैनिक नगर येथील साक्षात्कार मंडळातर्फे गणेश जयंती साजरी

**सोलापूर, दि.२३ जानेवारी-**

स्वातंत्र सैनिक नगर येथील स्वातंत्र सैनिक नगर सांस्कृतिक बहुद्देशीय युवक मित्र मंडळाचे आयोजित साक्षात्कार गणपती मंडळाचे अध्यक्ष नरेंद्र दंतकाळे यांचे हस्ते पूजा संपन्न झाले. अभिलाष स्वामी, आनंद पोटाबत्ती, दीपक तडलगी, श्रीकांत कोरजगावकर यांनी यजमानपद स्वीकारले होते. नूतन नगरसेवक मेघनाथ येमुल, शेखर इगे, कादंबरी मंजेली, पूजा वाडेकर यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन लक्ष्मीकांत दंडी यांनी केले. आभार ॲड.सिध्दाराम कोरे यांनी मानले. यावेळी नरेंद्र दंतकाळे, सुनील रसाळे, स्वप्नील सातपुते, अभिलाष स्वामी, नितीन बळते, दिनेश तडलगी, राजू कट्टा, संकेत दिवटे, दीप मामड्याल, शेखर बिराजदार उपस्थित होते.



### नूमवि शाळेत नेताजी सुभाषचंद्र बोस, बाळासाहेब ठाकरे जयंती साजरी

**सोलापूर, दि.२३ जानेवारी-**

नू.म.वि.मराठी शाळेत नेताजी सुभाषचंद्र बोस व हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापिका स्मिता माळवदकर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. सुवर्णा आळसंदे यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या जीवनकार्याविषयी माहिती सांगितली. सुवर्णा आळसंदे यांनी सूत्रसंचालन केले.



### सोलापूर जनता सहकारी बँक पाच्छा पेठ शाखेचे वर्धापन दिन संपन्न

**सोलापूर, दि.२३ जानेवारी-**

सोलापूर जनता बँकेच्या पाच्छा पेठ शाखेचे ५१ वे वर्धापन दिन साजरा करण्यात आला. या शाखेचे मुदत ठेव ४४ कोटी व कर्ज ४० कोटीपर्यंत आहे, असे यावेळी सांगण्यात आले. याप्रसंगी शाखाधिकारी जयवंत कोकाटे, ज्युनियर ऑफिसर तिपण्णा कुऱ्हाडकर, बुच्छिरामुलु आबत्तीनी, रमेश सुरवसे, लक्ष्मीकांत दंडी, वेंकटेश कुरापाटी, अमरनाथ मासा यांच्यासह खातेदार उपस्थित होते.

### विद्यापीठात आज देशभक्तीपर चित्रपटांचे विशेष प्रदर्शन

**सोलापूर, दि.२३ जानेवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र संकुलाच्या जनसंज्ञापन विभागात एम.ए.मास कम्युनिकेशन, बी.ए. मीडिया ॲन्ड मास कम्युनिकेशन अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी तसेच सामाजिक शास्त्रे संकुल व विद्यापीठ परिसरातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व चित्रपट रसिकांसाठी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून देशभक्तीपर चित्रपटांचे विशेष प्रदर्शन चित्रपट प्रदर्शन २४ जानेवारी रोजी आयोजित केले आहे. यात दोन चित्रपट आणि एक लघुपट सादर करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमामध्ये चित्रपट अभ्यास हा विषय समाविष्ट असल्याने, या चित्रपट प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना चित्रपटाची कथा मांडणी, दिग्दर्शन, छायाचित्रण, संकलन तसेच देशभक्तीपर व सामाजिक आशय याबाबत अभ्यासात्मक माहिती देण्यात येईल. यामुळे विद्यार्थ्यांचा चित्रपटाकडे पाहण्याचा चिकित्सक व अभ्यासपूर्ण दृष्टिकोन विकसित होईल. तरी विद्यार्थ्यांनी या एक दिवसीय देशभक्तीपर चित्रपट रसग्रहण कार्यशाळेस उपस्थित रहावे, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी केले आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# गुरुजींसह मुख्याध्यापकांना घ्यावे लागणार धडे

## टीईटी बंधनकारक; अन्यथा वरिष्ठ अन् निवड वेतनश्रेणी नाहीच

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गांवरील शिक्षकांसाठी 'टीईटी' बंधनकारक असल्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. पण, हा निर्णय शिक्षकांसाठी असून मुख्याध्यापकांसाठी नाही, असा संभ्रम होता.परंतु, मुख्याध्यापकांना देखील 'टीईटी'ची अट लागू असल्याचे माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने (एनसीटीई) शाळांवरील शिक्षकांसाठी पात्रता निश्चित केली आहे. त्यानुसार २०१० पासून 'टीईटी'ची अट घालण्यात आली. परंतु, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ज्या शिक्षकांचे वय ५३ वर्षांपर्यंत आहे, त्यांना देखील दोन वर्षांत 'टीईटी' उत्तीर्ण व्हावी लागणार आहे. मुदतीत पात्रता पूर्ण न केल्यास संबंधितांवर सक्तीच्या सेवानिवृत्तीची कारवाई केली जाणार आहे. दुसरीकडे विस्ताराधिकारी, गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापकांच्या पदोन्नती देखील 'टीईटी' उत्तीर्ण असेल तरच दिली जाणार आहे. शिक्षकांनाही निवड व वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी 'टीईटी' बंधनकारक आहे. यामुळे सद्य:स्थितीत सोलापूर जिल्हा परिषदेच्या सुमारे ३५ ते ४० शाळांची जबाबदारी प्रभारी मुख्याध्यापकांवर सोपविण्यात आली आहे. ज्या शिक्षकांची सेवा १२ वर्षे, २० वर्षांपेक्षा जास्त झाली आहे, त्यांना वेतनश्रेणीसाठी आता 'टीईटी' उत्तीर्ण व्हावी लागणार आहे. आता उन्हाळा सुट्ट्यांमध्ये या शिक्षकांना उतारवयात देखील 'टीईटी'चा अभ्यास करावा लागणार आहे.




### 'बीएड' वर नियुक्ती, तरीही 'टीईटी' आवश्यकच

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पहिली ते आठवीच्या वर्गांवरील नियुक्त शिक्षकांना (निवृत्त होण्यास पाच वर्षे शिल्लक असलेले वगळून) दोन वर्षांत 'टीईटी' उत्तीर्ण व्हावीच लागणार आहे. माध्यमिक शाळांवरील इयत्ता सहावी ते आठवीच्या वर्गांवर नियुक्त शिक्षक बीएडधारक असला, तरीदेखील त्यांच्यासाठी 'टीईटी'चे बंधन आहेच.

### मुख्याध्यापकांसाठीही 'टीईटी' चे बंधन



सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गांवरील नियुक्त शिक्षकांसाठी 'टीईटी' उत्तीर्ण बंधनकारक आहे. सहावी ते आठवीच्या वर्गांवरील नियुक्त शिक्षक डीएड, बीएडधारक असेल, त्यांना देखील न्यायालयाने दिलेल्या दोन वर्षांच्या मुदतीत 'टीईटी' उत्तीर्ण व्हावीच लागणार आहे. त्यानुसार राज्य शासनाने टीईटी उत्तीर्ण असलेले व नसलेले, अशी माहिती मागितली आहे.

**- सचिन जगताप,** माध्यमिक शिक्षणाधिकारी, सोलापूर




## राधाकिसन फोमरा मूकबधिर विद्यालयात चित्रकला स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

रोटरॅक्ट क्लब ऑफ सामर्थ्य सोलापूर यांच्या वतीने दि. २३ जानेवारी २०२६ रोजी रोटरी नॉर्थ राधाकिसन फोमरा मूकबधिर विद्यालयात चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेत शाळेतील ५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रम अध्यक्ष रोट्र. बसवराज कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

रोट्र. निखिल ताटे यांनी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. शाळेच्या मुख्याध्यापिका क्षितिजा गाताडे व सहशिक्षिका रेणुका पसपुले यांचे सहकार्य लाभले. यावेळी प्रमुख अतिथी कलाकार व लेखक ऋत्विज चव्हाण उपस्थित होते.

## डॉ. सुहास पुजारी वाडिया हॉस्पिटलमध्ये रुजू

**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

शहरातील प्रख्यात व अनुभवी वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. सुहास पुजारी हे १९ जानेवारी रोजी एन. एम. वाडिया चॅरिटेबल हॉस्पिटल येथे रुजू झाले असून ते दररोज दुपारी १२ ते २ तसेच सायंकाळी ६ ते ७ या वेळेत ओपीडी विभागात रुग्णांसाठी उपलब्ध असणार आहेत.

डॉ. पुजार हे गेल्या जवळपास चार दशकांपासून वैद्यकीय सेवेत कार्यरत असून, वैशंपायन मेमोरियल मेडिकल कॉलेज येथून त्यांनी सन १९८१ मध्ये एम.बी.बी.एस. तसेच सन १९८४ मध्ये एम.डी. (मेडिसिन) ही पदवी प्राप्त केली आहे. मधुमेह, उच्च रक्तदाब, ताप, संसर्गजन्य आजार तसेच विविध दीर्घकालीन व जटिल व्याधींवरील त्यांच्या यशस्वी उपचारांमुळे ते वैद्यकीय क्षेत्रातील एक नावाजलेले व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात. रुग्णांशी असलेला त्यांचा आपुलकीचा दृष्टिकोन, अचूक निदान क्षमता, नैतिक वैद्यकीय सेवा तसेच अद्ययावत उपचार पद्धतींचा सातत्यपूर्ण अवलंब ही त्यांची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या उपचारांमुळे हजारो रुग्णांना योग्य उपचार व आरोग्य लाभ प्राप्त झाला आहे. वाडिया हॉस्पिटलमधील त्यांच्या सेवेमुळे शहरासह परिसरातील रुग्णांना लाभ होणार आहे.





## गणेश जयंतीनिमित्त दोन हजार भक्तांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

गणेश जयंती निमित्त हुतात्मा तरुण मंडळ शिवराज प्रतिष्ठान यांच्या वतीने शिंदे चौक येथे २००० हजार गणेश भक्तांनी महाप्रसाद लाभ घेतला.

अनावश्यक खर्च टाळून हुतात्मा तरुण मंडळ शिवराज प्रतिष्ठान तर्फे दरवर्षी प्रमाणे ह्या वर्षी देखील सकाळी १० वाजता होम हवन, ११ वाजता पाळणा, दुपारी १२ गुलाल व आरती दुपारी महाप्रसाद दोन हजार गणेश भक्ताना देण्यात आला. यावेळी मंडळाच्या वतीने आलेल्या सर्व दिग्गज मान्यवरांचे स्वागत व सत्कार करण्यात आले.

सन २०२६ ते २०२७ च्या अध्यक्ष पदी ओंकार धावणे, तर कार्याध्यक्ष पदी अक्षय (तात्या) गुंड यांची एक मताने निवड करण्यात आली त्यांचा देखील सत्कार मंडळाच्या वतीने करण्यात आला. यावेळी महिला वर्ग व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बटरफ्लाय स्कूलचे रंगभरण व हस्ताक्षर स्पर्धेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

श्री सिद्धेश्वर शिक्षण मंडळ संचलित बटरफ्लाय इंग्लिश मीडियम स्कूलने जिल्हा शैक्षणिक कला संघटनेतर्फे घेण्यात येणाऱ्या रंगभरण स्पर्धेत यश संपादन केले.

इ. ८ वीतील दिनेश चरण गोरलेवाले यास रंगभरण स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला, इ.५ वीतील स्वरा रावसाहेब भोरी हिस द्वितीय क्रमांक मिळाला तसेच इ ४ थीतील प्रांजली अनिल अलदी, अक्षरा मधुकर सदाफुले, इ. २ रीतील माने मृण्मयी दत्तात्रय यांना तृतीय क्रमांक मिळाला व कस्तुरी दीक्षिता गणेश हिस इंग्रजी हस्ताकर स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळाला. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष ॲड. एस.आर.पाटील, उपाध्यक्ष शरद नागावकर, व्ही.जे. देवणीकर, खजिनदार शंकर पाटील, सचिव डॉ. शशिकांत हलकुडे, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका डॉ. रश्मी कुंभार, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका रश्मी पुर्वत यांनी अभिनंदन केले. यशस्वी विद्यार्थ्यांना कला शिक्षिका आरती खेडकर यांनी मार्गदर्शन केले.

## गड्डा यात्रेत महिलेचा गंडा; ४२ हजारांचा मुद्देमाल चोरीला

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

होम मैदान येथे गड्डा यात्रेत खरेदीसाठी गेलेल्या महिलेच्या पर्स मधील रोख रक्कम आणि चांदीचे ब्रेसलेट असे एकूण ४२ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला. ही घटना २१ जानेवारी रोजी पंचकट्टा ते होम मैदान विक्री स्टॉल वर घडली.

याबाबत शैला राहुल जानराव वय ५५, राहणार मुकुंद नगर भवानी पेठ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरावर गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी या खरेदीसाठी गड्ड्यावर गेल्या होत्या. गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोराने पर्स मधून साडे नऊ ग्रॅम चांदीचे ब्रेसलेटआणि रोख रक्कम चोरीला गेली.

ही बाब लक्षात आल्यानंतर त्यांनी याबाबत फौजदार चावडी पोलीस स्टेशन ठाण्यातफिर्याद दिली. फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल झाला आहे पुढील तपास हवालदार बाबर करत आहेत.

## अहो..आम्ही खरंच...प्रत्यक्षात युद्ध नौका आणि पाणबुडी पाहिली

### ● उमराणी व खोजनवाडीच्या विद्यार्थ्यांचा थरारक अनुभव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

असे म्हणतात ना.. की जे न पाहे रवि ते पाहे कवी... अगदी असेच घडले.. पण त्या कवीच्या ऐवजी प्रत्यक्षात होते ते सांगली जिल्ह्यातील उमराणी व खोजनवाडी सारख्या ग्रामीण भागातील आमचे शालेय विद्यार्थी. या शालेय विद्यार्थ्यांना जे सर्व सामान्य जनतेला सहजासहजी पाहता येत नाही ते सहजतेने पाहण्याचे भाग्य लाभले.

आम्हीही मोठे होऊन अशाच प्रकारच्या क्षेत्रात म्हणजे देश सेवेच्या क्षेत्रात काम करू असा विचार त्यांच्या बालमनात नक्कीच आला. कारण सांगली जिल्हा हा वीरांचा देशभक्तांचा जिल्हा म्हणूनही ओळखला जातो. त्यामुळे हा विचार प्रत्यक्षात आणणे या मुला-मुलींना कठीण नाही. असो. अलिबाग येथील गाज फाऊंडेशन यांच्या सहकार्याने या शालेय विद्यार्थ्यांना ही प्रत्यक्ष युद्ध लोकांनी पाणबुडी पाहण्याची अभूतपूर्वक संधी लाभली. अगदी काही दिवसांपूर्वी म्हणजे ११ जानेवारीला उमराणी हायस्कूल उमराणी आणि खोजनवाडी कन्नड माध्यमिक विद्यालय खोजनवाडी येथील ४० मुला-मुलींना गाज फाऊंडेशनने भारतीय नौसेना तळ आयएनएस आंग्रे या पश्चिमी नौसेना कमान मुख्यालयात भेट देऊन हे पाहण्याची संधी दिली. विद्यार्थ्यांनी याची देही याची डोळा अजस्त्र अशी ही आपली भारतीय युद्ध सामग्री पाहिली. यावेळी विद्यार्थ्यांना भारतीय नौसेनेतील अधिकाऱ्यांशी संवाद साधला. भारतीय नौसेनेत कार्यरत INS सुभद्रा ही युद्ध नौका तसेच INS शिशूमार ही पाणबुडी पाहण्याची संधी झाली. टारपिडो तसेच पाणबुडीची संचालन प्रणाली तेथील अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितली.



## ज्ञानामृत आनंदलहरी १३३६

**कां उदितें रश्मिराजे । लोपिलीं चंद्रादि तेजें ।**
**नाना प्रळयांबुमाजे । नदी नद ।।**

पाण्यात राहून पाण्यापेक्षा वेगळे राहायचे अर्थात संसारात राहून संसारापेक्षा वेगळे राहायचे म्हणजे अत्यंत अवघड कार्य आहे. पण हे अवघड कार्य अनेक साधकांना प्रयत्नाअंती साध्य झाल्याचे आपण पाहतो. संसाराच्या मायाजाळात अडकलेल्या जीवाला त्याच्या सहवासात येणारी व त्याला आवडणारी प्रत्येक गोष्ट, व्यक्ती त्याला त्याची वाटू लागते म्हणूनच तो त्या वस्तूशी, व्यक्तीशी आपले नाते जोडून मी, माझे, माझी म्हणू लागतो. मी, माझे, माझी म्हणण्यामुळे आपण संसाराच्या मायाजाळात जास्त गुंतत चाललो आहोत, हे त्याच्या लक्षात येत नाही. वरुन दलदल दिसत नसली तरी एकदा का पाऊल त्या दलदलीत पडला की मग वर येणे कठीण असते. कारण पडलेला पाय बाहेर काढण्यासाठी दुसऱ्या पायावर कळत न कळत भार पडतो आणि तो पाय जास्त रुतला जाऊ लागतो. या दोन्ही पायांना बाहेर काढण्यासाठी कोणीतरी बाहेरून आधार द्यावा लागतो. संसाराच्या मायाजाळातून बाहेर काढण्यासाठी सद्गुरु लाभावा लागतो. सद्गुरु जर लाभला तर संसारात राहूनही आपण संसारापेक्षा वेगळे राहू शकतो.वरकरणी लोकांना आपण संसारात अडकलेले दिसत असलो तरी प्रत्यक्षात आपण अलिप्त असतो. स्फटिकाचा दगड कोणत्याही रंगात मिसळत नसतो. जो रंग त्याच्या सहवासात आला त्या रंगाप्रमाणे तेवढ्यापुरता तो दिसतो. तो रंग बाजुला सारताच तो पूर्ववत दिसतो. अर्थात पिवळ्या, लाल, हिरव्या रंगाच्या सहवासाने तो त्या रंगाप्रमाणे दिसतो. प्रत्यक्षात त्याला कोणत्याही रंगाशी कांही देणे घेणे नसते. चकाकीच्या बाबतीत तो आतून बाहेरून पारदर्शकच असतो. त्याप्रमाणे आत्मज्ञान झालेला व्यक्ती संसारात अडकल्यासारखे आपणाला दिसत असला तरी तो त्याच्या आत्मज्ञानाच्या आनंदात स्थिर असतो. हे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात, स्फटीकाची शिळा उपाधि न मिळे। भाव दावी पिवळे लाल संगे ।।



ज्ञानेश्वर महाराज

संसारात अडकलेला जीव दगडाप्रमाणे निगरगट्ठ झाला आहे. त्याला कोणत्याही परिस्थितीत मी, माझे, माझी आदि यांना सोडावेच वाटत नाही. त्याने यांना सोडायचे ठरवले तर त्याला हे सोडत नाहीत. या जीवाला दगडाप्रमाणे न राहता स्फटिकाच्या दगडाप्रमाणे व्हायचे असेल तर या जीवाने साधु, संतांचा सहवास मिळविला पाहिजे. स्फटिकाचा दगड आतून बाहेरून पारदर्शक असतो. त्याची पारदर्शकता, त्याचा चकाकीपणा कोणत्याही रंगाच्या सहवासाने बदलत नाही. त्याप्रमाणे आपले वर्तन आतून बाहेरून पारदर्शक व्हायचे असेल, आपली पारदर्शकता स्थिरता संसारातील मायाजाळाच्या सहवासाने बदलू द्यायची नसेल तर आपणाला सद्गुरु शोधावाच लागेल. शोधूनही सद्गुरु लाभलाच नाही तर संत श्री ज्ञानोबा-तुकोबारायांची ग्रंथ संपदा आहेच.

जय जय राम कृष्ण हरी।

.- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : शनिवार,
दि. २४ जानेवारी २०२६
विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - माघ शु. चतुर्थी
ऋतु - हेमंत ।
नक्षत्र- उप.भाद्रपदा (१४.१५)
योग - शिव (१४.०१)
करण - कौलव (१३.१५)
राहू काल : गुरुवार
दु. १.३० ते ३.००

दिनविशेष : १९५०: भारताच्या संविधानावर स्वाक्षरी झाली
१९६६: इंदिरा गांधी यांनी भारताच्या तिसऱ्या पंतप्रधान म्हणून शपथ घेतली.
१९६६: एअर इंडियाचे कांचनजंगा विमान युरोपमधील आल्प्समधील माँट ब्लँक येथे कोसळले. या अपघातात अणुविज्ञानाचे शिल्पकार डॉ. भाभा यांचे निधन झाले.
१९७६: ब्रिटीश तेल कंपनी बर्मा शेलचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले आणि त्याचे नाव भारत रिफायनरीज ठेवण्यात आले. नंतर, १ ऑगस्ट १९७७ रोजी, कंपनीचे नाव भारत पेट्रोलियम असे ठेवण्यात आले.



## जिजामाता प्राथमिक शाळेत हळदी-कुंकू कार्यक्रम व बक्षीस वितरण समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

जिजामाता प्राथमिक शाळा व जिजामाता बालक मंदिर तुळशीदासनगर कोंडी यांच्या संयुक्त विद्यमाने मकर संक्रांत निमित्त हळदी कुंकू कार्यक्रम,वाण वाटप, विविध स्पर्धा बक्षीस वितरण समारंभ संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बालक मंदिरच्या प्रमुख सुरेखा नान्नजकर होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामपंचायत सदस्या सुप्रिया भोसले, मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलूसर, माता-पालक संघाच्या पवारताई, प्रशालेच्या वनगे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते महिलांना वाण वाटप करण्यात आले व सुप्रिया भोसले व मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलूसर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ, सचिवा शिल्पा ठोकळ, संचालक व प्राचार्य दत्तात्रय गाजरे यांनी कौतुक केले. कार्यक्रमानंतर सर्वांना स्नेहभोजन देण्यात आले.

शहाजी भोसले यांचे सहकार्य लाभले. प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व संस्थापिका माजी आमदार कै. निर्मलाताई ठोकळ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक व मान्यवरांचे स्वागत मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलूसर यांनी केले.

## भारतीय कुस्तीचा मानबिंदू खाशाबा जाधव

**महाराष्ट्राचा क्रीडा वारसा**

महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्रात १५ जानेवारी हा दिवस सुवर्ण अक्षरांनी लिहिला गेला आहे. भारतीय कुस्तीला जागतिक पटलावर नवी ओळख मिळवून देणारे पॉकेट डायनामो अर्थात खाशाबा दादासाहेब जाधव यांचा हा जन्मदिन. महाराष्ट्र शासनाने हा दिवस राज्य क्रीडा दिन म्हणून घोषित करून त्यांच्या कर्तृत्वाचा यथोचित गौरव केला आहे.

स्वतंत्र भारताचे पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक पदक विजेते खाशाबा. त्यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील गोळेश्वर या छोट्याशा गावातील एका कुस्तीगीर कुटुंबात झाला. त्यांचे वडील दादासाहेब स्वतः एक उत्तम पैलवान होते आणि त्यांनीच खाशाबांना कुस्तीचे पहिले धडे दिले. त्यांचे प्राथमिक शिक्षण कराडमध्ये झाले, जिथे त्यांनी कुस्तीसोबतच अभ्यासातही गती राखली होती. घरातूनच कुस्तीचा वारसा लाभलेल्या खाशाबांनी प्रतिकूल परिस्थितीत आपले शिक्षण आणि सराव सुरू ठेवला.

१९४८च्या लंडन ऑलिम्पिकमध्ये त्यांनी सहाव्या क्रमांकापर्यंत मजल मारली होती. वैयक्तिक क्रीडा प्रकारात पहिल्या १०मध्ये स्थान मिळवणारे ते पहिले भारतीय ठरले होते. त्या वेळी त्यांना मॅटवर कुस्ती खेळण्याचा कोणताही अनुभव नव्हता, तरीही त्यांनी आंतरराष्ट्रीय मल्लांना कडवी झुंज दिली. त्या काळी भारतात क्रिकेटचे वलय नसताना आणि खेळाडूंना सुविधांची वानवा असताना, एका सामान्य शेतकऱ्याच्या मुलाने हेलसिंकी ऑलिम्पिकपर्यंत मजल मारणे ही केवळ जिद्द नव्हती, तर एक चमत्कार होता. १९५२च्या हेलसिंकी ऑलिम्पिकसाठी जाण्यासाठी त्यांच्याकडे पुरेसे पैसे नव्हते. अशा वेळी कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयाचे प्राचार्य बॅरिस्टर खर्डेकर यांनी स्वतःचे घर गहाण ठेवून त्यांना आर्थिक मदत केली होती. त्यांनी लोकांकडून वर्गणी गोळा केली आणि स्वतःच्या जिद्दीवर हेलसिंकी गाठले.




मॅटवरील कुस्तीचा सराव नसतानाही त्यांनी आपल्या चपळाईने जगातील दिग्गज मल्लांना धूळ चारली आणि स्वतंत्र भारतासाठी पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक पदक (कांस्य) जिंकले. त्यांच्या या विजयाने भारताला क्रीडा नकाशावर मानाचे स्थान मिळवून दिले. हेलसिंकीमध्ये त्यांनी लागोपाठ पाच सामने जिंकले. नियमानुसार दोन कुस्त्यांमध्ये किमान ३० मिनिटांची विश्रांती मिळणे आवश्यक होते, परंतु खाशाबांना केवळ १० मिनिटांत दुसऱ्या कुस्तीसाठी मैदानात उतरवण्यात आले. थकलेले असूनही त्यांनी हार मानली नाही आणि भारतासाठी कांस्य पदक जिंकून इतिहास घडवला. १९५५ मध्ये ते पोलीस दलात उपनिरीक्षक म्हणून भरती झाले. त्यांनी पोलीस खात्यात अनेक वर्ष सेवा दिली आणि तिथल्या क्रीडा विभागालाही बळकटी दिली. महाराष्ट्राच्या या महान सुपुत्राचा प्रवास आजही प्रत्येक खेळाडूसाठी शून्यातून विश्व निर्माण करण्याची प्रेरणा देतो. त्यांची उंची सव्वा पाच फूट असूनही, त्यांच्याकडे कमालीचा वेग आणि चपळता होती. त्यांच्या या चपळ हालचाली आणि समोरच्या मल्लावर तुटून पडण्याच्या वृत्तीमुळे त्यांना पॉकेट डायनामो हे टोपणनाव मिळाले.

**उदयोन्मुख मल्लांसाठी प्रेरणा: काय शिकावे?**

आजच्या आधुनिक युगात, जिथे खेळाडूंना सर्व सोयी-सुविधा उपलब्ध आहेत, तिथे खाशाबा जाधवांचा संघर्ष प्रत्येक पैलवानासाठी दिशादर्शक आहे.

**जिद्द आणि आत्मविश्वास:** ''माझ्याकडे मॅट नाही किंवा सोयी नाहीत'' ही तक्रार न करता जे आहे त्यात सर्वोत्तम कामगिरी करण्याची वृत्ती त्यांनी जोपासली.

**शिस्त आणि सातत्य:** कुस्ती हा केवळ ताकदीचा खेळ नाही, तर तो बुद्धीचा आणि शिस्तीचा खेळ आहे, हे त्यांनी आपल्या हनुमान उडी आणि चपळ हालचालींतून सिद्ध केले.

**देशाभिमान:** कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजच्या प्राचार्यांनी आपले घर गहाण ठेवून खाशाबांना ऑलिम्पिकसाठी पाठवले होते. तो विश्वास त्यांनी सार्थ ठरवला.



**स्ट्रेट ड्राईव्ह**
**अजितकुमार संगवे**
मो.9881133103

**महाराष्ट्राचा क्रीडा वारसा पुढे नेऊया!**

आज महाराष्ट्र कुस्तीत अग्रेसर आहे. महाराष्ट्र केसरीपासून ते आंतरराष्ट्रीय पदकांपर्यंत मुला-मुलींनी मजल मारली आहे. मात्र, ऑलिम्पिकमध्ये सुवर्ण पदकाचे स्वप्न अजूनही अधुरे आहे. खाशाबा जाधवांना खरी श्रद्धांजली म्हणजे त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून जागतिक स्तरावर तिरंगा फडकवणे. ''यश हे केवळ संधीवर अवलंबून नसते, तर ते तुमच्या तयारीवर अवलंबून असते.''हाच संदेश खाशाबा जाधवांचे जीवन आपल्याला देते.

चला, या राज्य क्रीडा दिननिमित्त संकल्प करूया व्यायामाची कास धरूया, मैदानी खेळांना प्रोत्साहन देऊया आणि महाराष्ट्राची ही कुस्ती परंपरा जगाच्या शिखरावर नेऊन ठेवूया!

**विनम्र अभिवादन, खाशाबा जाधव!**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### ग्लोबल व्हिलेजच्यावतीने बक्षी हिप्परगा येथे आरोग्य शिबीर

**बोरामणी, दि. २३ जानेवारी-**

राष्ट्रीय सेवा योजना विभाग, ग्लोबल व्हिलेज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बोरामणी व अश्विनी रुरल हॉस्पिटल अँड मेडिकल कॉलेज, कुंभारी यांच्या वतीने मौजे बक्षी हिप्परगा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सर्व रोग निदान आरोग्य शिबिर संपन्न झाले. अश्विनी रुरल हॉस्पिटल अँड मेडिकल कॉलेज, कुंभारीचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सिद्धेश्वर करजखेडे यांच्या हस्ते या शिबिराचे उदघाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. वाय. डी. पुजारी होते. या आरोग्य निदान शिबिरात डॉ. आनंदराव आगलावे, डॉ. पूर्वा घोवारीकर, डॉ. अमेय साखरकारकर, डॉ. सरफराज खान, डॉ. आदर्श शिरा, डॉ. मिलिंद सानेर यांनी रुग्णांची तपासणी करून मार्गदर्शन केले. शिबिरात २६५ नागरिकांची तपासणी करण्यात आली. आरोग्य शिबिरात तज्ञ डॉक्टरांना पी.आर.ओ. साधना साळवे, रूपाली स्वामी, ज्योती जोगुरे व फार्मासिस्ट नल्ला बिलाल यांनी सहकार्य केले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रा. सोमनाथ स्वामी, कार्यक्रमाधिकारी प्रा. प्रदीप राठोड, प्रा. पंढरीनाथ हरिदास, जुबेर चौकी यांनी परिश्रम घेतले.




### अबॅकस व वेदिक मॅथ्स स्पर्धेत आप्पाज क्लासेसचे यश

**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

पुणे येथे श्रद्धा इन्स्टिट्यूटच्या वतीने आयोजित झालेल्या नॅशनल लेव्हल अबॅकस व वेदिक मॅथ स्पर्धेत दुधनी येथील आप्पाजी अबॅकस क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. स्पर्धेसाठी प्राध्यापिका गीता मठपती यांनी विद्यार्थ्यांना पुणे येथे नेऊन मार्गदर्शन केले. स्पर्धेत दक्ष जानकर, रुद्रा जानकर, संचित मानकर, नंदिनी दंडवते, विनायक धोड्डामनी, सिंचना मुडुलकर, सरस्वती कलाल, धानेश्वरी स्वामी, शिवलिंग मठपती व आदिल नदाफ या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत यश मिळवले. या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत देशातील विविध राज्यांतून सुमारे ७०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यामधून आदिल नदाफ याने उत्कृष्ट कामगिरी करत चॅम्पियन ऑफ चॅम्पियन हा किताब पटकावला. त्याबद्दल त्याला सायकल व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या प्रा. गीता मठपती यांचे पालक, ग्रामस्थांनी अभिनंदन केले.



### टेंभुर्णीत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन

**टेंभुर्णी, दि. २३ जानेवारी-**

टेंभुर्णी शहर शिवसेनेच्या वतीने हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त कुर्डूवाडी चौक, टेंभुर्णी येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. हा कार्यक्रम शिवसेना तालुकाप्रमुख मधुकर देशमुख यांच्या हस्ते पार पडला. कार्यक्रमास टेंभुर्णी येथील पार्टीचे गटनेते व माजी सरपंच प्रमोद कुटे, उपतालुका प्रमुख श्री. सुरेश लोंढे, राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष औदुंबर महाडिक देशमुख, युवा नेते यशपाल लोंढे, सिकंदर आतार, शहर प्रमुख सोपान ढगे, विष्णू बिचकुले, शहर उपप्रमुख प्रशांत सोनवणे, दादा कोळपे, चंद्रकांत कोठावळे, आबा रेडे, अनिल जगताप, गणेश पोळ, ॲड. तुकाराम राऊत, समीर नाईकनवरे, सुरज जाधव, आशिष लोंढे, विकी जगताप उपस्थित होते.

### माघ यात्रा; पंढरपूर शहर व वाखरीत मांस, मटण विक्रीस मनाई

**पंढरपूर, दि. २३ जानेवारी-**

माघ शुध्द एकादशी २९ जानेवारी २०२६ रोजी असून, माघ यात्रा कालावधी दि. २३ जानेवारी ते १ फेब्रुवारी आहे. या यात्रा कालावधीत शहरात श्री विठ्ठल- रुक्मिणी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. दिनांक २८ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत पंढरपूर शहरात तसेच वाखरी परिसरात दिनांक २७ ते ३२ जानेवारी २०२६ या कालावधीत मांस, मटण, मासे विक्री व प्राणी कत्तल तसेच मांसजन्य पदार्थ विक्री करणे यावर बंदी घालण्यात आल्याचे आदेश उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी निर्गमित केले आहेत. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून उपविभागीय दंडाधिकारी श्री.इथापे यांनी पंढरपूर शहरातील तसेच वाखरी परिसरात मांस, मटण, मासे विक्री व प्राणी कत्तल तसेच मांसजन्य पदार्थ विक्री करणे यावर बंदी घालण्यात आली आहे.

# जुनाट प्रथांना फाटा; मानेगावात स्त्री शक्तीचा जागर

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २३ जानेवारी-**

समाजात आजही विधवा महिलांना मंगल कार्यांपासून दूर ठेवण्याच्या अनिष्ट प्रथा अस्तित्वात असताना, बार्शी तालुक्यातील मानेगाव येथे 'एकता महिला मंच' ने या परंपरांना छेद देणारा एक क्रांतीकारी निर्णय घेतला आहे. मकरसंक्रांतीचे औचित्य साधून 'मी विधवा नव्हे, मी स्त्री' या अभिनव उपक्रमांतर्गत सुवासिनी आणि विधवा भगिनींचा एकत्रित हळदी-कुंकू सोहळा २२ जानेवारी रोजी अत्यंत उत्साहात आणि मांगल्याच्या वातावरणात संपन्न झाला.





कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने आणि दीपप्रज्वलनाने झाली. या प्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्योती तीर्थ, एकता महिला मंचचे मार्गदर्शक प्रभाकर क्षीरसागर, सिस्टर डोंगरे व सिस्टर मस्के यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची रूपरेषा मांडताना प्रभाकर क्षीरसागर भावूक होऊन म्हणाले, पतीच्या निधनानंतर स्त्रीचे अस्तित्व संपत नाही. तिला समाजात सन्मानाने जगण्याचा पूर्ण अधिकार आहे. 'विधवा' हा शब्द पुसून काढून 'मी एक स्वतंत्र स्त्री आहे' हा स्वाभिमान जागवण्यासाठीच या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी महिलांसाठी विविध खेळ आणि उखाण्यांच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यात विधवा आणि सुवासिनी महिलांनी सहभाग घेतला. अनेक वर्षांपासून सामाजिक बंधनात अडकलेल्या महिलांच्या डोळ्यांत यावेळी आनंदाश्रू पाहायला मिळाले. सोहळा यशस्वी करण्यासाठी एकता महिला मंच मानेगावच्या प्रमुख रेणुका चौगुले, रजनी घोंगडे, अविदा डाके, संगीता डाके, सुरेखा डाके, रसिका डाके, अश्विनी डाके, इंदुमती डाके, लोचना डाके, लक्ष्मी मोरे यांच्यासह गावातील महिलांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रभाकर क्षीरसागर यांनी केले, तर आभार रेणुका चौगुले यांनी मानले.

## शंकरलिंग प्रशालेत नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. २३ जानेवारी-**

वळसंग(ता. द.सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती संपन्न झाली. प्राचार्य वीरेश थळंगे व पर्यवेक्षक शिवानंद घोडके यांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी कुमारी संस्कृती हंजगे हिने आपल्या भाषणातून नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या विषयी माहिती सांगितली.

यावेळी सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जमादार, सिध्दाराम भैरामडगी, नीलकंठ कवटगी, सिद्धारूढ हिरेमठ, गंगाधर बिराजदार, बसवराज दुधगी, मल्लिनाथ गौडगाव, विजय प्याटी, शिवराज अष्टगी, अजय माणकोजी, विजयालक्ष्मी थळंगे, शैला निंबाळ, गंगा बागलकोटी, लिपिका राजश्री दुधगी, लिपिक गौरीशंकर चनशेट्टी, कर्मचारी कट्टेप्पा कोळी, विनोद दुधगी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार सांस्कृतिक विभाग उपप्रमुख श्रीमंत भोसले यांनी मानले.

## अकलूज परिसरात गणेश जयंती उत्साहात





### पाच हजार भाविकांना महाप्रसादाचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २३ जानेवारी-**

अकलूज परिसरात माघी गणेश जयंती साजरी करण्यात आली.

आनंदा नगर येथील आनंदी गणेश मंदिरामध्ये कीर्ती ध्वजसिह मोहिते-पाटील यांनी श्री गणेशाची अभिषेक व पूजा केली यावेळी स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील उपस्थितीत होत्या. अथर्वशीर्ष पठण भजन पाळणा व जन्मात्सव साजरा करण्यात आला प्रसादाचे वाटप करण्यात आले

अकलूज येथील पुरातन पेशवेकालीन मंदिरामध्ये ब्राह्मण सेवा संघ व गणपती मंदिर ट्रस्ट यांच्यावतीने गणेश याग करण्यात आला. राजेंद्र सूर्यवंशी यांनी संपत्नीक पूजा केली. यावेळी माजी सरपंच किशोरसिंह माने-पाटील उपस्थित होते. लोकमान्य गणेशोत्सव मंडळाच्या वतीने मंडळाचे सदस्य देवचंद ओसवाल यांनी श्री गणेशाची पूजा केली. यावेळी राजेंद्र आर्वे, उमेश शेटे, बाळासाहेब सणस, आप्पा खडके उपस्थित होते. महात्मा फुले गणेशोत्सव मंडळ भाजी मंडई येथील मंदिरामध्ये रमेश महादार यांनी पूजन केले. शिवरत्न गणेशोत्सव मंडळ येथे राहुल किसनपूर या दापत्यांनी गणेशाची पूजन केले. यावेळी उदय शेटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रसाद वाटप केले. छत्रपती गणेशोत्सव मंडळाच्या वतीने गोपाळ सोमनाथ गुळवे यांनी पूजन केले मंडळाचे अध्यक्ष डॉक्टर धवलसिंह मोहिते -पाटील हे आहेत पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील यांनी श्री गणेशाचे दर्शन घेतले. यावेळी पाच हजार भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## 'शिवदारे'च्या विद्यार्थ्यांची 'टीसीएस'मध्ये निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जानेवारी-**

व्ही. जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स अँड सायन्सच्या कॉमर्स विभागातील ११ विद्यार्थ्यांची निवड ही टाटा कन्सल्टन्सी सर्विसेसतर्फे घेण्यात आलेल्या कँम्पस ड्राईव्हमधून निवड झालेली आहे.



टीसीएस या कंपनीचे एच.आर. राहुल गिरी यांच्या उपस्थितीत महाविद्यालयात रजिस्ट्रेशन सत्र पार पडले होते. ३९ विद्यार्थ्यांनी त्यात सहभाग घेतला होता. त्यातील २५ विद्यार्थी प्टिट्यूड टेस्टसाठी पात्र ठरले. पात्रता परीक्षा यशस्वीपणे पूर्ण केलेल्या १५ विद्यार्थ्यांची मुलाखतीसाठी निवड झालेली होती. यापैकी ११ विद्यार्थ्यांची निवड कंपनीतर्फे बिझनेस प्रोसेस सर्विसेस याकरिता करण्यात आली. कॉमर्स विभागातील ऐश्वर्या कोरे, भूमिका पाटील, ज्ञानराज घम, इशरतजहाँ काझी, ओम शिंदे, प्रतीक्षा नंगारे, प्रिया राठोड, साक्षी कोळी, साहिल गायकवाड, सुप्रिया तेली, दिपाली सोनवणे या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांना प्रा. वैशाली वराडे यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे, विश्वस्त भिमाशंकर शेटे, प्राचार्य डॉ. दत्तात्रय सुत्रावे यांनी अभिनंदन केले.

## सुळेवाडी येथे गणेश जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २३ जानेवारी-**

माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी येथे विविध उपक्रमानी गणेश जयंती साजरी करण्यात आली.

सुरुवातीला पहाटे सकाळी सहा वाजता अप्पासाहेब लेंगरे यांच्या हस्ते सपत्नीक महापूजा करण्यात आली. सकाळी ८ वाजता महापूजा, होमहवन, दुगधाभिषेक, जलाभिषेक करण्यात आला. सकाळी १०.३० वाजता गणेश जन्म सोहळा, त्यानंतर शेतकऱ्यांना कृषी व बि-बियाणे मार्गदर्शन, यानंतर दुपारी बारा ते एक वाजेपर्यंत महीला शेळीपालन प्रशिक्षण, सायंकाळी ४ ते ७ रक्तदान शिबिराचे आयोजन, सायंकाळी पाच ते सात गजीढोल कार्यक्रम, सायंकाळी सात ते आठ हळदी-कुंकू समारंभ अश्या विविध कार्यक्रमाचे आयोजन गणेश जयंतीनिमित्त करण्यात आले होते. तर सायंकाळी सहा ते दहा वाजेपर्यंत निरंजन लेंगरे यांच्यातर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राजू सुळे, विक्रम सुळे, तानाजी सुळे, शिवराम माने, अशोक करे, योगेश जानकर, भागवत सुळे, विशाल सुळे, नवनाथ माने, जयवंत सुळे, सत्यवान पिंगळे, शिवाजी सुळे, सत्यवान सुळे, नामदेव सुळे, नवनाथ ढेरे, चंद्रकांत माने, शिवाजी सुळे, लिंगा माने, विजय माने, रामचंद्र सुळे, काशिलींग सुळे, सुरज सुळे, मोहन करे, श्रीपती सुळे, विकास सुळे, संतोष सुळे, भरत लेंगरे, युवराज रुपनवर उपस्थित होते.



## चौडेश्वरी गणेश मंदिरात भजन व प्रसादाचा कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २३ जानेवारी-**

माळशिरस तालुक्यातील बस स्थानकावरील, अहिल्या चौकातील संग्राम दोस्ती मंडळाच्या गणेश मंदिरात माघी गणेश जयंती निमित्त श्री गणेशाची जयंती भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली.

यावेळी मुकुंद सुरवसे, कोळी यांच्या भजनी मंडळाने बहारदार भजनाचा कार्यक्रम सादर करून सामुहिक आरती सादर करण्यात आली. यावेळी अध्यक्ष अतुल भैस, सागर भैस, सचिन पुकळे, अमिनखान पठाण, शशिकांत लोखंडे, युवराज गायकवाड, रणजीत काळे, कदिरखान पठाण, दामोदर लोखंडे, अरुण मदने, दिगंबर भैस, प्रदीप चोबे, जिशान शेख, बाबासाहेब सय्यद, संतोष खेत्रे, अरुण मदने, सुनील सुतार, मुकुंद सुरवसे, सुरज कस्तुरे, जयराम सुरवसे, समीनखान पठाण, आरमान शेख, योगेश सुतार, वैभव सुतार उपस्थित होते. यावेळी देवांग कोष्टी समाज संघटनेच्या वतीने अभिषेक व पूजा श्री व सौ प्रसाद दौंडे यांच्या हस्ते दुपारची महाआरती श्री व सौ सोमनाथ दौंडे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी संजय रोकडे, विनोद तावरे, पिंटू टकले, परि बुगड, निरंजन टकले, प्रसाद दौंडे, सोमनाथ दौंडे, किरण करमाळकर उपस्थित होते.

## शासकीय ध्वजारोहण समारंभाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ जानेवारी-**

भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त शासकीय ध्वजारोहण समारंभ सोमवार दिनांक २६ जानेवारी रोजी सकाळी ०९.१५ वाजता रेल्वे मैदान येथे होणार आहे.



उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहणाचा समारंभ संपन्न होणार असून, या समारंभास मान्यवर नागरिक, स्वातंत्र्य सैनिक तसेच शासकीय-निमशासकीय अधिकारी कर्मचारी यांनी राष्ट्रीय पोषाखात उपस्थित रहावे असे, आवाहन तहसिलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.


# पंढरीची वारी म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक

### प्रथमेश इंगळे; अक्कलकोट-पंढरपूर पायी दिंडीचे शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २३ जानेवारी-**

पंढरीच्या वारीमध्ये सर्व धर्माचे पंथाचे लोक विठ्ठल भक्तीसाठी गुण्यागोविंदाने एकत्र येतात. लहान थोर, गरीब श्रीमंत सारेच भेदभाव येथे विसरले जातात. पंढरीची वारी म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक असल्याचे प्रतिपादन येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे यांचे सुपूत्र व श्री वटवृक्ष देवस्थानचे युवा नेतृत्व प्रथमेश इंगळे यांनी केले.

सालाबादप्रमाणे यंदाही तीर्थक्षेत्र अक्कलकोट ते तीर्थक्षेत्र पंढरपूर पायी माघवारी दिंडीचे शुभारंभ व प्रस्थान देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते दिंडी पूजनाने झाले. याप्रसंगी प्रथमेश इंगळे बोलत होते. प्रारंभी मैंदर्गी रोडवरील समर्थ पार्क सोसायटी येथील कै.कल्याणराव उर्फ बाळासाहेब इंगळे स्मृती उद्यान येथे पायीदिंडीचे भजन पाऊल नामस्मरण झाले. यानंतर भाविकांनी अल्पोपहार करून दिडींसह वटवृक्ष मंदिरात आगमन करून श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी देवस्थानचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, प्रा. शिवशरण अचलेर, प्रसाद पाटील, अंकूश केत, शेख नुरोद्दीन दर्गाहचे पुजारी अहमदपाशा पिरजादे, मेजर संदिप सलगरे, विश्वनाथ सुतार, मनोज जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरोहीत व्यंकटेश पुजारी यांच्या वाणीतून प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते दिंडीतील पालखी सोहळ्याची आरती संपन्न झाली.



यावेळी कमल होटकर, कृष्णा शिंदे, मोहन बंदिछोडे, पत्रकार राजेश जगताप, पत्रकार स्वामीराव गायकवाड, विजय शिंदे, शिवशरण टाके, बाबुराव पांचाळ, धनराज पाटील, मुरलीधर पाटील, अनंत पाटील, कृष्णा शिंदे, सदानंद जाधव, शशीकांत पाटील, शिंदे, हरि मुळे, धोंडूराम पाटील, नंदनुमार जगदाळे, ऋतुराज जामदार, विश्वजीत जाधव, महेश बंदिछोडे, शैर्य सुतार, शिवनेरी सलगरे, हर्षवर्धन हादवे, अभिरूप इंगळे, दर्शन घाटगे, विपूल जाधव, समर्थ स्वामी, श्रीकांत मलवे, तुषार मोरे, धनराज स्वामी, रमेश शिंदे, सुनिल पवार, बाळासाहेब एकबोटे, स्वामीनाथ लोणारी, प्रसाद सोनार, गणेश इंगळे, महेश मस्कले, ओंकार महाडीक, लखन सुरवसे, सागर गोंडाळ उपस्थित होते.

> गेल्या ३४ वर्षांपासून अक्कलकोट ते पंढरपूर पायी दिंडी वारी कै. बाळासाहेब इंगळे यांच्या प्रेरणेने चालू आहे. याचा वारसा श्री वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे आणि पुढे प्रथमेश इंगळे यांनी चालू ठेवला आहे. हे कार्य इंगळे कुटूंबियांकडे असलेल्या आध्यात्मिक संस्कृतीचे दर्शन घडवित आहे.
>
> **- श्रीमुख जगदाळे, दिंडी प्रमुख, अक्कलकोट**

आपला जिल्हा

जिल्हा परिषद व पंचायत समितीची रणधुमाळी

शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६

# ग्रामविकासमंत्रीच जिल्ह्याचे पालकमंत्री असल्याने जिल्ह्याच्या विकासकामांना मिळणार मोठा निधी!

**जिल्हा परिषदेच्या प्रचारात भाजपाने काढला नवा मुद्दा**

**अर्ज वैध ठरलेल्या सर्वपक्षीय उमेदवारांचा प्रचार जोरात सुरू**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पहिल्या टप्प्याची घोषणा केली असून, सोलापूर जिल्ह्यासह १२ जिल्ह्यांतील जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी ही निवडणूक जाहीर झाली आहे. जिल्ह्यातील १२ नगरपालिका, सोलापूर महापालिका निवडणुकीनंतर आता जिल्हा परिषदेचीही निवडणूक लागली असून, यामध्ये ६८ जागांसाठी चुरशीचे मतदान होणार आहे. सध्या वैध ठरलेल्या सर्व पक्षीय उमेदवारांनी प्रचाराचा शुभारंभ जोरात सुरू केला आहे. भाजपाच्या उमेदवारांनी विकासकामांना मतदान मागताना ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे हे आपल्या जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत आणि त्यांच्यामुळे आपल्या जिल्ह्याला, जिल्हा परिषद-पंचायत समिती सदस्यांना भरघोस निधी मिळेल आणि जिल्ह्याचा विकास मोठ्या प्रमाणात करता येईल, असा प्रचाराचा नवा फंडा काढला असून, याचा फायदा नक्कीच भाजपा उमेदवारांना होणार आहे.



सोलापूर महापालिका निवडणुकीनंतर आता ग्रामीण भागाचे राजकारण चांगलेच तापले आहे. दरम्यान, सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद ओबीसीसाठी राखीव आहे. या निवडणुकीसाठी गेल्या २ महिन्यापासून काही राजकीय मल्ल लंगोट लावून बसले असून, त्यांच्या गटातील मतदारसंघात त्यांच्या २-२ राऊंडही झाल्या आहेत. दरम्यान, ही निवडणूक भाजपा, राष्ट्रवादी अन् शिंदे सेनेतच रंगणार असल्याचे दिसून येत आहे. प्रत्येक पक्षाच्या नेत्यांनी आपापल्या उमेदवारांना एबी फॉर्म दिले आहेत. भाजपाकडून एकेका जागेसाठी १५ ते २० उमेदवार इच्छुक असल्याने एबी फॉर्म अवघ्या १ तासाच्या फरकाने संबंधित कर्मचाऱ्यांकडे दिले. तरीही आज छाननीच्या दिवशी दक्षिण तालुक्यातील काही उमेदवारांबाबत एबी फॉर्मवरून राजकीय खेळी झाल्याचे समोर आले आहे. अर्ज माघार घेण्यासाठी अजून ५ दिवस बाकी असल्याने यानंतरच फायनल उमेदवारांची यादी समोर येणार आहे. सध्यातरी विविध पक्षाच्या



नाराज पदाधिकाऱ्यांचा रूसवा काढण्यात नेतेमंडळी व्यस्त असल्याचे दिसून येत आहे.

जिल्ह्यात १२ नगरपालिकांची नुकतीच निवडणूक पार पडली आहे. यामध्ये भाजपाच्या जागा वाढल्यानंतर महापालिकेतही भाजपाला बहुमत (८७ जागा) मिळाले आहे. त्यातच अवघ्या राज्याचं लक्ष लागलेल्या जिल्हा परिषदा आणि पंचायत समितीच्या निवडणुकांची रणधुमाळी चालू आहे. त्यानुसार, राज्यातील १२ जिल्ह्यात निवडणुकांचा धुरळा उडणार असून, १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समितींसाठी मतदान प्रक्रियेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला. त्यानुसार, राज्यात ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून, रोजी ७ फेब्रुवारीला सकाळी १० वाजता निकाल जाहीर होणार आहे. जिल्ह्यात राष्ट्रवादी, भाजप अन् शिंदे सेनेच्याच तगड्या लढती राहणार आहेत. मागील जिल्हा परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी- २५, भाजप+आघाड्या-१९, शिवसेना +आघाड्या-१०, शेकाप-३, भीमा परिवार-३, काँग्रेस-७ आणि अपक्ष १ असे बलाबल होते. यामुळे इतर पक्षाच्या टेकूने राष्ट्रवादीने सत्ता मिळविली होती. यंदाही भाजप, राष्ट्रवादी अन् शिंदेंच्या शिवसेनेच्या उमेदवारांतच तगडी फाईट दिसून येणार आहे. तसेतर युती, आघाडीनंतरच खरे चित्र स्पष्ट होणार आहे.

### पालकमंत्र्यांची जादू ग्रामीण भागात चालेल का?

भाजपामध्ये महापालिकेप्रमाणे इतर पक्षातील काही नेत्यांची अजून इंट्री चालूच असल्याने सोलापूर महापालिकेप्रमाणेच भाजपाकडून जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी शह-कटशहाचे राजकारण होणार असल्याचे दिसते. दरम्यान, ग्रामीण भागातील दोन्ही राष्ट्रवादी आणि उबाठा पक्षातील काही जुन्या आणि बुजुर्ग नेत्यांपुढे पालकमंत्र्यांची जादू किती काम करणार? हे येणारा काळच ठरविणार आहे.

### आम्ही अन् आमचे उमेदवार विकासकामांनाच मत मागणार

जिल्ह्यातील १२ नगरपालिका, सोलापूर महापालिका निवडणुकीच्या धर्तीवरच आमचे कमळ चिन्हाचे अधिकृत उमेदवार मतदारांसमोर जाताना विकासाचा अजेंडा, वचननामाच घेवून जाणार आहेत. इतकेच नाहीतर भविष्यात जिल्ह्यातील करायची विकासकामे, आजतागायत भाजपाने केलेली विकासकामे याच मुद्द्यांचा आमच्या प्रचारात समावेश राहणार आहे. विरोधकांप्रमाणे आम्ही कोणावरही टिका करणार नाहीत. आम्ही आणि आमचे उमेदवार फक्त विकासकामांनाच मत मागणार आहेत. यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी योग्य त्या सुचना, मार्गदर्शन सर्वांना केले आहे. आपल्या जिल्ह्याचे पालकमंत्री गोरे हे राज्याचे ग्रामविकास मंत्री असल्याने आपल्या जिल्ह्याच्या विकासकामांना मोठा निधी मिळेल, यासाठी भाजपाच्या पाठीशी मतदारांनी उभे राहावे, असे वाटते.

**- शशिकांत चव्हाण, जिल्हाध्यक्ष, भाजपा**

## युवक काँग्रेसचे दक्षिण तालुका कार्याध्यक्ष व्हनमाने यांचा राजीनामा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जानेवारी-**

ऐन निवडणूकीच्या तोंडावर युवक काँग्रेसचे तालुका कार्याध्यक्ष सचिन व्हनमाने यांनी पक्षातील वरिष्ठांच्या त्रासाला कंटाळून राजीनामा दिला. लवकरच ते पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत भाजपात पक्षप्रवेश करणार आहेत. त्यामुळे होटगी पंचायत समिती गणात काँग्रेसला धक्का बसला असून भाजपाला फायदा होणार आहे. माजी आमदार दिलीप माने यांच्या नेतृत्वाखाली सचिन व्हनमाने यांनी भाजपात काम करणार असल्याचे सांगितले.



सचिन व्हनमाने यांच्या मातोश्री होटगी पंचायत समिती गणातून काँग्रेस पक्षाकडून इच्छुक होत्या. मात्र त्यांची उमेदवारी डावलून माजी तालुकाध्यक्षांच्या कुटुंबात उमेदवारी दिल्याने व्हनमाने यांनी नाराजी व्यक्त करत तालुकाध्यक्ष भीमाशंकर जमादार यांच्याकडे राजीनामा दिला. व्हनमाने हे काँग्रेसमध्ये अनेक वर्षांपासून निष्ठेने कार्यरत असून सध्या दक्षिण सोलापूर तालुका युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष म्हणून काम करीत होते. त्यांनी पक्षवाढ, संघटन बांधणी, सामान्य जनतेचे प्रश्न, कार्यकर्त्यांचे प्रश्न व पक्षाच्या विचारधारेचा प्रचार-प्रसार करण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले.

पक्षाच्या अडचणीच्या काळात पक्षाशी एकनिष्ठ राहून पक्षवाढीसाठी काम केले. पक्षांतर्गत परिस्थिती, कार्यपद्धती, अपेक्षित समन्वयाचा अभाव व सतत निर्माण होणारा वरिष्ठांच्या जाच यामुळे वैयक्तिक व सामाजिक कार्य करताना त्रास होत आहे. या कारणांमुळे दडपण येत असल्यामुळे पदाचा राजीनामा दिल्याचे व्हनमाने यांनी सांगितले.

## जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सर्व जागा विजयी करणार; माजी आमदार परिचारकांचा निर्धार

**तालुक्यातील राझंणी येथे महादेव मंदिरात नारळ वाढवुन केला प्रचाराचा शुभारंभ**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२३ जानेवारी -**

पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सर्व जागा विजयी करण्याचा निर्धार माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी केला. केवळ निर्धारच नाही तर यावेळी त्यांनी पदाधिकारी व कार्यकर्ते यांना विजयश्री मिळविण्यासाठी कामाला लागावे, अशी सूचना देखील केली.

भाजप व पंढरपूर मंगळवेढा शहर विकास आघाडीच्या उमेदवाराचा प्रचाराचा शुभारंभ शुक्रवारी रांझणी येथील महादेवाच्या मंदिरात नारळ वाढवून करण्यात आला. यावेळी आमदार समाधान आवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी माजी आमदार प्रशांत परिचारक म्हणाले, गेल्यावेळी झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये परिचारक गटाचे ७ उमेदवार विजयी झाले होते. तर पंचायत समितीमध्ये १३ उमेदवार विजयी झाले होते; मात्र यंदाच्या निवडणुकीत जिल्हा परिषदेच्या व पंचायत समितीच्या सर्व जागा विजयी करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. यासाठी पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी कामाला लागावे. महापालिका नगरपरिषद निवडणुकीमध्ये भाजपला यश मिळाले आहे. त्याच पद्धतीने जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीमध्ये निश्चितच यश मिळणार आहे, असा विश्वास देखील यावेळी परिचारक यांनी व्यक्त केला.

यावेळी जेष्ठ सहकारी दिनकरभाऊ मोरे, वामनराव माने सर,कल्याणराव बप्पा पाटील,दिलीप आप्पा घाडगे, युवराज पाटील, शशिकांत चव्हाण, कैलासराव खुळे सर, दिलीपराव चव्हाण, पंडितराव भोसले, हरिषदादा गायकवाड, प्रणव परिचारक, भारत नाना कोळेकर,बाबुराव जाधव, समाधान काळे, रतीलाल गावडे, प्रशांत देशमुख, विजयदादा देशमुख, भगवानराव चौगुले, राजू बापू गावडे, बाळासो सालविठ्ठल लक्ष्मण तात्या धनवडे, सुभाषराव माने, पोपटराव रेडे,तानाजीराव वाघमोडे, बाळासो शेख, बाळासाहेब यलमर, नरसाप्पा देशमुख बाळासो माळी, संतोष घोडके, सुभाष मस्के सर, हर्षल कदम, हरिभाऊ गावंधरे अभिजित कवडे, आदिनाथ देशमुख, राहुल पुरवत, तानाजी पवार, ॲड. संतोष देशमुख, हरिभाऊ फुगारे, सुदाम मोरे, जयसिंग भूसनर, संतोष भिंगारे , माणिक माने,नानासाहेब गोसावी, भैरूमामा माळी, अरुण घोलप, मोहन नागाटिळक उपस्थित होते.




### मागील वेळेपेक्षा यावेळी समीकरणे बदलली आहेत

या अगोदर झालेल्या जिल्हा परिषद गटामध्ये परिचारक यांचे ७ तर विरोधकाचा १ तसेच पंचायत समिती निवडणुकीमध्ये परिचारक गटाचे १३ व विरोधकाचे ३ उमेदवार विजयी झाले होते. मात्र यंदाच्या निवडणुकीत राजकीय समीकरणे बदलली आहेत. पंढरपूर तालुक्यातील मातब्बर नेते तथा सहकार शिरोमणीचे चेअरमन कल्याण काळे, समाधान काळे, भोसे गावचे सरपंच गणेश पाटील भाजपमध्ये दाखल झाले आहेत. तसेच पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केलेली असून या निवडणुकीकडे पुर्ण लक्ष केंद्रित केले असल्याचे दिसून येत आहे.

### यावेळी करण्यात आला संकल्प

प्रत्येक घरापर्यंत विकास पोहोचवणे. शेतकऱ्यांच्या हाताला बळ देणे. ग्रामीण भागाचा कायापालट करणे.



**मौखिक प्रशिक्षण कार्यशाळा**

सोलापूर शहरात शुक्रवारी दुपारी छत्रपती रंग भवन सभागृहात जिल्हा परिषदेच्या व पंचायत समितीच्या निवडणुकीचे मौखिक प्रशिक्षण कार्यशाळेला सुरुवात झाली. (छायाचित्र केवल तिवारी)

## दक्षिण सोलापूर कार्यक्षेत्रातील नागरिकांच्या तक्रारीसाठी आचारसंहिता कक्ष स्थापन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

राज्य निवडणूक आयोग, मंत्रालय, मुंबई यांच्या आदेशान्वये जिल्हा परिषद गट व त्याअंतर्गत येणारे पंचायत समिती गण यांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झालेला आहे. त्यानुसार तहसील कार्यालय दक्षिण सोलापूर येथे आचारसंहिता कक्ष कार्यरत झाला आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समिती, सार्वत्रिक निवडणूक २०२६ ता. दक्षिण सोलापूर कार्यक्षेत्रात आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी होणेकरिता निवडणूक कालावधीमध्ये आचारसंहिता कक्ष पुर्णवेळ कार्यरत असून, आदर्श आचारसंहिता अंमलबजावणीसाठी कार्यक्षेत्रातील नागरिकांच्या तक्रारीची तातडीने दखल घेण्यात येणार असल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी किरण जमदाडे यांनी दिली.

## पिलीव पंचायत समिती गणात पुकळे यांच्या उमेदवारीमुळे चुरस

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.२३ जानेवारी-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव पंचायत समीती गणात भाजपने जलनायक शिवराज पुकळे यांच्या पत्नी नम्रता पुकळे यांना उमेदवारी दिली आहे. यामुळे खरेतर विरोधी गटापुढे मोठे आव्हान निर्माण झाले आहे.




शिवराज पुकळे हे गेल्या अनेक वर्षांपासून दुष्काळी भागातील सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी, काळमवाडी ,कोळेगाव या दुष्काळी पट्ट्यातील गावांना शेतीसाठी निरा देवधरचे पाणी मिळावे म्हणून संघर्ष करीत आहेत. यासाठी त्यांनी अनेक आंदोलने केली आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून पुकळे यांचा हा लढा सुरु आहे. खरेतर भाजपचे माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर व माजी आमदार रामभाऊ सातपुते यांनीही पुकळे यांच्या ह्या लढ्याची दखल घेत केंद्र व राज्य सरकारकडे या वंचित गावांचा समावेश केला आहे. यामुळेच आता ह्या पाण्यासाठी संघर्ष करणाऱ्या जलनायक पुकळे यांच्या धर्मपत्नी भाजपाकडुन पिलीव पंचायत समिती गणातुन निवडणूक लढवित आहेत. सुळेवाडी ,बचेरी ,शिंगोर्णी, कोळेगाव या दुष्काळी पट्ट्यातील गावातील जनता याला पाठींबा देणार असे चित्र सध्या आहे. योगायोगाने केंद्रात व राज्यात सत्तेवर असणाऱ्या भाजपाकडुन सध्या नम्रता पुकळे ह्या निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या आहेत. विरोधकांना पुकळे याच्या उमेदवारीमुळे मोठी चुरस निर्माण झाली आहे.

# बाकि कोणाच्याही नादी लागा... पण देवाभाऊच्या नादी लागू नका

**पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा आमदार अभिजीत पाटील यांना सज्जड इशारा**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ जानेवारी -**

काही जण भाजप आणि त्यांच्या नेत्यांना संपवण्याची भाषा बोलत आहेत. परंतु त्यांनी आपल्या क्षमतेनुसार आणि कुवतीनुसार बोलावे, भाजपने छत्र काढले तर आपली काय अवस्था होईल याचा आधी विचार करावा, आणि मग भाजला संपवण्याची भाषा करावी. बाकी कोणाच्या ही नादी लागा..पण देवाभाऊ आणि जयकुमार गोरे यांच्या नादी लागू नका असा सज्जड इशारा आमदार अभिजीत पाटील यांना दिला. आमदार अभिजीत पाटील यांनी नुकताच भाजप आणि त्यांच्या प्रस्थापीत नेत्यांना या निवडणुकीत घरी बसवू असा इशारा दिला होता. त्यावर पालकमंत्री गोरे यांनी आमदार पाटील यांच्यावर निशाना साधला.




पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थिती मध्ये गुरुवारी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष समाधान काळे व वाखरी जिल्हा परिषद गटातील उमेदवार मोनिका काळे, पटवर्धन कुरोली पंचायत समिती गणाच्या उमेदवार प्रियंका रामकृष्ण नाईकनवरे, गोपाळपूर पंचायत समिती गणाच्या उमेदवार वंदना अण्णासाहेब शिंदे, भाळवणी गटाच्या उमेदवार जयश्री लोखंडे, उत्तम नाईकनवरे, जिगर गायकवाड यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

यावेळी माजी आमदार प्रशांत परिचारक, आमदार समाधान आवताडे, सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष कल्याणराव काळे,उपाध्यक्ष भारत कोळेकर, जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजित शिंदे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालकमंत्री गोरे म्हणाले की, निवडून आल्यानंतर यश पचवता आले पाहिजे. काही लोक मी कसा सगळ्या लोकांना गंडवतो या अविर्भावात आहेत. तुमचा सुखाचा संसार सुरु आहे. भाजपने तुमच्या डोक्यावरचे छत काढून घेतलं तर काय होईल याचा अंदाज तुमला पण आहे. त्यामुळे आपल्या क्षमते आणि कुवती प्रमाणे बोलावे असा सल्लाही आमदार पाटील यांना गोरे यांनी दिला.

### काही लोक दोन पक्षाचे मालक होवू पाहत आहेत

यावेळी बोलताना कल्याणराव काळे म्हणाले की, पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या आठ आणि पंचयात समितीच्या १६ जागांवर भाजपचे उमेदवार निवडणून आणण्याचा आम्ही निर्धार केला आहे. काही लोक दोन पक्षाचे मालक होऊ पाहत आहेत पण या निवडणुकीत जनता त्यांना त्यांची जागा दाखवून देईल. आता पर्यंत या गड्याने सगळ्यांना फसवले आहे. आता मैदानात सापडला आहे असा टोलाही काळे यांनी आमदार अभिजीत पाटील यांना लगावला.